शनिवार
२२ ऑक्टोबर
१९७७

# माणूस

मूल्य
सव्वा
रुपया

गांधीजींचा 'अंत्योदय' आणि दीनदयाळजींचा 'एकात्म मानव' हे दोन्ही सिद्धांत एकच आहेत.

—पंतप्रधान मोरारजी देसाई

## दीनदयाळ स्मृती-विशेषांक



# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक एकविसावा

२२ ऑक्टोबर १९७७

मूल्य १·२५ पैसे



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०.

□

दूरध्वनी : ४३४५९

□




# सीमोल्लंघन

स्वातंत्र्यकाळात देशात वाढलेल्या सत्तावादावर सेवावाद हा एक प्रभावी उतारा ठरू शकतो.

गांधीजींनी लोक सेवक संघाची कल्पना मांडलीच होती; पण ती प्रत्यक्ष अंमलात आणायला, तिचा विस्तार करायला दुर्दैवाने ते जिवंत राहू शकले नाहीत.

परिस्थितीनेच ही जबाबदारी आता रा. स्व. संघावर टाकलेली आहे.

गांधीजींच्या विचारसृष्टीत आणि संघविचारात फरक नाही असे नाही; पण तो मूलभूत जीवनदर्शनातला फरक नाही, एवढे आता नक्की स्पष्ट झाले आहे. गांधीजींनाही दुर्बलांची अहिंसा अभिप्रेत नव्हती. पुरुषार्थसंपन्न एकात्म समाज हा संघासमोरील आदर्श आहे. भागवतधर्म आणि महाराष्ट्रधर्म यात जो साम्य-भेद होता तो या दोन विचारसरणीत आहे, असेही म्हणता येईल. एकीला दुसरी पूरक आहे; विरोधक नाही. सत्तानिरपेक्ष समाज-परिवर्तन हा तर या दोन्ही विचारसरणींना एकत्र आणणारा फार प्रबळ दुवा आहे.

हा दुवा जोडून संघाने जर आपली यापुढील वाटचाल केली तर इतिहास बदलेल. कालप्रवाहावर संघाचा ठसाच उमटलेला दिसेल.

□

स्वातंत्र्यचळवळीवर संघाला आपला ठसा उमटविता आलेला नव्हता. ही आणखी एक संधी–एका महत्कार्याची.

आणि हे महत्कार्याचे कंकण हाती धरण्याचा संघाने निश्चय केला असेलच तर मात्र **‘आता महत्तमत्त्व पाहिजे बाणिले’** हेही लक्षात घ्यायला हवे. सीमोल्लंघनाची ही वेळ आहे. वैचारिक आणि कृतीक्षेत्रातीलही.

□

सावरकरांनी आपल्या ‘हिंदुत्व’ प्रबंधात शेवटी म्हटल्याप्रमाणे :

‘आणि हेही तितकेच निश्चित आहे की, जेव्हा केव्हा ही अशी वेळ येईल, तेव्हा हिंदू लोक सर्व जगाला दुसरे तिसरे काही सांगणार नाहीत तर तेच जगाला करावयास सांगतील की, जे गीतेने सांगितले, जे बुद्धाने उपदेशिले. ज्या वेळी ‘हिंदू’ मनुष्य हा हिंदुत्वातीत होतो त्या वेळेला तो श्रीशंकराचार्यांप्रमाणे ‘वाराणसी मेदिनी’ म्हणून गावयाला लागतो व श्रीतुकाराममहाराजांप्रमाणे ‘आमुचा स्वदेश। भुवनत्रयामध्ये वास।’ असे गर्जून उठतो. ‘काय म्हणता? माझा स्वदेश? ऐका तर बंधूंनो! माझ्या देशाच्या मर्यादा म्हणजे त्रैलोक्याच्या मर्यादा, तीच माझ्या देशाची सरहद्द!’

□

या सरहद्दीपर्यंत वाटचाल करायला दीनदयाळ उपाध्याय यांचे विचारधन आणि प्रत्यक्ष जीवन फार मार्गदर्शक ठरू शकणारे आहे.


म्हणून या अंकात या विचारधनाची व त्या आधारे सुरू असलेल्या प्रत्यक्ष कार्याची थोडी ओळख करून दिली आहे.

**–संपादक**

## यापुढील अंक : दिवाळी अंक

# सिद्धान्त दोन अर्थ एक

पंतप्रधान मोरारजी देसाई



**प्रश्न** : पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्याबाबत आपल्याला काय वाटते ?

**उत्तर** : पं. दीनदयाळजी माझ्या मते भारतीय संस्कृतीचे नुसते उपासकच नव्हते तर भारतीय संस्कृतीचे खरे प्रतीक होते. ते एक आदर्श सेवक होते. त्या सेवेतूनच त्यांनी निर्भयता प्राप्त केली होती. त्यांनी कोणत्याही अधिकारपदाचा मोह धरला नाही. धनलालसाही त्यांच्या ठायी नव्हती. लौकिक शिक्षण इतके उच्च घेतले होते की, ते सत्ता आणि मत्ता यांच्या मागे लागले असते तर दोन्ही सहज प्राप्त करू शकले असते; परंतु अत्यंत साधेपणाने राहून त्यांनी एकात्म मानववादासारखा अप्रतिम सिद्धान्त मांडला. त्याग, तपस्या आणि निःस्वार्थ सेवा यांचा आदर्श त्यांनी स्वतःच्या आचरणाने घालून दिला. हे त्यांचे कार्य म्हणजे त्यांचे जीवन होते. म्हणून मला ते भारतीय संस्कृतीच्या खऱ्या प्रतीकासारखे वाटतात.

**प्रश्न** : आपण एकात्म मानववादाबाबत आजच्या संदर्भात काय सांगू शकाल ? कारण ज्या जनसंघातून या सिद्धान्ताचे प्रतिपादन दीनदयाळजींनी केले, तो जनसंघ आता जनता पक्षात विलीन झालेला आहे...

**उत्तरं** : संपूर्ण समाजात समानतेचीच नव्हे तर एकात्मतेची भावना निर्माण करून त्या भावनेच्या आधारावर संपूर्ण समाजाचा विकास साधावा हा एकात्म मानववाद आहे. संपूर्ण. समाजाची सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी समाजातील प्रत्येकाचा मूळ पिंड सारखाच आहे ही भावना तो शिकवतो. साहजिकच देशातील गरीब आणि रंजले–गांजलेले लोक यांच्याबाबत ही भावना बाळगणे त्यात येते. या गोरगरिबांच्या आणि दीनदुःखितांच्या कल्याणाकरताच दीनदयाळजी जीवनभर झटले. एकात्म मानवसमाज साकार व्हावा हीच त्यांची कामना होती. आज जनता पक्ष तेच स्वप्न बाळगून परिवर्तन करायला निघाला आहे; पण हे काम साकार करण्यासाठी प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्याने देशातील काही खेडी निवडून त्यांची सर्वांगीण उन्नती घडवून आणण्यासाठी झटल्यानेच ते होऊ शकणार आहे. कारण खेडी हाच आपल्या सर्व प्रगतीचा मानदंड आहे.

**प्रश्न** : ग्रामोद्धाराची चळवळ महात्मा गांधींनी देशाला दिली, दीनदयाळजींनी एकात्म मानववादासाठी हेच माध्यम निवडले. या दोहोत आपल्याला काय साम्य आढळते ? कोणते फरक आढळतात ?


**उत्तर** : सत्ता आणि अधिकार यांची हाव न धरता महात्मा गांधींनी आपले संपूर्ण जीवन ग्रामोद्धार आणि अंत्योदयाच्या सिद्धान्तासाठी अर्पण केले. आपले जीवन स्वराज्याकरता राबविले. दीनदयाळजींनी एकात्म मानववादाच्या सिद्धान्तासाठी त्याच स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात करण्यासाठी, जीवनभर तितक्या निरलसतेने कार्य केले दीनदयाळजींनी लौकिक लाभाकडे पाठ फिरवून जीवनभर समाजसेवा करण्यात आनंद मानला. महात्मा गांधी आणि दीनदयाळजी यांच्या जीवननिष्ठात हे असे साम्य आहे. फरक शोधायचे कारण नाही. कारण स्वराज्याकरिता असो किंवा त्या स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्यासाठी असो, अंगी बाणावी लागणारी वृत्ती एकच असावी लागते. वास्तविक अशा निःस्वार्थ कार्यकर्त्यांच्या बळावरच आपला देश आजही स्वाभिमानाने टिकून आहे. गांधीजींचा अंत्योदय आणि दीनदयाळजींचा एकात्म मानव हे दोन्ही सिद्धान्त एकच आहेत. आपली खेडी हीच आपल्या राष्ट्रीय संस्कृतीची प्रतीके आहेत. शहरांतून संस्कृती ओसरत चालली आहे. खेडी कमजोर राहिली तर देशाची उन्नती होणार नाही. प्रत्येक खेडे स्वावलंबी बनायला हवे आहे. घराघरातून काही ना काही लहानसहान कुटीर-उद्योग सुरू करायला हवे आहेत. त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. आज ग्रामीण संस्कृतीचा पुरस्कर्ता असलेला आपला देश हा परावलंबी खेड्यांचा देश झाला आहे. शहरी संस्कृतीतून मिळणारे शिक्षण अनुत्पादक बनले आहे; खेडेविकासाचा म्हणजेच ग्रामोद्धाराचा आपल्याला विसरच पडलेला आहे असे वाटत आहे. शहरी संस्कृतीचाच सर्वत्र बोलबाला झालेला आहे. वास्तविक याच आपल्या आजवरच्या नियोजनातील फार उणीवा आहेत. त्या दूर केल्याखेरीज म्हणजेच खेड्यापासून विकासाचे नियोजन केल्याखेरीज ग्रामोद्धार साधणार नाही.

**प्रश्न** : हे कसे साधता येईल ?

**उत्तर** : त्यासाठी आपल्याला दीनदयाळजींनी घालून दिलेल्या मार्गानेच जावे लागणार आहे. दीनदयाळ शोध संस्थेने याच हेतूने पाच जिल्ह्यांत सर्वांगीण ग्रामीण विकासाचे कार्य हाती घेतले आहे. त्या जिल्ह्यांतील ग्रामीण भागात उपलब्ध साधनसामुग्रीचा वापर करून त्या भागाची शेतकी, औद्योगिक आणि आर्थिक उन्नती करण्याचे कार्य ती संस्था हाती घेत आहे. हाच मार्ग आहे. प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्याने अशा प्रकारे एक एक खेडे निवडून त्यासाठी याच मार्गाने झटले तर फार मोठी प्रगती साधता येईल. दीनदयाळ शोध संस्थान हे कार्य स्वयंसेवी भावनेने करीत आहे. स्वावलंबन हे स्वयंसेवी भावनेतूनच येणार आहे. प्रत्येक बाबतीत सरकारवर अवलंबून समाज स्वावलंबी होणार नाही. सेवेतून निर्भयता येते आणि निर्भयता आली म्हणजे समाज बलवान होतो. तेव्हा मार्ग तोच आहे. □

# सिद्धान्ताला कृतीची जोड दिली

चंद्रशेखर : अध्यक्ष, जनतापक्ष



आपल्या पुराणकाळापासून ऋषिमुनींनी आणि साधुसंतांनी आपल्याला एकच शिकवण दिली आहे. 'ज्या ठिकाणी अज्ञान आहे, अंधकार आहे, दारिद्रय आहे. त्या ठिकाणी ज्ञानाचा प्रकाश आणि आर्थिक विकासाची दीपज्योत घेऊन जा! हीच आपली सनातन शिकवण राहिलेली आहे. दीनदयाळजींनी नेमके हेच कार्य आपल्या जीवनभर केले. त्यांनी समाजसेवेचे क्षेत्र निवडले होते. जे क्षेत्र निवडले त्यासाठी त्यांनी आपले सर्वस्व वेचले. अशा व्यक्तीलाच मी महापुरुष मानतो. मला तर असे वाटते की आपल्या थोर ऋषिपरंपरेतील ते एक पथिक होते. आपल्या ऋषिमुनींनी या देशातील अज्ञान, अंधकार व दारिद्रय दूर करण्यासाठी शतकानुशतके तपाचरण केले. तीच तपश्चर्या पं. दीनदयाळजींनी जीवनभर केली.

## ◻ पुरुषार्थविकास

दीनदयाळजींनी या समाजसेवेसाठी एकात्म मानववादाचा सिद्धान्त मांडला. त्यांचे हे चिंतन महात्मा गांधींच्या विचारांशी नाते सांगणारे आहे. दुर्बळातल्या दुर्बळ माणसाला आपला शारीरिक, मानसिक आणि आर्थिक असा एकात्म विकास साधण्यासाठी मदत करायला हवी हा दीनदयाळजींचा एकात्म मानववाद होता. मला तर वाटते की दीनदयाळजींची ती या देशाला दिलेली फार अनमोल देणगीच आहे. हे चिंतन प्रत्यक्ष व्यवहारात आणताना त्यांनी आपले सर्वस्व त्यासाठी झोकून दिले. महात्माजींप्रमाणेच त्यांनीही यातून स्वतःसाठी काहीच चाहिले नाही. कशाची लालसा, मोह राखला नाही. ते म्हणत असत– नुसते शरीर पोसले तर पशूत आणि मानवात फरक राहणार नाही. नुसती आत्म्याची उपासना केली तर दुर्बळ शरीराला ते अध्यात्म पेलणार नाही. नुसती धनाची आराधना केली तर शोषकवृत्ती अंगी बाणल्याशिवाय राहणार नाही. म्हणून मानवाचा खराखुरा विकास साधायचा असेल तर माणसामाणसाला शरीराचा, आत्म्याचा आणि चारही पुरुषार्थांचा आपल्यामध्ये विकास घडवून आणावा लागेल. यालाच ते एकात्म मानवविकास म्हणत असत. शरीराचा एक अवयव जरी दुबळा राहिला तरी त्याला प्रगतीच्या दिशेने वाटचाल करता येत नाही. त्याचप्रमाणे समाजाचा एखादा घटक दुबळा राहिला, दुःखी राहिला तरी समाजाची प्रगती साधता येणार नाही. म्हणून जो सर्वांत जास्त दुर्बळ असेल त्याला सर्वाआधी जास्तीत जास्त मदतीचा हात देणे क्रमप्राप्त आहे. याच तत्त्वाच्या पायावर दीनदयाळजींनी आपले आर्थिक चिंतन उभे केले. आपल्या शास्त्रपुराणांतही हेच सांगितलेले आहे की जिथे वैभव आहे, समृद्धी आहे तेथून ते वैभव, ती समृद्धी जेथे ती नाहीत तेथे नेण्याचा प्रयत्न करा. संपूर्ण मानवविकासाचा असा एकात्म विचार असल्याशिवाय हे होणे नाही. म्हणून आजच्या काळातही दीनदयाळजींनी महात्माजींच्या चिंतनाशी आणि आपल्या ऋषिपरंपरेच्या शिकवणुकीशी नाते सांगणारा जो एकात्म मानववाद सांगितला त्याची देशाला गरज आहे.

## ◻ व्यष्टी आणि समष्टी

दीनदयाळजींच्या या सिद्धान्ताचे आजच्या संदर्भात जास्त महत्त्व आहे. कारण त्यांचे चिंतन हे समकालीन समाजचिंतनाच्या मंथनाचा परिपाक आहे. समाजपरिवर्तन घडवू मागणाऱ्या प्रत्येक चळवळीला दीनदयाळजींच्या या एकात्म विकासचिंतनाच्या मार्गानेच जावे लागणार आहे. समकालीन समाजचिंतनात दोन प्रवाह दिसून येतात. एक विचारसरणी प्रत्येक व्यक्ती आधी बदलली पाहिजे, समाज ओघानेच बदललेला दिसेल असे मानणारी आहे. दुसरी विचारसरणी म्हणते, एकेका व्यक्तीत परिवर्तन करीत बसण्याची गरजच नाही. संपूर्ण समाज एकदम बदलून टाका की, त्यातील व्यक्ती आपोआपच तदनुसार बदललेल्या दिसतील. आपल्या भारतात मात्र व्यष्टी आणि समष्टी या दोहोंचाही एकाच वेळी एकात्म विकास साधला पाहिजे यावर भर देण्यात आलेला आहे. दीनदयाळजींनी ही समन्वित विकासाची कल्पनाच मांडली आहे. महात्मा गांधींनीही व्यक्ती आणि समाज या दोहोंचाही विचार केला आणि आपली योजना मांडली. दीनदयाळजींनीही आपल्या एकात्म मानवविकासाच्या सिद्धान्तात व्यक्ती आणि समाज या दोहोंच्याही समन्वित विकासावर भर दिला; पण तेवढा तात्त्विक भर देऊनच दीनदयाळजी थांबले नाहीत तर त्यांनी निवडलेल्या क्षेत्रात तशाच प्रकारचे जीवन जगणारे आदर्श कार्यकर्ते निर्माण केले.

## ◻ एकात्मविकास क्षेत्र

महापुरुष असतात ते एका पक्षाचे नसतात. महापुरुष हा सर्वसमावेशक समाजाला शाश्वत असे चिंतन देणारा सर्वमान्य नेता असतो. दीनदयाळजी त्या कोटीचे नेते होते. त्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी खेडोपाडी एकात्म आणि सर्वांगीण विकासाची ज्योत पोहोचविण्याची जी योजना दीनदयाळ शोध संस्थेतर्फे आखण्यात आली आहे ती या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा सर्वांना देणार आहे. ती योजना समाजातील दुर्बळ घटकांना सामर्थ्य देण्याचे दीनदयाळजींचे स्वप्न साकार करील आणि अशाच प्रकारच्या योजना प्रत्येक विकासगटात सुरू करण्याची प्रेरणा सामाजिक कार्यकर्त्यांना देईल असा मला विश्वास वाटतो. कारण कोणतेही चिंतन असो ते पोथीतून निघून शेतमातीत उतरल्याशिवाय कृतार्थ होत नसते. या योजनांच्या द्वारे एकात्म मानवविकासाचा दीनदयाळजींचा सिद्धान्त आता प्रत्यक्ष कृतीत उतरणार आहे हेच याचे महत्त्व आहे आणि ती योजना लवकरात लवकर पूर्ण करण्यानेच दीनदयाळजींच्या स्मृतीचे खरेखुरे स्मारक होणार आहे. ◻

**[ २६ सप्टेंबर ७७ रोजी विज्ञानभवनात दीनदयाळजयंती–समारंभाच्या अध्यक्षीय भाषणावरून ]**

# महर्षी

मो. ग. तपस्वी, नवी दिल्ली

होय. पं. दीनदयाळ उपाध्याय सर्व अर्थांनी आधुनिक भारतीय महर्षी होते. व्यक्तीचा किंवा व्यक्तीच्या सुख-सोयीचा विचार न करता समष्टीच्या कल्याणासाठी मूलगामी स्वरूपाचे मनन-चिंतन करून त्यांनी आधुनिक भारताच्या सर्वांगीण विकासासाठी इथल्या मातीत रुजू शकणारे एक सर्वस्पर्शी तत्त्वज्ञान दिले. त्या तत्त्वज्ञाना-वर युरोपीय विचारसरणीची छाप नाही. कोणत्याही आधुनिक तर्कशास्त्राचा पगडा नाही. ते विशुद्ध स्वरूपात भारतीय तत्त्वज्ञान आहे. एकात्म मानवविकास हे त्या तत्त्वज्ञानाचे सूत्र आहे. 'वादे वादे जायते तत्त्वबोध' याच न्यायाने त्याला एकात्म मानववाद हे नाव पडले आहे आज पं. दीनदयाळ उपाध्याय आपल्यात नाहीत. त्यांनी आपल्या प्रयत्नांनी आणि ज्ञाना-चिंतनाने खतपाणी घालून वाढवलेला भारतीय जनसंघही आज अस्तित्वात नाही; परंतु तरीही हे कृतज्ञ राष्ट्र दीनदयाळजींना विसरू शकत नाही आणि या चिरंतन कृतज्ञ-तेचे मूळ दीनदयाळजींनी भारताला दिलेल्या त्या 'एकात्म मानव-वादाच्या' अनमोल चिंतनात आहे.

दीनदयाळजींनी प्रतिपादिलेला एकात्म मानववाद आता संपूर्ण राष्ट्राचा ठेवा आहे. त्यांचा पक्ष जनता पक्षात विलीन झालेला असल्यामुळे आता त्या चिंतनाचे साद-पडसाद जनता पक्षाच्याही सामाजिक-आर्थिक विचारसरणीत नक्कीच उमटणार आहेत. ज्या-प्रमाणे दीनदयाळजींचा पार्थिव देह आता पंचतत्त्वात विलीन झालेला आहे, त्याचप्रमाणे जनसंघाचे संस्थारूपी शरीर नष्ट झालेले असून त्यांच्या चिंतनाने जनता पक्षाच्या स्वरूपात नवा देह धारण केलेला आहे. जनता पक्षात विलीन झालेल्या इतर घटक पक्षांपैकी ज्यांना ज्यांना स्वतंत्र असे चिंतन होते त्यांचे चिंतनही जनतापक्षात विलीन झाले असून जनता पक्षाची सामाजिक आणि आर्थिक धोरणे जसजशी स्पष्ट होऊ लागतील तसतशी त्या त्या चिंतनाची रगसगती रेखाबद्ध होऊन जनतेसमोर येणार आहे.

## विचार-नवनीत

याच संदर्भात दयाळजींच्या चिंतनाचा विचार केला तर या महा-पुरुषाने राष्ट्राच्या चिंतनशक्तीला किती मोलाचा हातभार लावला आहे ते लक्षात येते. 'एकात्म मानववाद' हे समकालीन विचार-प्रवाहांच्या मंथनातून घुसळून वर आलेले नवनीत आहे. तो विशुद्ध भारतीय विचार असल्यामुळे, इतर कोणत्याही विशुद्ध विचारा-प्रमाणेच तो कधीही नष्ट होऊ शकणार नाही. राजेशाही, लोकशाही, विभिन्न छटांचे समाजवाद, राष्ट्रवाद अशा चतुर्विध पाश्चात्य विचार-सरणींचे अंधानुकरण त्यात नाही. किंबहुना या सर्व विचारसरणींना आपल्यात सामावून घेऊन त्यांच्यापेक्षाही व्यापक असे एक संपूर्ण जीवनदर्शन एकात्म मानववादात आहे.. ते सर्व समावेशक असल्यामुळेच त्रिकालाबाधित सत्यासारखे चिरंतन आहे. परिस्थितीची प्रतिक्रिया एवढेच स्वरूप त्याला नाही. अशा तत्कालीन परिस्थितीच्या प्रतिक्रियेदाखल मांडण्यात येणाऱ्या चिंतनप्रवाहातील गतिमानता परिस्थिती बदलताच आटून जात असते. ते प्रवाह गोठून वाळून जात असतात. इतिहासाच्या कड्याकपारीवर त्यांच्या फक्त खुणा मागे राहतात. एकात्म मानववादाचे तसे नाही.

ब्रिटिशांचे राज्य चांगले दीड शतक येथे राहिले. त्यानंतरही इंग्रजांच्या संस्कृतीचा पगडा आणि प्रभाव आपल्या समाजधुरीणांवर इतका राहिला की, अजूनही तो पूर्णपणे गेलेला नाही. परिणामी आपला समाज आपल्या परंपरागत चिंतनधारांना पाठमोरा झाला. पाश्चात्य किंवा पौर्वात्य; परंतु युरोपीय विचारसरणींपैकीच आप-ल्याला कोणती जास्तीत जास्त ग्राह्य आहे याचाच विचार आपल्या विचारवंत म्हणविणाऱ्या विनीच्या लोकांनी केला. याचाच परि-णाम म्हणून आज आपली संसदीय प्रणाली, तिच्या कामकाजाचे नियम, लोकशाहीची कल्पना हे सर्व आपण ब्रिटिशांकडून वारसा म्हणून घेतले. आपल्या घटनाकारांना किंवा मनूच्या आधुनिक वंश-जांना आपल्या युगप्राचीन चिंतनधारेचा विसर पडला. स्वतंत्र भारता-तील लोकसत्ताक प्रणाली त्यांनी इंग्रजांकडून घेतल्याचे नमूदही करून ठेवले. दीनदयाळजींना हा आपल्या राष्ट्रीय अस्मितेचा अपमान वाटला.

## समकालीन चिंतनधारांचे मंथन

पाश्चात्यांचे अंधानुकरण दीनदयाळजींना फार वेदना देत असे जनसंघाचे अखिल भारतीय संघटनमंत्री (कार्यवाह) म्हणून १९५२ सरता सरता लखनौतील आपले वास्तव्य संपवून दीनदयाळजींनी दिल्ली हे आपले केंद्रस्थान केले. तेव्हापासून १९६७ मध्ये कालिकत अधिवेशनात ते जनसंघाचे अध्यक्ष झाले तेव्हापर्यंतच्या पंधरा वर्षांच्या प्रदीर्घ काळात दीनदयाळजींशी विविध विषयांवर चर्चा करण्याचे भाग्य मला लाभलेले आहे. त्या प्रत्येक चर्चेचा प्रसंग आज डोळ्या-समोर आणला तर त्यांची ही वेदना दिवसेंदिवस तीव्रतर होत चाल-ल्याचे आजही जाणवते. मला वाटते की, ११ फेब्रुवारी १९६८ रोजी मुगलसराय जंक्शनच्या रेल्वे-आवारात त्यांचा मृतदेह पडलेला आढळला तेव्हाही ती वेदना ते बरोबर वागवीतच होते. खाण्या-पिण्याची शुद्ध नाही. कपड्याबद्दल फारशी खास आवड-निवड नाही. एखादा आपल्याच तंद्रीत चिंतनमग्न असलेला योगी असावा तशा अवस्थेत पंडितजी नेहमी आढळायचे. म्हणूनच त्यांच्या या राहणीचा प्रभाव इतरांवर चटकन पडायचा आणि लहान असो, मोठा असो

पृष्ठ २९ वर



### कृतीची जोड असणारे रचनात्मक विचारांचे समन्वय केंद्र

# दीनदयाळ शोध संस्थान

सौ. प्रज्ञा तपस्वी, नवी दिल्ली

नवी दिल्ली, २६ जून १९७५ !

सकाळीच राणी झाशी मार्ग व देशबंधु गुप्ता मार्ग यांच्या संगमावर असलेल्या 'दैनिक मदरलॅन्ड'च्या कार्यालयासमोर पोलिसजमाव उभा होता. 'मदरलॅन्ड'ने एक पुरवणी काढून आदल्या रात्री जयप्रकाश, मोरारजी, अटलबिहारींसारख्या मोठमोठ्या पुढाऱ्यांना अटक झाल्याचे वृत्त छापले होते. त्यामुळे 'मदरलॅन्ड'ला पोलिसांनी टाळे लावले होते. 'मदरलॅन्ड'ला लागलेल्या कुलुपामुळं फक्त ते वर्तमानपत्रच बंद पडले नाही, तर बहुमोल समाजकार्य करणारी एक संस्थाही बंद पडली. कारण 'मदरलॅन्ड'चं कार्यालय त्या संस्थेच्या इमारतीत होते.

१९ महिन्यांच्या आणीबाणीनंतर सरकार बदलले, वृत्तपत्रावरील नियंत्रण उठले. 'मदरलॅन्ड'ला लागलेले कुलूपही उघडले; पण 'मदरलॅन्ड' दैनिक पुन्हा सुरू झाले नाही. ज्या संस्थेच्या इमारतीत 'मदरलॅन्ड' होते ती संस्था मात्र १९ महिन्यांची झळ वसूनही काही झालेच नाही अशा थाटात पूर्ववत कार्याला लागली. तिच्या बहुमोल कार्यापासून समाज वंचित झाला होता, ते पुनश्च सुरू झाले.

ती संस्था आहे 'दीनदयाळ शोध संस्थान.' नाव हिंदीत आहे. 'संस्थान' हा शब्द प्रतिष्ठान या मराठी अर्थाने वापरला आहे आणि 'शोध' याचा अर्थ आहे संशोधन. जनसंघाचे संस्थापक पं. दीनदयाळ उपाध्याय यांचे स्मारक उभारण्यासाठी जी समिती नेमली होती, त्या समितीने सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात संशोधन-कार्य करण्यासाठी असे प्रतिष्ठानच दीनदयाळजींचे स्मारक म्हणून उभारायचे ठरविले. त्या निश्चयाचे मूर्त रूप म्हणजे ही सशोधनसंस्था.

पं. दीनदयाळ उपाध्याय यांचा जन्म एका सामान्य घरात झाला; पण त्यांनी देशाला एक असामान्य नेतृत्व दिले. त्यांनी आपल्या निष्ठेने, कठोर परिश्रमाने जनसंघाच्या रोपाची जोपासना करून त्याचा वटवृक्ष बनविला. ते एक तत्त्वचिंतक होते. भविष्यावर नजर ठेवून मनुष्यमात्राच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, आध्यात्मिक विकासाचा त्यांनी विचार केला. त्यांचा हा विचार 'एकात्म मानववाद' या नावाने ओळखला जातो. त्यांनी दाखविलेल्या सन्मार्गाने देशाची वाटचाल व्हावी, त्यांनी दिलेल्या या चिंतनाची जोपासना व्हावी, त्यांचे स्वप्न साकार व्हावे यासाठी श्री. अटलबिहारी वाजपेयी, नानाजी देशमुख प्रभृती नेत्यांनी उभारलेले हे स्मारकभवन आहे.

### आत्माहुती !

वास्तविक ही वास्तु आत्माहुतीचे प्रतीक आहे. समष्टीसाठी व्यष्टीने केलेल्या त्यागाचे ते मूर्तिमंत स्मारक आहे. पं. दीनदयाळ उपाध्याय यांचे व्यक्तिगत जीवन 'राष्ट्राय इदं, न मम' या संस्कारांनी भारलेले होते. आत्माहुतीचे हे संस्कार त्यांनी रा. स्व. संघातून मिळविले. ते संघाचे प्रचारक होते. पं. दीनदयाळ यांच्या समग्र जीवन-चिंतनाचे शिल्पकार, द्वितीय सरसंघचालक श्री. गोळवलकर गुरुजी हे होते. त्याच श्री. गुरुजींनी संघकार्यासाठी हवे असूनही दीनदयाळजींना जनसंघासाठी दिले. संघाने दिलेली ती आहुतीच होती ! या दीनदयाळजींचा देह जेव्हा याच कार्यात असताना नष्ट झाला तेव्हा त्यांच्या या अपूर्व स्मारकाची वास्तुशांती करायला श्री. गुरुजीच आले होते. २० ऑगस्ट १९७२ रोजी दीनदयाळ स्मारकभवनाच्या उद्घाटनापूर्वी ते होम-हवन करीत असतानाचे चित्र आता देशभर 'आत्माहुती' या मथळयाने सुपरिचित झालेले आहे. आत्माहुतीतून हे स्मारक उभे राहिले. त्या आत्माहुतीची ज्योत अखंड राहावी म्हणूनच की काय, भवनाच्या दर्शनी मनोऱ्यावर एक ३० फुटी 'दीपज्योत' दगडात कोरलेली आहे. योगायोग असा की, ह्या स्मारकाचा पहिला वर्धापनदिन बघायला श्री. गुरुजी हजर नव्हते ! आणि ज्या जनसंघाने हे स्मारक बांधले तो जनसंघही आज अस्तित्वात नाही ! तो जनता पक्षात विलीन झाला आहे. आत्माहुति आणखी कशी असते ?

### विशाल वास्तु

ह्या विशाल वास्तूची कल्पना नानाजी देशमुखांची; पण वास्तुशिल्पाचा आराखडा 'मैत्रेयी वारयानी अॅन्ड माडद' ह्या कंपनीने तयार केलाय. भवन उभारायला सतत परिश्रम घेतले ते आहुजा अॅन्ड कंपनीने.

वास्तूत प्रवेश केल्यावर खालच्याच मजल्यावर समोर दीनदयाळजींचा अर्ध-पुतळा आहे. उद्घाटनाच्या दिवशी ह्या पुतळ्या-

समोरच प. पू. गुरुजींच्या हस्ते मोठे होम-हवन झाले होते. पुतळयाच्या पाठीशी असलेल्या भिंतीवर हिंदू संस्कृतीच्या प्रतिकांची म्युरल्स आहेत. इमारत सहा मजली आहे. खालचे दोन मजले एका व्यापारी कंपनीला व मुद्रणालयाला भाड्याने दिले आहेत. तळमजल्यावर लिफ्ट आहे. चौथ्या मजल्यावर एक बेताचे सभागृह आहे. त्यात २५० आसने आहेत. सभागृह वातानुकूलित आहे. सभागृहाच्या भिंतीवर हिंदूधर्माची सर्व प्रतीके-तुळशीवृंदावन, सूर्य, शंख, स्वस्तिक, कृपाण, त्रिशूळ काढलेली आहेत. व्यासपीठाच्या एका बाजूस सरस्वतीचे काचेवरील चित्र आहे, तर दुसरीकडे श्री. दीनदयाळ व डॉ. हेडगेवाराचे चित्र आहे: पाचव्या मजल्यावर वाचनालय व संस्थेचे कार्यालय आहे. सहाव्या मजल्यावर मेडिसिन बँक व संस्थेत येणाऱ्या पाहुण्यांसाठी बसायला दिवाणखाना व राहायला खोल्या आहेत. सर्वांत शेवटी गच्चीवर एक छोटीशी पुष्पवाटिका आहे.

अशा ह्या भव्य भवनात चालणारे कार्यही तितकेच भव्य-दिव्य आहे. पं. दीनदयालजींना वाटायचं आमच्या राजनैतिक, सामाजिक व आर्थिक विचारावर पाश्चिमात्यांचा जबरदस्त पगडा आहे. जोपर्यंत तो दूर होत नाही व आम्ही आमच्या प्राचीन आणि आधुनिक विचारप्रणालीचा समन्वय योग्य तऱ्हेने साधत नाही, तोपर्यंत आपण खऱ्या अर्थाने भारतीय ठरणार नाही. दीनदयाळजींनी भारतीयता जोपासली जावी म्हणून देशाला सामाजिक, आर्थिक, राजनैतिक चिंतन दिले. 'दीनदयाळ' हे एका व्यक्तीचे नांव नसून तो एक विचार आहे. एक चिंतन आहे. एक तत्त्व आहे. मूलभूत समस्यांचे निराकरण करण्यासाठी भारतीयतेची कास धरून मानवाचा एकात्म विकास साधला पाहिजे, या दीनदयाळजींच्या चिंतनाच्या आधारे मानव-कल्याणाचा मार्ग शोधणे, हे या संस्थानचे मुख्य कार्य आहे.

## संशोधन-कार्य

या संस्थेमध्ये चाललेले संशोधनकार्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आहे. १९ महिन्यांच्या त्या काळया कालखंडामुळे त्यात खंड पडला. संस्थेने आपल्या संशोधन-कार्यासाठी निरनिराळया संशोधनसंस्थांशी बंधुत्वाचे नाते जोडून त्यांची मदत घेतली आहे. अलाहाबाद विद्यापीठातील डॉ. मुरली मनोहर जोशी ( फिजिक्स ) व श्री. लखेरा ( संस्कृत ) ह्यांनी आणखी काही अभ्यासकांच्या मदतीने 'प्राचीन भारतीय मनीषाका वैज्ञानिक अवबोध' हा प्रोजेक्ट हाती घेतला आहे. मेरठ विद्यापीठातील डॉ. रामनाथ शर्मा ह्यांनी 'समकालीन भारतीय समाजदर्शनमें एकात्म मानववाद' हा प्रबंध लिहिलाय. हा प्रबंध प्रकाशनाच्या वाटेवर आहे. 'भारतीय तत्त्वज्ञान और आधुनिक विज्ञान-एक तुलनात्मक अध्ययन' हा प्रबंध डॉ. हरिचंद्र बर्थवाल ह्यानी लिहिला आहे. हा प्रबंध प्रकाशित झाला आहे कुरुक्षेत्र विद्यापीठातील डॉ. हिम्मतसिंह सिन्हा ह्यानी 'कम्युनिझम और कर्मयोग' ह्या विषयावर प्रबंध लिहिलाय. तो अजून प्रकाशित व्हायचा आहे!

डॉ. जगन्नाथ शर्मा- 'Medicine in Surgery' व डॉ. सुब्रह्मण्यम् स्वामी-Land reforms and Economic growth' या विषयावर लिहीत आहेत. असे निरनिराळया विषयांवर विद्वानांकडून प्रबंध लिहून घेण्याचे काम संस्था करीत आहे. ह्या कामासाठी लागणारा खर्च संस्थाच करते. अशा संशोधन कार्यात आस्था असणारे लोकही त्याला आर्थिक हातभार लावतात. ह्या संशोधन-कार्यामुळे पुढल्या पिढीला प्रत्येक गोष्टीसाठी पाश्चिमात्य देशांवर अवलंबून राहण्याची गरज राहणार नाही.

## वाचनालय

ह्या कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या पुस्तकांचे वाचनालय संस्थेत आहे. ही पुस्तके आवश्यकतेनुसार संस्थेने घेतली आहेत. काही देणगीच्या स्वरूपातही मिळाली आहेत. सध्या बरीचशी पुस्तके अलाहाबाद विद्यापीठाला संदर्भासाठी दिली आहेत. वाचनालय सार्वजनिक स्वरूपाचे नाही; पण गरजू विद्यार्थ्यांना वाचनालयात बसून संशोधनात्मक अध्ययन करण्यासाठी पुस्तके दिली जातात.

संस्था निरनिराळया प्रसंगी परिसंवादाचे आयोजन करते. नुकतेच 'बंगला-देश, भारत-रशिया मैत्री करार' यावर परिसंवाद झाले. झालेल्या परिसंवादावर लगेच पुस्तकेही प्रकाशित होतात. आतापर्यंत अशा प्रकारे प्रकाशित पुस्तकांची नावे :- Industrial India, Bangala Desh - Crisis and Consequences, Indo-Soviet Treaty - Reactions and reflections, Pt. Deendayal Upadhyay - A Profile अशी आहेत.

## निबंध-प्रतियोगिता

१९७२ मध्ये 'Auroffindo's message for To-day' ह्यां विषयावर एक निबंधप्रतियोगिता संस्थेतर्फे इंग्रजी आणि हिन्दी ह्या दोन भाषांत झाली होती. देशाच्या निरनिराळ्या प्रांतांतून एकंदर १५२ स्पर्धकांनी भाग घेतला. त्यांच्यापैकी ११६ इंग्रजी व ३६ हिन्दी होते. स्पर्धेचे परीक्षक- श्री. दिवाकर ( बंगलोर ), श्री. गोखले (मुंबई), श्री. परमेश्वरन ( कोचीन ), व डॉ. मुरली मनोहर जोशी ( अलाहाबाद ) हे होते. स्पर्धेसाठी ठेवण्यात आलेली पारितोषिके- प्रथम २००० रु. द्वितीय- १५०० रु, तृतीय. १००० रु. आणि चतुर्थ-५०० रु. ची होती. परीक्षकमंडळांच्या सांगण्यावरून प्रत्यकी २५० रु. ची आणखी तीन उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचा निकाल ७ ऑगस्ट १९७२ ला लागला, प्रथम क्रमांकाचे मानकरी बडोद्याचे श्री. जॉन पुलपरम्पील होते. त्यांचा निबंध इंग्रजीत होता व द्वितीय क्रमांक मेरठच्या डॉ. रामनाथ शर्मांना मिळाला. त्यांचा निबंध हिंदीत होता.

दुसरी निबंधस्पर्धा येत्या फेब्रुवारीत होणार आहे. निबंधाचा विषय- 'महात्मा गांधी, डॉ. लोहिया व दीनदयाळ' हा आहे. सर्वोत्तम निबंधासाठी ३००० रु. चे बक्षीस आहे.

## स्मृतिमंजूषा

'स्मृतिमंजूषे'च्या रूपात नुकतीच 'दीनदयाळ-व्यक्तित्व एवं जीवनदर्शन' ही डॉ. हरिश्चंद्र बर्थ्वालिलिखित पुस्तिका प्रसिद्ध झाली आहे. 'मंथन' हे त्रैमासिक इंग्रजी व हिन्दी भाषेत काढण्याचा संस्थेचा मानस आहे. ह्या त्रैमासिकासाठी निरनिराळ्या प्रांतातून विद्वानांचे लेख मागविण्यात येणार आहेत.

'दीनदयाल स्मारक' व्याख्यानमाला

लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

## ग्रामीण प्रकल्प

शोध संस्थानाने प्रामुख्याने हाती घेतलेले काम म्हणजे दीनदयाळजींच्या 'एकात्म मानववाद' या सुप्रसिद्ध सिद्धांतावर आधारित 'एकात्म ग्रामीण विकास योजना' होय. ह्या योजनेसाठी संस्थेने उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, हिमाचल प्रदेश, राजस्थान आणि बिहार या पाच राज्यांत प्रत्येकी एक जिल्हा आदर्श सर्वांगीण विकासासाठी निवडला आहे. ह्या योजनेची सुरुवात उत्तर प्रदेशातील गोंडा या जिल्ह्यात दीनदयाळजींच्या जयंतीनिमित्त करण्यात आली आहे. मध्यप्रदेशातील मंदसौर हा जिल्हा या योजनेसाठी निवडण्यात आला आहे. इतर तीन राज्यांतील जिल्ह्यांची निवड व्हायची आहे.

या योजना प्रत्येक जिल्ह्यात कित्येक लाख रुपयांच्या असतील. पाचही एकात्म विकासयोजनांचा एकूण खर्च कोटी-दीड-कोटीच्या घरात सहज जाईल. विशेष म्हणजे या विकासकार्यक्रमासाठी सरकारकडून एक पैसाही घेण्यात येणार नाही! योजना निश्चित कालावधीची नाही. तथापि निवडलेला जिल्हा सर्व बाबतीत स्वावलंबी बनावा हे या योजनेचे अंतिम लक्ष्य राहील.

अशा एकात्म विकास योजनेत ,जिल्ह्यातील प्रमुख केंद्रात धंदे-शिक्षणाच्या शाळा उघडण्यात येतील. तेथे मुलांना आणि प्रौढांना साक्षर करण्याबरोबरच त्या परिसरातील कच्च्या सामग्रीच्या आधारावर छोटे छोटे कुटीरउद्योग, लघु उद्योग सुरू करण्याचे शिक्षणही दिले जाईल. या शाळांतून अशी उद्योग केंद्रे नमुन्याखातर चालवली जातील. बहुतेक कुटीरउद्योग हे शेतीजन्य असतील. जिल्ह्याबाहेरून सामग्री आणून उद्योग चालवण्यात येणार नाही. यातील हेतू फावल्या वेळात गावातील बायामुलांनाही काही काम करून चार पैसे मिळविता यावेत, आपण स्वतः कमवू शकतो हा आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि तसे करताना सामाजिक एकतेची भावना वाढीस लावून एकात्म मानवविकास साधावा हा राहील.

यासाठी लागणारा पैसा संस्थान देईल आणि काही पैसा स्थानिक लोकांना स्वतःच उभा करावा लागेल.



**दीनदयाळ शोध संस्थानमधील मेडिसिन बँकेला भेट देत आहेत लोकसभापती न्या. के. एस. हेगडे. त्यांना माहिती देत आहेत श्री. नानाजी देशमुख. पाठीमागे खा. सुब्रह्मण्यम् स्वामी.**

साधारणपणे पाच-सहा वर्षात निवडलेले जिल्हे सर्व दृष्टीने स्वावलंबी करून दाखविता यावेत अशी कल्पना आहे. त्यासाठी गोंडा जिल्ह्याची प्राथमिक पहाणी करण्याकरिता दहा-बारा स्वयंसेवक गेलेले आहेत. हे स्वयंसेवक प्रत्येक घरी जात आहेत. समाजाची आर्थिक आणि सामाजिक पहाणी ते करत आहेत. कोणत्या गावात कुठे, कोणते कुटीरउद्योग सुरू करावेत, त्यासाठी तेथे कोणता कच्चा माल किती उपलब्ध आहे, गावात मुख्य कशाची गरज आहे, त्या गावातील किती मंडळी पोटापाण्यासाठी गाव सोडून इतरत्र गेली आहेत, शेती किती आहे, पिके कोणती घेतात, कोणती घेता येतील वगैरे सर्व पैलूंचा ते एकेका गावातील विकासक्षमतेचा आढावा घेत आहेत. दिल्लीच्या Council of Social Development सामाजिक विकास परिषदेने जे स्वयंसेवक पाठविले आहेत ते या विषयातील तज्ज्ञ आहेत. त्यांचा या पाहणी कामासाठी येणारा खर्च दीनदयाळ शोध संस्थान करीत आहे.

अशाच प्रकारच्या विशेषज्ञ स्वयंसेवकांच्या तुकड्या इतर प्रांतातही लवकरच जात आहेत. या तुकड्या साधारणपणे डिसेंबर-जानेवारीअखेर आपापले तपशीलवार अहवाल दिल्लीस पाठवतील. ते अहवाल देशांतील नामवंत समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ आणि नियोजनमंडळाच्या विशेषज्ञांकडे पाठविण्यात येतील. त्यांना या पाहणी-अहवालांच्या आधारे या पाच जिल्ह्यांसाठी वेगवेगळ्या ग्रामीण विकास योजना तयार करण्याची विनंती करण्यात येणार आहे.

ही विशेषज्ञ मंडळी मार्च महिन्यात आपापल्या सविस्तर योजनासह दिल्लीत दीनदयाळ शोध संस्थानांतर्फे योजण्यात यावयाच्या एका मोठ्या परिसंवादासाठी एकत्र येतील. या परिसंवादाच्या निष्कर्षानुसार जिल्हा विकासयोजनांना अंतिम स्वरूप देण्यात येऊन लगेच योजना सुरू करण्यात येतील. निव्वळ स्वयंसेवी माध्यमातून संपूर्ण जिल्हा स्वावलंबी करण्यासाठी, त्याचा एकात्म विकास घडवून आणण्याचा स्वतंत्र भारतातील हा पहिलाच प्रयत्न आहे.

## मेडिकल मिशन

राष्ट्र बलवान होण्यासाठी प्रत्येक मनुष्य बलवान असायला हवा; पण आपल्या देशात अधिकांश लोकांना आरोग्याचे ज्ञान नाही. शोध संस्थानाने लोकांत आरोग्यविषयक जागरूकता आणण्यासाठी १९७३ मध्ये 'मेडिकल मिशन'ची स्थापना केली. ह्या मिशनचा उद्देश दलितांची सेवा करणे व बलसंवर्धनाला हातभार लावणे हे होय. खेडोपाडी जाऊन आरोग्यज्ञानाचा प्रसार करणाऱ्या स्वयंसेवकांना प्रथमोपचाराचे प्रशिक्षण देण्यासाठी संस्थेतर्फे दर रविवारी वर्ग चालविले होते; परंतु मध्यंतरीच्या कृष्ण-कालावधीत ते बंद पडले आता पुनश्च सुरू होणार आहेत. दिल्लीच्या सीमेवर असणाऱ्या पांच खेड्यांना औषधे व मदत द्यायची

संस्थेची योजना सुरू झाली होती; परंतु दिल्लीत यदा आलेल्या भीषण पुरामुळे ही खेडी पाण्याखाली आली. त्यामुळे कार्यात खंड पडला. विवेकानंद मिशनच्या मदतीने हे कार्य नंतर सुरू झाले आहे. दुष्काळ, पूर, साथ अशा नैसर्गिक प्रकोपाच्या वेळेस पीडितांना वैद्यकीय मदत हे मिशन करीत असते. यंदा दिल्लीत आलेल्या पुराच्या वेळेसही पूरग्रस्तांना मिशनने प्रशंसनीय अशी वैद्यकीय मदत केली आहे.

मिशनने वैद्यकीय मदतीसाठी पाच केंद्रे— नजफगढ, राजोरी गार्डन, जहांगीरपुरी, नागलोई—येथे उघडली होती. ह्या केंद्रांतून पूर-पीडितांना सर्व प्रकारची वैद्यकीय मदत केली जायची. त्यासाठी मिशनतर्फे १६ डॉक्टर्स, ७ नर्सेस, ३६ प्रशिक्षित प्रथमोपचारक व ४३ स्वयसेवक खपत होते. सर्व केंद्रात मिळून ८४२८६ पीडितांची सेवा मिशनने केली. पाच जीपगाड्या, ॲम्ब्युलन्स सारख्या उपयोगात आणल्या गेल्या. ह्या वैद्यकीय मदतकार्याची व्यवस्था डॉ. जैन, डॉ. सुरेन्द्र नैय्यर व डॉ. सेठी पाहत होते. असे अमूल्य कार्य करून मिशन मानवजातीची सेवा करीत आहे

सामूहिक रूपात वैद्यकीय मदत देणे हा मिशनचा उद्देश आहे; पण एखाद्या गरिबाला औषधपाणी लागल्यास डॉक्टराच्या शिफारसीनुसार ते देण्यात येते. १९७७ च्या जुलै महिन्यात जयनारायण नावाच्या एका गरीब इसमाच्या हृदयाच्या ऑपरेशनसाठी निरनिराळ्या वर्तमानपत्रातून मदतीचे आवाहन करून मिशनने १० हजार रुपये देणगीच्या स्वरूपात प्राप्त केले. ह्या इसमाला लागणारे बाकी उपचार मिशन करतेय.

## मेडिसिन बँक

वाढत्या महागाईमुळे औषधाच्या किमतीही वाढल्या आहेत. अशी भारी औषधे गरीब माणसं घेऊ शकत नाहीत.अशा गोरगरिबांना मदत करण्यासाठी मिशनने एक 'मेडिसिन बँक'ही काढली. ही बँक १४ एप्रिल ७४ रोजी प. पू. गोळवलकर-गुरुजीच्या स्मरणार्थ स्थापन झाली. बँक म्हटली म्हणजे देवाणघेवाण आलीच. येथे येणारी औषधे ही डॉक्टरमंडळीकडूनच येतात. अशी औषधे पाठवा असे आवाहन करताच किती तरी डॉक्टरांनी औषधांच्या रूपाने मदतीचा हात पुढे केलाय. आवश्यकता पडली तर बँक औषधी कंपन्यांकडूनही औषधे मागविते. अशा ह्या बँकेच्या व्यवस्थापिका सौ. पद्मा जोशी आहेत व मेडिकल मिशनच्या अध्यक्षा ग्वाल्हेरच्या राजमाता विजयाराजे शिंदे व सेक्रेटरी डॉ. जैनेन्द्र-कुमार जैन आहेत.

मिशन वैद्यकीय विषयांवर परिसंवाद करते. नुकतेच 'कॅन्सर' व 'Ancient Indian Medicine' ह्या विषयावर सेमिनार्स झालेत.

'दीनदयाळ शोध संस्थाना'द्वारे चाललेल्या ह्या उदात्त व भव्य कार्याची धुरा श्री. परमेश्वरन् यांच्या खांद्यावर आहे. किती तरी स्वयसेवक येथे सेवाकार्य करीत आहेत.

## समन्वय केंद्र

राष्ट्रीय आणि आतरराष्ट्रीय जीवनाच्या महत्त्वाच्या सर्व पैलूंबाबत विस्तृत आणि सखोल संशोधन करणे हे ह्या संस्थेचे ध्येय आहे. सर्व साधनांनी युक्त असे रचनात्मक चिंतनाच्या सर्व प्रणालीचे एक समन्वय केंद्र म्हणून ते आपली भूमिका बजावणार आहे. बौद्धिक जगतामध्ये जी एक पोकळी निर्माण झाल्याचे भासत आहे, ती भरून काढणारा सर्व विधायक प्रतिभांचा सगम येथे व्हावा आणि त्यातून या देशातीलच नव्हे तर संपूर्ण विश्वामधली ती पोकळी भरून निघावी हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून इथला प्रत्येक कार्यकर्ता तन—मन—धन—पूर्वक झटतो आहे.

वास्तविक या समर्पित आणि सातत्यपूर्वक चालू असलेल्या प्रयत्नातून विधायक चिंतकांची पिढी तयार करणारे हे एक अनौपचारिक विद्यापीठ व्हावे आणि त्याने ह्या देशातील चिंतन-प्रक्रियेत आमूलाग्र क्रांती घडवून आणावी हे ह्या मंडळीनी उराशी बाळगलेलं स्वप्न आहे आणि ह्या दृष्टीने पाहिले तर पं. दीनदयाळ उपाध्याय ह्यांचे हे सर्वार्थाने आगळे असे स्मारक आहे. ☐

## वर्गणीदारांसाठी

वर्गणीदारांना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो. ज्यांना दिवाळी अंक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यांनी दि. २५।१०।७७ पूर्वी अडीच रुपये पाठवावेत.

अंक व्यवस्थित मोजून पोस्टाचे ताब्यात दिले जातात. तरीही अंक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी. अंक शिल्लक असेल तर अवश्य पाठवू.

ज्यांची वर्गणी २५ ऑक्टोबरपूर्वी संपत असेल त्यांनी वर्गणी लगेच रवाना करावी म्हणजे त्यांना दिवाळी अंक रवाना करता येईल.

जे वर्गणीदार कार्यालयातून दिवाळी अंक नेणार असतील त्यांनी २५।१०।७७ पूर्वी तसे कळवावे.

**—व्यवस्थापक**


उघड गुपित....?
तुम्हालाही
सांगायला हरकत नाही.
दुहेरी लाभ पदरात टाकणारी माझी
अभिनव योजना.
प्रॉव्हीडंट फंड, सीटीडी, आयुर्विम्याचे
हप्ते वगैरेमध्ये गुंतविलेल्या रकमांवर
प्राप्तीकरांतून आकर्षक सूट मिळते.
परंतु यापैकी फक्त आयुर्विम्याद्वारा करांतील
सवलतीबरोबरच विमा उतरलेल्या
दिवसापासून संरक्षणाची हमी मिळते.
व मनात आणाल तेवढ्या रकमेची इस्टेट
निर्माण करता येते.
आयुर्विम्याच्या हप्त्याद्वारा करामध्ये
मिळणाऱ्या भरघोस सवलतीची अधिक -
माहिती मिळविण्यासाठी आजच आपल्या
एजंटाकडे चौकशी करा.
आयुर्विम्याला पर्याय नाही
लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया
PRATIBHA-LIC-1156/77 MAR.

# एकात्म मानववादी आर्थिक तत्त्वज्ञान

प्रा. दिनकर बोरीकर, औरंगाबाद

दीनदयालजी उपाध्याय यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाची ओळख केवळ एक अभ्यासक या भूमिकेतून येथे करून दिली आहे; विचारक किंवा प्रचारकाच्या भूमिकेतून नव्हे. त्यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाची ओळख करून घेताना त्यांनी मांडलेला एकात्म मानववादाचा विचार अपरिहार्यपणे समजावून घ्यावा लागतो.

दीनदयालजी सर्वस्पर्शी प्रज्ञा असलेले प्रतिभावंत होते हे निर्विवाद. मानवी जीवनाचा व मानवी प्रश्नांचा साकल्याने विचार करणारे विचारवंत होते ते. तसं त्यांच्या हातून लिखाण फारच कमी झालं. आर्थिक क्षेत्रात हे विशेष करून जाणवते; परंतु जे लिखाण त्यांनी केले त्यातून त्यांचे चिंतनशील मनच दिसून येते. संघटनकार्याच्या प्रत्यक्ष धकाधकीत राहून चिंतनशील राहणाऱ्या व्यक्ती फारच कमी असतात. त्यात दीनदयालजींचा क्रम लागतो.

पाश्चात्यांची उधार उसनवारी न करता या देशाचे प्रश्न याच देशाच्या मातीतून सोडविले पाहिजेत असा विचार करणारे महात्मा गांधी, डॉ. राममनोहर लोहिया, विनोबाजी भावे, जयप्रकाश नारायण यांच्याबरोबरच दीनदयालजींचेही नाव घ्यावे लागेल.

दीनदयालजींच्या आर्थिक विचारांची ओळख करून घेताना त्याचे दोन भाग पाडता येतील. एक आहे आर्थिक विचारांविषयी मूलभूत चिंतन व दुसरा भाग आहे भारताच्या आर्थिक प्रश्नांसंबंधीच्या व्यावहारिक चिंतनाचा.

त्यांचे आर्थिक विचार वाचताना मला आठवण झाली ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ आल्फ्रेड मार्शल आणि लिनल रॉबिन्स यांची. मार्शलनी अर्थशास्त्राच्या स्वरूपाविषयी विचार करताना मानवी व्यवहारांसंबंधी वर्गीकरणात्मक दृष्टिकोण घेतला होता. अर्थशास्त्र मानवाच्या आर्थिक व्यवहारांचे विवेचन करते अशी भूमिका त्यांनी मांडली होती. खरे पाहता असे वर्गीकरण वास्तवतेला धरून नाही.

लिनल रॉबिन्सने अर्थशास्त्र मानवी उद्दिष्टांच्या बाबतीत तटस्थ असते असे म्हटले होते. हाही विचार तसा अनर्थवादी ठरतो. दीनदयाळजींनी या दोघापेक्षा निराळा विचार केला होता.

मानवाचा व त्याच्या व्यवहाराचा वर्गीकरणात्मक विचार बरोबर नसल्यामुळे समग्र मानव हाच विचारात घ्यावा लागतो असे त्यांचे मत होते. तसेच अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्र असल्यामुळे मानवाच्या व मानवी समाजाच्या उद्दिष्टाबाबत तटस्थ असू शकत नाही. उलट अर्थशास्त्र मानवी स्पर्श असल्याशिवाय पूर्ण होणारच नाही असाही आग्रह त्यांनी धरला होता.

मानवाचे आर्थिक प्रश्न त्याच्या जीवन-संस्कृतीतून निर्माण झालेले असतात हा त्यांचा विचार त्यांना अर्थवाद (Economism) मान्य नव्हता हेच दर्शवितो. येथे त्यांनी कार्ल मार्क्सपेक्षा निराळा विचार मांडला असे म्हणता येईल. आर्थिक नियतीवादातून (Economic determinism) मानवाचे सर्व प्रश्न सुटतील अशा भ्रमात ते नव्हते. उलट केवळ अर्थवादातून मानवाचे प्रश्न सुटणार नाहीत तर त्यासाठी व्यापक सांस्कृतिक क्रांतीची आवश्यकता आहे असे त्यांनी प्रतिपादन केले होते.

संस्कृतीच्या बाबतीत त्यांनी तीन सांस्कृतिक विचारधारांचा उल्लेख केला होता. एक संस्कृतिवादी, द्विसंस्कृतिवादी व बहुसंस्कृतीवादी. द्विसंस्कृतीवादी, हिंदू व मुस्लिम अशा दोन संस्कृती भिन्न आहेत असे मानतात. तर बहुसंस्कृतीवादी भारतातील प्रत्येक प्रांताची स्वतःची भिन्न संस्कृती आहे असे मानतात. या दोन्ही विचारधारा भारतीय समाजाचे प्रश्न सोडवू शकत नाहीत. म्हणून एक संस्कृती—एक राष्ट्र या एकसंस्कृतिवादाचा त्यांनी पुरस्कार केला होता. जे जे भारतीय आहे त्याचे आपण जतन केले पाहिजे. या अर्थाने आपल्या अर्थनीतीचे भारतीयीकरण झाले पाहिजे, भारतीयीकरण हा शब्द उच्चारल्याबरोबर आपण बिचकून जायचे कारण नाही. साध्यानुरूप आपली साधने असावीत हा त्यांनी मांडलेला भारतीयीकरणाचा अर्थ वादग्रस्त होण्याचे काहीच कारण नाही.

आज जगात स्थूलमानाने भांडवलशाही व समाजवाद अशा दोन विचारांचा प्रभाव दिसून येतो. भांडवलशाहीने व्यक्तिस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य दिले; परंतु भाकरीची शाश्वती दिली नाही. समाजवादाने भाकरीची शाश्वती दिली परंतु व्यक्तिस्वातंत्र्याचा बळी घेऊन, असे मानले जाते. आपणास भाकरी आणि स्वातंत्र्य दोन्हींची गरज आहे. या दृष्टीने लोकशाही समाजवादाचा पुरस्कार केला जातो; परंतु दीनदयालजींना लोकशाही व समाजवाद या दोन गोष्टी एकत्र नांदू शकतील असे वाटत नव्हते.

### चार पुरुषार्थ

हिंदू जीवनादर्शच विश्वाच्या समस्यांचे निराकरण करील व त्यासाठी धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांचा आपण आधार घेतला पाहिजे अशी त्यांची धारणा होती. महात्मा गांधी, विनोबाजी, जयप्रकाश, राजगोपालाचारी यांनी मांडलेली विश्वस्ताची कल्पना या संदर्भात त्यांना हिंदू तत्त्वज्ञानानुसारच आहे असे वाटत होते.

धर्मराज्य, प्रजासत्ताक, सामाजिक समानता व आर्थिक विकेंद्रीकरण हीच आपली प्रमुख उद्दिष्टे असली पाहिजेत. अर्थात या सगळ्याला हिंदुत्ववादच म्हणा असा त्याचा आग्रह नव्हता. मानवतावाद किंवा इतर कोणत्याही नावाने या विचाराला सबोधता आले असते.

भांडवलशाही असो किंवा समाजवाद, दोन्ही व्यवस्थात मानव व्यवस्थेचा गुलाम बनला आहे. आपल्याला व्यवस्थेचा साधन म्हणून वापर करायचा आहे. आपले साध्य असले पाहिजे एकात्म मानवाचे. या कल्पनेचा विस्तार करताना त्यांनी असाही विचार मांडला, की मानवी जीवनाचा विभागशः विचार न करता त्याच्या भौतिक आणि आध्यात्मिक उन्नतीची आपण सांगड घातली पाहिजे. विकेंद्रित समाजरचनेत हे सहज शक्य होते. राजकीय लोकशाहीसाठी आपण राजकीय विकेंद्रीकरण स्वीकारले, परंतु आर्थिक लोकशाहीसाठी आर्थिक विकेंद्रीकरण अद्यापि आपण स्वीकारले नाही. कोणत्याही प्रकारचे केंद्रीकरण व्यक्तीच्या रचनात्मक क्षमतेस मारक ठरत असते हा त्यांचा विचार या संदर्भात उचितच ठरतो.

श्रम म्हणजेच काम करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे व तीच आपली संस्कृती आहे. प्रत्येकाला काम उपलब्ध करून देणे हे शासनाचे आद्य कर्तव्य आहे. एकदा ही दिशा आपण स्वीकारली की विकेंद्रीकरणाकडे अपरिहार्यपणे वळावे लागते. हा विचार दीनदयालजींनी निराळ्या स्वरूपात सूत्ररूपाने खालीलप्रमाणे मांडला.

ज×क×य = इ

या सूत्रात 'ज' म्हणजे काम करण्याची पात्रता असलेल्यांची सख्या. 'प्रत्येकास काम' या दृष्टीने 'ज' महत्त्वाचा ठरतो. 'क' काम करण्याच्या व्यवस्थेचा व 'य' यंत्राचा द्योतक आहे. 'इ' समाजाची प्रभावी इच्छा दर्शवितो. त्यांच्या मते 'इ' ची वृद्धी होताच आपले प्रश्न सुटायला लागतील; पण 'इ' सहजासहजी वाढत नाही. कारण 'इ' समाजाच्या क्रयशक्तीवर अवलंबून असते. क्रयशक्ती ही उत्पादनवाढ व संपत्तीचे समीकरण यावर अवलंबून असते. त्यासाठी 'ज' चे अत्यंत महत्त्व आहे. म्हणजे अनुरूप बदल व्हायला हवा तो 'क' व 'य' मध्ये; परंतु दुर्दैवाने आजच्या स्थितीत 'य' हाच घटक सर्वांचे नियंत्रण करीत आहे. ही नीती बदलली पाहिजे असे दीनदयालजींना आग्रहाने वाटत होते: याचा अर्थ मनुष्य, श्रम व यंत्र या तिघांचा उचित समन्वय साधणे हाच आपल्या अर्थव्यवस्थेचा प्रमुख उद्देश असला पाहिजे.

आज आपण पाश्चात्य सिद्धान्तांचे व तंत्राचे अंधानुकरण करीत आहोत; परंतु आपले जीवनादर्श, देश व काळ यातील भिन्नता लक्षात घेऊन आपल्या आर्थिक उन्नतीचे मार्ग आपण शोधले पाहिजेत. मार्शल, मार्क्स किंवा माओ आपल्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकतील अशा उधारी बुद्धीने आपण वागण्याचे काहीच कारण नाही.

## भौतिक-अध्यात्मिक अविरोध

सर्वोदयाने अशी उत्तरे शोधण्याचा प्रयत्न जरूर केला; परंतु त्यांची उत्तरे भूदानासारख्या चळवळीच्या रूपाने पुढे आली. चळवळ ओसरली अन् उत्तरे मागे पडली.. विचाराची पीछेहाट झाली. आपण आपल्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा विचार करून नंतरच भारतीय अर्थव्यवस्थेचे विवेचन करावयास हवे. या संदर्भात विचार करू जाता भारतीय सस्कृती अध्यात्मप्रधान असून ती भौतिक जीवनाविषयी उदासीन आहे अशी आपली भ्रममूलक धारणा झाली आहे असे त्यांचे मत होते. अध्यात्मिकता व भौतिकता यांच्यात आपल्या संस्कृतीत तरी परस्परविरोध नाही. कारण आपल्या संस्कृतीत भौतिक समस्यांचा देखील विचार केलेला आहे हे पटवून देण्यासाठी ...'सुखस्य मूलं धर्मः। धर्मस्य मूलं अर्थः' हे चाणक्याचे वाक्यही त्यांनी उद्‌धृत केले होते. यात धर्म या शब्दाची भीती बाळगण्याचे कारण नाही. *ज्या व्यवस्थेमुळे समाजाचे भरण–पोषण होत असेल* व मानवाच्या ऐहिक व अध्यात्मिक उन्नतीस साह्य होत असेल तो धर्म होय असा धर्माचा अर्थ त्यांनी लावला होता.

आज जगात संपत्तीच्या बाबतीत दोन टोके दिसून येतात. संपत्तीचा प्रभाव आणि संपत्तीचा अभाव दोन्ही अवस्थेत मानवी संस्कृतीचा ऱ्हासच होतो. सपत्ती केवळ साधनरूपी माध्यम मानले पाहिजे. त्यासाठी समाजात संपत्तीसबंधी एक योग्य व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे. भारतीय संस्कृतीत यालाच 'अर्थायाम' असे म्हटले आहे. श्रमिकाने केलेल्या श्रमाची प्रतिष्ठा त्याला मिळणाऱ्या वेतनाच्या रूपाने मोजली जाऊ नये. तर केवळ कर्तव्यपूर्तीच्या सदर्भात ती प्रतिष्ठा मोजली जावी. वेतनाचा विचार श्रमाचा मोबदला म्हणून न करता त्याच्या कुटुंबाच्या उपजीविकेची सोय म्हणून केला जावा. याचा अर्थ माणूस केवळ अर्थपरायण व्यक्ती आहे हा विचार त्यांना मान्य नव्हता. दुर्दैवाने पाश्चात्य विचारसरणी माणसाला केवळ अर्थपरायण प्राणी मानते व त्या विचारसरणीचा आपल्यावर भरपूर प्रभाव पडला याची त्याना व्यथा वाटायची.

ज्याला आपण प्रथमदर्शनी आर्थिक व्यवहार म्हणतो त्याच्या राजकीय, सामाजिक, सास्कृतिक अशा किती तरी बाजू असतात; पण विविध सामाजिक शास्त्रे फक्त आपापल्या दृष्टिकोनातूनच माणसाचा व त्याच्या प्रश्नाचा विचार करतात. त्यामुळे मानवी समस्याचे एकांगी विश्लेषणच पुढे येते. म्हणून शास्त्रांचे काल्पनिक *जग आणि माणसाचे प्रत्यक्ष जग याच्यात* जमीन-अस्मानाचे अतर आढळून येते. भारतीय संस्कृतीत हा एकांगीपणा टाळला आहे अशी त्यांची श्रद्धा होती. मानवी जीवनाचा पृथक पृथक विचार न करता साकल्याने विचार केलेला आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ परस्परांना पूरक आहेत. एक टाळून दुसरा पुरुषार्थ श्रेष्ठ, अशी त्यात भूमिका नाही. हे चार पुरुषार्थ चार विद्यांच्या अभ्यासाने प्राप्त होतात असे कौटिल्याने म्हटले आहे. आन्विक्षकी, त्रयी, वार्ता व दंडनीती या त्या चार विद्या होत. या चार पुरुषार्थांकडे डोळेझाक करणारी अर्थव्यवस्था यशस्वी होऊ शकत नाही. कारण तशी अर्थव्यवस्था माणसाला उपक्रमशीलतेला प्रेरित करू शकत नाही.

दीनदयालजीचे अर्थव्यवस्थेविषयीचे मूलभूत चिंतन अशा स्वरूपाचे होते. त्यांना अभिप्रेत असलेला एकात्म मानववाद अशा स्वरूपाचा होता.

## विकासक्रम

प्रत्यक्ष भारतीय अर्थरचनेविषयी विचार करताना प्रचलित

आर्थिक नियोजनातील उणीवा दीनदयालजींनी दाखविल्या व तसे करत असतानाच स्वतःची भावात्मक भूमिकाही माडली होती.

भारताच्या आर्थिक विकासात प्रथम शेती, द्वितीय उद्योगधंदे, तृतीय व्यापार व वाहतूक आणि चतुर्थ सामाजिक सेवाक्षेत्र– असा अग्रक्रम त्यांनी सुचविला. ज्या देशात ८० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागातून राहाते, ७० टक्के लोकसख्या उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलबून आहे व एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४० ते ५० टक्के उत्पन्न शेतीतून मिळते अशा देशाच्या आर्थिक विकासात शेतीला प्राधान्य दिले जाणे उचितच ठरते. शेतीची उपेक्षा आत्मघातकी ठरू शकते. शेतीची प्रगती म्हणजे औद्योगिक विकासाची उपेक्षा असा गैरसमज असल्यास तो दूर व्हावा. उलट शेतीचा विकास औद्योगिक विकासाची पूर्व अट आहे असे म्हणावे लागेल. कारण एक तर औद्योगिक विकासासाठी आवश्यक असलेल्या कच्च्या मालाची उपलब्धता शेतीच्या विकासावर अवलबून आहे. दुसरे म्हणजे शेतीच्या विकासामुळे ७० टक्के लोकसख्येच्या क्रयशक्तीत सुधारणा होऊन औद्योगिक मालाला व्यापक बाजारपेठ मिळू शकेल.

औद्योगिक विकास कोणत्या धर्तीवर असावा याचीही दखल दीनदयालजींनी घेतली होती. विराट उद्योगधंद्यांनी आपले प्रश्न सुटू शकणार नाहीत असे त्याना वाटे. याची त्यांनी अनेक कारणें दिली. त्यातील महत्त्वाची कारणे अशी सांगता येतील–मोठे उद्योगधंदे आपल्या संस्कृतीशी असंबद्ध आहेत. ते आपल्या समाजजीवनाशी एकरूप होऊ शकणार नाहीत. मोठ्या उद्योगांनी आपले ग्रामीण उद्योग नाश पावून ग्रामीण अर्थव्यवस्था मोडकळीस येते. प्रत्येकाला काम देणे हे आपलें महत्त्वाचे उद्दिष्ट मोठ्या उद्योगांनी साध्य होऊ शकत नाही. मोठ्या उद्योगांचा विकास आयातीवर अवलंबून असतो व त्यामुळे देशच परावलबी बनतो. मोठ्या उद्योगांमुळे विकृत संस्कृती निर्माण होते. केंद्रीकरण जन्माला येते. त्यातून अमानुष नागरी जीवनाचे प्रश्न निर्माण होतात. मालक–मजूर वर्गसघर्ष समाजात तणाव निर्माण करतो. पाश्चात्य देशांना वसाहतवादाचा फायदा मिळाला म्हणून त्यांचे मोठे उद्योग पोसले गेले. आपण मुळातच वसाहतवादी व नववसाहतवादी शोषणाच्या विरुद्ध आहोत. मोठे उद्योगधंदे देशाच्या काही भागातच केंद्रीभूत होणार व ती परिस्थिती देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने धोकादायक ठरते आणि महत्त्वाचे कारण म्हणजे मोठ्या उद्योगांचा विकास ग्रामीण भारताची उपेक्षा करूनच करावा लागेल.

या सर्व कारणांमुळे त्यांनी लघुउद्योग व विकेंद्रीकरणाचा पुरस्कार केला होता. लघुउद्योग, देशाचे प्रश्न सोडविण्याऐवजी त्यात भरच टाकतील असे म्हटले जाते; परंतु प्रत्यक्ष पुराव्याच्या आधारे हे मत टिकणारे नाही. एका कामगारामागे स्थिर भांडवल किती लागते ? लघुउद्योगात रु. ६,९९६/–, मध्यम उद्योगात रु. ८,१९७/– व विराट उद्योगात रु. ५२,८८३/– असे ते प्रमाण आहे. दर भाडवली एकेका मागे उत्पादनमूल्यवृद्धी किती होते ? लघुउद्योगात ०·७०, मध्यम उद्योगात ०·७६ व विराट उद्योगात ०·२० अशी होते. याचा अर्थ रोजगारनिर्मितीक्षमता व भाडवली उत्पादनक्षमता या दोन्ही कसोटयावर लघु व मध्यम उद्योगधंदे आपल्याला परवडण्यासारखे आहेत असेच दिसून येते.

सार्वजनिक उद्योग व खाजगी उद्योग या दोन्हींचे सहअस्तित्व त्याना मान्य होते; परंतु सार्वजनिक उद्योग सर्व रोगावरील एकमेव रामबाण उपाय आहे ही भूमिका त्याना मान्य नव्हती. सरंक्षण-साहित्य व मूलभूत जड उद्योग सार्वजनिक क्षेत्रात व इतर सर्व उद्योग खाजगी क्षेत्रात असावेत ही त्यांचीं भूमिका.

आर्थिक नियोजनाचा त्यानी स्वीकार केला होता. प्रश्न फक्त आपल्या नियोजनाचे स्वरूप काय असावे ? रशियातल्यासारखें Micro व Total planning उपयुक्त नाही. तसेच पाश्चात्य देशातल्यासारखे स्थूल Micro planning सदोष राहील असे त्यांना वाटे. कारण दोन्ही प्रकारात 'माणूस' हरवून जातो. आपल्या देशात माणसाला केंद्र मानून विकेंद्रित आर्थिक नियोजन आखले पाहिजे याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली होती. राज्याने प्रत्यक्ष व्यवहार हाती घेण्याऐवजी नियमनाची भूमिका घ्यावी. यातूनच भारतीय आर्थिक विकासाची भावी दिशा आपणास सापड शकेल असे दीनदयाळजींना वाटे.

एका कार्यमग्न चिंतनशील व्यक्तीच्या एकात्म मानववादी आर्थिक तत्त्वज्ञानाचा हा धावता परिचय आहे. आज दीनदयाळजी असते तर त्यांनी निश्चितच मोलाची भर घातली असती. कारण शासन व परिस्थिती त्यांच्या विचारांना अनुकूल अशी आहे.

□


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक

प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे

किमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर । पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

# दोन मुलाखती

**भारतीय मजदूरसंघाचे प्रमुख श्री. दत्तोपंत ठेंगडी व जनता पक्षाचे सरचिटणीस श्री. नानाजी देशमुख यांचेसमोर चर्चेसाठी पुढील प्रश्न स्थूलमानाने ठेवले होते. या प्रश्नांच्या आधारे त्यांनी केलेली चर्चा म्हणजेच या मुलाखती.**

१ : दीनदयाळजी रा. स्व. संघ आणि जनसंघ यांच्या संस्कारातून वाढले. त्यांनी एकात्म मानववादाचा सिद्धान्त मांडला. हा सिद्धान्त म्हणजे हिंदुत्ववादाचे फक्त नवं नामकरण होतं अस आपल्याला वाटतं की त्याचं एक विकसित रूप होतं ?

२ : दीनदयाळजी जनसंघाचे संस्थापक मानले जातात. आता जनसंघ जनता पक्षामध्ये विलीन झाला आहे मग, आता दीनदयाळजींनी पुरस्कृत केलेला 'एकात्म मानववाद' आणि जनता पक्षातर्फे मांडला गेलेला गांधीवादी समाजवाद या दोन्हींचा मेळ कसा घातला जात आहे ?

३ : दीनदयाळजींच्या आर्थिक चिंतनाचं आणि कार्यक्रमाचं विकेंद्रीकरण हे एक प्रमुख सूत्र आहे. जनता पक्षदेखील विकेंद्रीकरणावरच भर देत आहे. विशेषतः चौधरी चरणसिंगही विकेंद्रीकरणच आणू इच्छितात. मग दीनदयाळजींनी मांडलेली विकेंद्रीकरणाची कल्पना आणि जनता पक्षाने मांडलेली विकेंद्रीकरणाची कल्पना यात फरक काय आहे ?

४ : डॉ. लोहिया आणि श्री. दीनदयाळजी कशामुळे आणि कशा पद्धतीने परस्पराच्या जवळ आले ? आपल्या परपरांविषयी ह्या दोघांच्या दृष्टिकोनामध्ये साम्य काय होत ? फरक काय होता ?

५ : आमच्या प्रचलित समाजव्यवस्थेमध्ये व्यक्तीवर राजकारणी संस्थांचा बराच प्रभाव आढळतो. हा प्रभाव कशा तऱ्हेने कमी करता येईल ?

६ : जयप्रकाशजींनी सुरू केलेली संपूर्ण क्रांती आणि दीनदयाळजींचा एकात्म मानववाद याचा परस्पराशी कसा संबंध आहे ? या दोन्ही तत्त्वांच्या सकल्पनेमध्ये पक्षविरहित लोकशाहीचा सिद्धात मांडलेला आहे. ही पक्षविरहित लोकशाही सद्य.स्थितीमध्ये शक्य आहे काय ?

७ : संपूर्ण क्रातीमध्ये कल्पिलेला संपूर्ण मानव आणि दीनदयाळजींच्या कल्पनेतील एकात्म मानव, या दोन विचारांपैकी आपल्या मते समाजपरीवर्तनासाठी कोणता विचार अधिक उपयुक्त आहे ?

८ : जयप्रकाशजीही समाजाच संघटन करू इच्छितात. दीनदयाळजीही एक संघटनाच बांधत होते. या दोन संघटनाबांधणीतील साम्य व भेद.

## हा रस्ता तसा लांबचा आहे; पण तोच जर एकमेव रस्ता असेल तर मग तोच जवळचाही आहे

**मुलाखत : श्री. दत्तोपंत ठेंगडी**
**भारतीय मजदूर संघ**

### १ : नवीन आविष्कार

हिंदुत्ववाद या नावाचा कोणताही वाद अस्तित्वात नाही. सृष्ट्यैक (सर्व सृष्टी एकच आहे.) जीवनाविषयी हिंदूंनी ज्या संपूर्ण तत्त्वज्ञानाचे दर्शन घेतले त्यालाच कदाचित नवीन इझम्स किंवा वादांच्या परिभाषेत हिंदुत्ववाद हे नाव देण्यात आले. वास्तविक कोणत्याही इझमच्या किंवा वादाच्या चौकटीत बसणारे हे सर्वांगीण सर्वंकष जीवनतत्त्वज्ञान नाही. त्यामुळे कोणत्याही सिद्धान्ताला हिंदुत्ववादाचे नवे नामकरण असे म्हणता येणार नाही, परंतु ही गोष्ट खरी की एकात्म मानववाद म्हणजे हिंदूंच्या सनातन जीवनतत्त्वज्ञानाचाच नवीन आविष्कार आहे.

### २ : मूलस्थान एक आहे

जनता पार्टीद्वारा प्रस्तुत गांधीवादी समाजवादाचे स्वरूप अजून स्पष्ट झालेले नाही. गांधीवादाचे स्वरूप स्पष्ट आहे. गांधीवादाचा पाया हा सनातन हिंदू विचारधारा हाच होय. त्यामुळे गांधीवाद आणि एकात्म मानववाद हे एकाच दिशेने जाणारे आहेत; परंतु महात्माजींना ते कामामध्ये अतिशय मग्न असल्यामुळे आपल्या तत्त्वज्ञानाच्या सर्व पैलूंवर प्रकाश टाकायला वेळ मिळाला नाही, तसेच दीनदयाळजींनाही आपल्या कार्यमग्नतेमुळे आपल्या तत्त्वज्ञानाचा पूर्ण आविष्कार करायला वेळ मिळाला नाही. तरीही दोघांचे मूळ स्थान एकच आहे आणि दोघांची शैलीही एकच आहे.

### ३ : चरणसिंहजींची योजना

जनता पार्टीची विकेंद्रीकरणाची कल्पना अजून स्पष्ट झालेली नाही. चौधरी चरणसिंह यांनी जी विकेंद्रीकरणाची कल्पना मांडली

आहे तीत आणि पं. दीनदयाळजीची कल्पना यात साम्य आहे; परंतु चरणसिंहजींनी सादर केलेला मसुदा अजून अंतिम मान्यता पावलेला नाही. जनता पक्षाने तो अद्याप मजूर केलेला नाही. त्यामुळे जनता-पार्टीच्या विकेंद्रीकरणाच्या कल्पनेशी दीनदयाळजींची विकेंद्रीकरणाची कल्पना किती मेळ पावते हे आताच सांगता येणार नाही.

### ४ : क्षमस्व !

डॉ. लोहिया यांच्या तत्त्वज्ञानाबद्दल अधिकृतपण बोलण्याचा मला काहीही अधिकार नाही. त्याविषयी माझे पूर्ण अध्ययन आणि चिंतन झालेले नाही. म्हणून लोहिया आणि दीनदयाळ यांच्या विचारात समानता किंवा वैधर्म्य किती आहे ते सागणे मला शक्य नाही.

### ५ : युगोस्लाव्हियातील प्रयोग

पश्चिमी सभ्यतेला अनुसरून राजनीतीचा प्रभाव आजच्या समाजजीवनावर फार मोठया प्रमाणावर आहे ही गोष्ट खरी आहे. यावर अंकुश घातला नाही, तर हा प्रभाव अधिक वाढत जाण्याची शक्यता आहे हा प्रभाव कमी करणे हे समाजजीवनाच्या आणि व्यक्तिजीवनाच्या सत्त्वतेच्या दृष्टीने आवश्यक आहे. पश्चिमेकडील देशांत राजकारणाचा किंवा राजकीय हेलकाव्याचा प्रभाव व्यक्तिजीवनावर फारसा पडत नाही आणि तिकडे राजकारणात रस असलेली मंडळीच फार कमी असतात. असे असताना पश्चिमी सभ्यतेच्या अनुकरणातून आपल्याकडील व्यक्तिजीवन किंवा समाजजीवन राजकारणाने प्रभावित झालेले आहे असे कसे मानता येईल असा प्रश्न येथे उपस्थित होऊ शकेल; परंतु त्याचे एक कारण असे आहे, की पाश्चात्य देशात ज्या प्रमुख अशा दोन पद्धती आहेत त्यातील कम्युनिस्ट पद्धतीत तर राज्यशासन हेच सर्वेसर्वा आहे. लोकशाही देशांमध्येसुद्धा शासनाची परीघि–कार्यक्षेत्र हे आपल्या भारतीय संस्कृतीला अभिप्रेत आहे, त्यापेक्षा किती तरी जास्त आहे. कम्युनिस्ट देशांच्या मानाने कमी आहे; पण आपल्याला अभिप्रेत आहे त्यापेक्षा ती परीघि जास्त आहे; तरी पण तिथेही ही परीघि कमी असावी अशा प्रकारचे विचार लोकामध्ये सुरू आहेत. विशेषत: युगोस्लाव्हियामध्ये १९७४ पासून मार्शल टिटोनी जो प्रयोग सुरू केला आहे, त्या प्रयोगातील मूळ सूत्र हेच आहे की समाज आणि समाजाच्या विभिन्न सामाजिक आणि आर्थिक घटकांनी आपापला कारभार स्वतंत्रपणे चालवावा. त्यासाठी ते स्वयंशासी असावेत. त्यांना त्यांचा कारभार चालवायला जर कुठे अडथळा येत असेल तर किंवा विभिन्न सामाजिक आर्थिक घटकांच्या आपापसातील संबधात कुठे बाधा येत असेल तरच फक्त सरकारने हस्तक्षेप करावा, अन्यथा ज्या त्या घटकाला स्वायत्तपणे त्याचा कारभार चालवू द्यावा. तेव्हा असे म्हणता येईल, की युगोस्लाव्हियामध्ये हा जो पहिला प्रयोग सुरू झाला आहे, त्यामध्ये स्वयशासित सामाजिक आर्थिक घटक ही कल्पना करण्यात आली आहे. हा प्रयोग पुढे यशस्वी होईल की नाही याबद्दल शंका व्यक्त केली जाते. कारण युगोस्लाव्हियात अद्याप युगोस्लाव्ह राष्ट्रीयत्वाचा उदय झालेला नाही. चार विभिन्न राष्ट्रे आणि दोन जमाती यांचा युगोस्लाव्हिया बनलेला आहे. या उपऱ्या कारणास्तव युगोस्लाव्हियाचे जर विघटन झाले तर हा प्रयोग पुढे चालू राहणे अशक्य होईल – तरी यातील मूळ सूत्र शासनाची व्याप्ती, परीघि कमी करणे हे आहे. स्वयंशासित समाजाची रचना हे आहे आणि शासनाची व्याप्ती कमी करावी एवढेच नव्हे तर तिथल्या विभिन्न प्रजासत्ताकांच्या अध्यक्षाची एक बैठक नुकतीच झाली होती. त्या बैठकीत त्यांनी पुढचाही एक सिद्धान्त विचारासाठी घेतला होता, की कालांतराने जर शासनरहित समाज हवा असेल तर मग पक्षरहित समाजही असला पाहिजे. त्या दृष्टीने स्वयशासित सामाजिक, आर्थिक घटक जितक्या प्रमाणात स्वत:चा कारभार स्वत:च चालवायला समर्थ होतील तितक्या प्रमाणात समाजजीवनावरून शासनाची पकड ढिली होईल, कमी होईल अशा तऱ्हेची कल्पना त्या बैठकीत बोलून दाखविण्यात आली होती. अर्थातच बोलणे आणि प्रत्यक्ष करणे यामध्ये फरक असू शकतो. तरीही हा विचार युगोस्लाव्हियासारख्या देशात आला ही मोठी सूचक अशी घटना आहे. व्यक्ती आणि समाज हा स्वयंशासित व्हावा हीच एकात्म मानववादातील कल्पना आहे. एकात्म मानववाद ही संकल्पना सर्वव्यापी आहे; परतु शासनाचा अधिकार समाजजीवनावरून कमी व्हावा आणि समाजातील सामाजिक–आर्थिक घटक स्वयंशासी बनावे या दृष्टीने एकात्म मानववादाची आणि युगोस्लाव्हियात १९७४ पासून सुरू असलेल्या या प्रयोगाची दिशा एकच आहे. आपल्याकडेही 'न राज्यं न च राजाऽसीत् न दंडो न च दंडिक:' ही शिकवण होतीच; पण ती जाऊन आता व्यक्ती आणि समाज हा सदोदित शासनाच्या तोंडाकडे पाहात बसण्याची अवस्था आलेली आहे. याचे मुख्य कारण १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बरीच वर्षे स्वराज्यापासून वंचित राहिलेल्या लोकांना राज्यशासन ही एक फार महत्त्वाची गोष्ट आहे असे चिरविरहामुळे वाटायला लागले होते. त्यामुळे शासनसंस्थेला फाजील महत्त्व देण्यात आले आणि प्रत्येक गोष्ट सरकारमार्फतच करवून घेण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. अशी प्रवृत्ती निर्माण होण्याचे आणखीही एक कारण आहे आणि ते म्हणजे व्यक्तिगत आणि सामाजिक आळस. स्वत: काहीही न करता सर्व काही शासनाने करावे अशा प्रकारची ही आळसाची कल्पना होती आणि तीही या मनोवृत्तीला कारणीभूत झाली. पश्चिमी विचाराचा प्रभाव हेही तिसरे कारण याला असू शकते. या सर्व गोष्टीमुळे हा विचार पुढे आलेला आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्या काळातले जे समाजाचे पुढारी होते त्यांनाही देशाची द्रुतगतीने प्रगती व्हावी असे वाटणे साहजिकच होते आणि प्रगतीची घाई झाली असल्यामुळेच समाजात स्वयंशासित सामाजिक, आर्थिक घटक आपला कारभार चालवायला समर्थ झाले पाहिजेत हा विचार बाजूला सारून झटपट प्रगतीच्या आकांक्षेने ते सरकारवर अधिकाधिक अवलबून राहात गेले असावेत हेही एक कारण या अवस्थेला आहे. कारण स्वयंशासित समाज जोपर्यंत निर्माण झालेला नाही आणि अशा स्वयंशासित समाजाचे संचालन करण्यासाठी सामान्य व्यक्तीची जी पातळी असावी लागते, शैक्षणिक, सास्कृतिक जागृतीची जी पातळी असायला हवी तिचा अभाव असल्यामुळे, शासनसंस्थेद्वारेच या गोष्टी घडवून आणाव्यात अशी प्रगतीची घाई झालेल्या त्या पुढाऱ्यांना वाटले असावे. अन्यथा संपूर्ण समाजाची तशी जागृती घडवून आणून

व्यक्तिमात्राची पातळी उंचावू म्हटले तर फार वेळ लागेल. या कल्पनेने स्वातंत्र्यचळवळीतील पुढाऱ्यांनी शासनसंस्थेलाच सर्व प्रकारे महत्त्व दिले असावे हेही शक्य आहे. यामुळे शासनसंस्थेला अवास्तव महत्त्व प्राप्त झाले आणि समाजजीवनाच्या सर्व थरांवर राजकारणाचा पगडा बसला. याला उपाय एकच आहे आणि तो म्हणजे राष्ट्रीय जागृती करणे. प्रत्येक व्यक्तीच्या जागृतीची पातळी उंचावणे. यामध्ये अनेक अडथळे आहेत. एक तर सामान्य व्यक्ती शक्यतोवर जागृत होऊ इच्छित नाही. कारण जागृती ही जरा कष्टदायक गोष्ट आहे. शिवाय ज्यांना समाजजीवनावर आपला प्रभाव कमी होऊ नये असे वाटत असते तेही जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणी हा समाज जागृत होऊ नये, असाच प्रयत्न करीत असतात. यात राजकीय पुढाऱ्यांचाही फार मोठा भाग आहे. माझ्यासारख्यासमोर हा प्रश्न येऊ शकतो की, जर मजूर जागृत झाले तर माझ्या पुढारीपणाचे काय होईल? अशा प्रकारचे व्हेस्टेड इटरेस्टस् पुढारीपणात निर्माण झाले असल्यामुळे जागृतीची पातळी उंचावण्याचा प्रयत्न हा फार मोठ्या प्रमाणावर पुढाऱ्याकडून होत नाही, ही देशाच्या दुर्दैवाची गोष्ट आहे; परतु याही परिस्थितीमध्ये अशा प्रकारचे व्हेस्टेड इंटरेस्टस् ज्याना नाहीत-मग ते पुढारी सामाजिक असोत, राजकीय क्षेत्रातील असोत, आर्थिक क्षेत्रातील असोत–त्यांनी समाजजागृतीची पातळी उंच करण्याचा जर प्रयत्न केला आणि त्यादृष्टीने सपूर्ण समाजाच्या जागृतीची पातळी जर उचावली तर आपोआप राजकीय सस्था आणि शासनसंस्था यांचे महत्त्व कमी होईल. ही फार प्रदीर्घ अशी प्रक्रिया आहे; परंतु त्याला काही इलाज नाही. या प्रक्रियेबद्दल मानवेंद्रनाथ रॉय यानी असे म्हटले आहे की– 'हा रस्ता तसा लाबचा आहे; पण तोच जर एकमेव रस्ता असेल तर मग तोच जवळचाही आहे!' जागृतीची पातळी उंचावण्याची भाषा आपण बोलतो तेव्हा त्यात जीवनमूल्यांचा प्रश्नही येतोच. आज जागृतीची पातळी कमी असल्यामुळे जीवनमूल्ये निराळ्या पद्धतीची आहेत. सत्ताकेंद्रित अशा प्रकारची जीवनमूल्ये आहेत. पुढच्या काळात जागृतीची पातळी उचावल्यानंतर सेवा–केंद्रित किंवा चारित्र्य-केंद्रित अशा प्रकारची जीवनमूल्ये आपोआप येतील. तसे झाल्यानंतर आज सत्तेविषयी जो एक हव्यास किंवा जे एक जबरदस्त आकर्षण आहे, ग्लॅमर आहे, ते ग्लॅमर नतर राहणार नाही; पण जीवनमूल्यामध्ये इतके परिवर्तन होण्याकरिता जागृतीची पातळी खूपच उंच होण्याची आवश्यकता आहे. त्याला वेळ लागणार आहे; परंतु ही प्रक्रिया जरी धीराची असली तरी तिला दुसरा पर्याय नाही.

## ६ : रॉय–जयप्रकाश–दीनदयाळ

पक्षविरहित लोकशाही ही भारतीय समाजाच्या रक्तात आहे. भारतीय पद्धतीमध्ये पक्ष नव्हतेच. मानवेंद्रनाथ रॉय यांनीही हे स्पष्ट केले आहे की, जोपर्यंत पक्ष अस्तित्वात आहेत तोपर्यंत खरी संस्कृती येऊच शकत नाही. त्यांनी असे म्हटले आहे की, प्रातिनिधिक सरकार हे पक्षप्रणालीतून येऊ शकते; पण खरे लोकशाही सरकार त्यातून येऊ शकत नाही. लोकशाही सरकारचा अर्थ लोकांनी चालविलेले सरकार असा आहे. राजकीय पक्ष आहेत तोपर्यंत लोक स्वतःचे राज्य चालवू शकत नाहीत, प्रतिनिधी ते चालवीत असतात. परंतु हे जे प्रतिनिधी आहेत ते विधानसभांत किंवा संसदेत एखाद्या प्रश्नावर जे मतदान करतील ते त्यांना निवडून दिलेल्या लोकांच्या इच्छेनुसार असावे अशी व्यवस्था राजकीय पक्षप्रणालीत नाही. आपल्या मतदारांच्या इच्छा काहीही असल्या तरी एकदा राजकीय पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या माणसाला आपल्या पक्षाच्या आदेशाबरहुकूम मतदान करावे लागते आणि पक्षाच्या आदेशानुसार करावे लागलेले मतदान आणि बहुसंख्य मतदाराच्या इच्छेनुसार व्हावयाचे मतदान हे नेहमी एकच राहील याची हमी या व्यवस्थेत नाही म्हणून असे सरकार प्रातिनिधिक सरकार आहे; परतु खरे लोकशाही सरकार नाही असे रॉय याचे विश्लेषण होते. म्हणून त्यानी असे म्हटलेले आहे की, खरी लोकशाही जर स्थापन व्हावयाची असेल तर राजकीय पक्षांचा हा जो अडथळा तिच्या मार्गात आहे तो दूर झाला पाहिजे. प्रत्यक्ष लोकाची लोकशाही त्याच परिस्थितीत निर्माण होऊ शकेल. त्यांचीसुद्धा कल्पना ही जयप्रकाशजीच्या कल्पनेशी बरीच मिळतीजुळती अशी आहे. दोघाच्याही कल्पना भारतीय परंपरेशी पूर्णपणे सुसंगत अशा आहेत. अंततोगत्वा एम्. एन्. रॉय व जयप्रकाश नारायण याच्या कल्पना आणि दीनदयाळजीचा एकात्म मानववाद हे सारख्याच पातळीवरचे आहेत. मघाशी मी म्हटलेच आहे की, आपल्या कल्पनाचे विशदीकरण करण्यासाठी दीनदयाळजीना पुरेसा वेळ मिळाला नाही. त्यामुळे जयप्रकाश किंवा रॉय यांनी आपापल्या कल्पना जितक्या विशद केल्या आहेत तितका स्पष्टपणा दीनदयाळजीच्या चिंतनाला आलेला नाही. तथापी तिघांचीही दिशा तीच आहे. दीनदयाळजीना अधिक वेळ मिळाला असता तर त्यानीही आपल्या या चिंतनाचे विशदीकरण अधिक केले असते यात वाद नाही.

## ७ : शिथिल शब्दयोजना

जयप्रकाश ज्याला संपूर्ण क्रांती म्हणतात ते तत्त्वज्ञान आणि दीनदयाळजीनी मांडलेला एकात्म मानववाद या दोहोपैकी समाजपरिवर्तनाला अधिक उपयोगी काय आहे ते सांगता येणार नाही. याचे कारण असे की, एकात्म मानववाद हे अधिक सर्वंकष अशा प्रकारचे तत्त्वज्ञान आहे. संपूर्ण क्रातीची कल्पना एक तर जयप्रकाशजीनीच अद्याप विशद केलेली नाही. संपूर्ण क्राती हे शब्द आणि त्यातील आशय यात तफावत आहे असे मला वाटते. जयप्रकाशजीचा सपूर्ण क्रांतीमधील जो आशय आहे त्याच्याशी तर मी सहमत आहे, परतु शब्दाशी मी सहमत नाही. कारण असे आहे की, प्रत्येक शब्दाला परंपरेने प्राप्त झालेला असा एक रूढार्थ असतो. सपूर्ण क्राती हा नवीन शब्द नाही. total revolution या इंग्रजी शब्दाचे ते अक्षरशः भाषातर आहे. इग्रजीतील हा शब्दप्रयोग जगाच्या इतिहासात यापूर्वी वापरण्यात आलेला आहे आणि त्यातील आशय व अर्थ सर्वस्वी भिन्न आहे. मला असे वाटते की, श्रेष्ठ पुरुषानी कोणताही शब्द वापरताना फार काळजी घ्यायला पाहिजे. कारण श्रेष्ठ पुरुषानी वापरलेल्या शब्दांना कालांतराने मंत्राचे महत्त्व प्राप्त होते. त्यामुळे चुकून जर एखादा शब्द शिथिल वापरण्यात आला तर त्याचे दुष्परिणाम आज दिसणार नाहीत; पण पुढच्या पिढीमध्ये दिसू शकतात. त्या दृष्टीने संपूर्ण क्रांती हे शब्द जयप्रकाशजीनी

शिथिलपणे वापरले आहेत असे मला वाटते. याला जो परंपरागत रूढार्थ आहे तो म्हणजे—क्रांती, आमूलाग्र परिवर्तन; परंतु ते केवळ वरच्यावर सरचनेत किंवा सुपर स्ट्रक्चरमध्ये नव्हे तर, अधिष्ठानामध्ये परिवर्तन असे जेव्हा म्हणायचे असेल त्यावेळी सपूर्ण क्राती किंवा total revolution असा शब्द वापरतात; परंतु अधिष्ठान कायम ठेवून फक्त वरवरच्या संरचनेत बदल करायचा असेल तर त्याला क्राती असे म्हणता येते. जयप्रकाशांनी सर्वांगीण परिवर्तन, सर्वंकष परिवर्तन, या अर्थाने उत्साहाच्या भरामध्ये पटण्याच्या भाषणात केव्हा तरी चुकून सपूर्ण क्रांती हा शब्द वापरला आणि तेव्हापासून तोच शब्द प्रचलित झाला; परंतु या शब्दाला परंपरेने जो रूढार्थ प्राप्त झालेला आहे तो लक्षात घेऊन सपूर्ण क्रांती हा शब्द न वापरता त्यांनी दुसरा शब्द वापरला असता तर ते अधिक बरे झाले असते. तेव्हा आशयाशी सहमत असूनसुद्धा शब्दाशी मी सहमत होऊ शकत नाही. उत्साहाच्या भरात हा शब्द त्यांनी चुकून वापरला असे मला वाटते. मोठी माणसे चूक करू शकत नाहीत असा काही माझा विश्वास नाही. हा शब्द बदलून त्यानी दुसरा योग्य शब्द वापरायला पाहिजे आणि श्रेष्ठ पुरुषानी शब्दांची फार काळजी घ्यायला पाहिजे असे माझे मत आहे; परंतु संपूर्ण क्रांतीचा जो आशय त्यांना अभिप्रेत आहे तो आणि नवीन समाजरचनेच्या बाबतीत एकात्म मानववादाचा जो सिद्धात दीनदयाळजीनी माडला त्यातील आशय दोन्हीत पूर्ण साम्य आहे. तथापी एकात्म मानववाद हे जीवनदर्शन आहे. सपूर्ण क्रातीचा जो काही आशय जयप्रकाशजीनी आणि इतरानी सागितला आहे त्यात जीवनाचे संपूर्ण दर्शन होत नाही. एकात्म मानववादात संपूर्ण क्रातीचा जो काही आशय सागण्यात येतो त्याचा समावेश होत असला तरी दीनदयाळजीचा एकात्म मानववाद आणि जयप्रकाशजीची संपूर्ण क्रांतीची संकल्पना समव्याप्त नाहीत. एकात्म मानववादाची व्याप्ती ही अधिक मोठी आहे.

### ८ : स्वायत्त घटकांचे संघटन

संघटन या शब्दाचा अर्थ काय, यावर या प्रश्नाचे उत्तर अवलंबून आहे. स्वायत्त स्वयंशासित अशा प्रकारच्या सामाजिक, आर्थिक घटकाचे सघटन हे सर्वांना अभिप्रेत आहे. जयप्रकाशजी, मानवेंद्र रॉय आणि दीनदयाळजी या तिघांनाही ते अभिप्रेत आहे. त्यामध्ये काही, कुठे विरोध किंवा विसंगती आहे असे मला वाटत नाही. त्यात काही परस्पर विरोधही नाही. *

---

# संपूर्ण क्रांती आणि एकात्म मानववाद

**नानाजी देशमुख**
**सरचिटणीस, जनता पक्ष**

---

### १ : एकात्म मानववाद आणि हिंदुत्व

पं. दीनदयाळजी रा. स्व. संघाचे संस्कार घेऊन वाढलेले नेतृत्व होते. संघाच्या या सस्कारातूनच त्यांना मानवतावादाची चिंतनप्रणाली तयार करण्याची प्रेरणा मिळाली असे मला वाटते. संघसंस्कारातून मिळालेल्या दिशेने जाण्याच्या या प्रेरणेला त्यांनी स्वाध्यायाची जोड दिली आणि त्यातूनच त्यांनी एकात्म मानवविकासाचे चिंतन आपल्यासमोर मांडले. हे चिंतन परिपूर्ण स्वरूपात विकसित करण्यापूर्वी त्यांनी जगातील सर्व सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विचारसरणीचा अत्यंत सखोल अभ्यास केला होता. त्या सर्व विचारसरणीचे परिशीलन आणि मनन केल्यानंतरच ते एकात्म मानववादाच्या सिद्धांताप्रत पोहोचले. दीनदयाळजीचा हा एकात्म मानववाद हे हिंदुत्ववादाचेच नवे रूप होते की नवे नाव होते हा प्रश्न काहीसा चमत्कारिक वाटतो. कारण हिंदुत्ववादासंबधीच्या आजतागायत चालत आलेल्या सर्व कल्पना या काहीशा सकुचित कल्पना आहेत. तसे पाहिले तर हिंदुत्व हेच मानववादाचे मूळ आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. कारण ' सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयः । सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित् दुःखभाग् भवेत् ।। ' हे हिंदुत्वाचे सारतत्त्वच दीनदयाळजीच्या एकात्म मानववादाचे अधिष्ठान आहे.

### २ : अविरोध

दीनदयाळजीनी माडलेला एकात्म मानववाद आणि जनता पार्टीने आपल्यासमोर ठेवलेला गाधीवाद किंवा गाधीवादी समाजवाद यांमध्ये कोणत्याही प्रकारचा विरोधाभास नाही. कारण एकात्म मानववाद हे गाधीवाद आणि समाजवाद यांच्यातील अनेक चांगल्या गोष्टीचा परिपाक आहे, म्हणूनच त्या दोन्ही विचारसरणीमध्ये परस्पर विरोधी असे काहीही नाही. जनसंघाने जनता पार्टीत विलीन होताना गाधीवादाचा स्वीकार केला तोही याच भावनेने की, गांधीवादी समाजरचनेचा सिद्धांत आणि दीनदयाळजीचा एकात्म मानववाद यात फारसा फरक नाही. कशावर भर द्यायचा याबाबत थोडीफार विभिन्नता दोघात असू शकेल; परंतु भारतात भारतीय विचारसरणीचा जो विकास झाला आहे तो एकात्म मानववादाच्या सिद्धातानुसारच झालेला आहे असे मला वाटते.

### ३ : विकेंद्रीकरण

विकेंद्रीकरण हे दीनदयाळजीच्या आर्थिक चिंतनाचे आणि कार्यक्रमाचे मुख्य सूत्र होते जनता पक्षानेही विकेंद्रीकरणावरच भर दिला आहे; परंतु हा काही एकट्या चौधरी चरणसिंह यांचा प्रश्न नाही. विकेंद्रीकरणाचा हा सिद्धात हा संपूर्ण जनता पार्टीचा प्रश्न आहे. भारताच्या उन्नतीसाठी, विकासासाठी आणि भारतातील लोकशाहीला बळकटी आणण्यासाठी विकेंद्रीकरण पद्धतच सर्वोत्कृष्ट आहे हा निष्कर्ष आम्ही सर्व लोकांनी एकत्र बसून आणि सर्वानुमते काढलेला आहे. म्हणूनच दीनदयाळजीनी सांगितलेले विकेंद्रीकरणाचे तत्त्व आणि जनता पार्टीने स्वीकारलेले विकेंद्रीकरण यात कोणत्याही प्रकारचा फरक नाही. दोन्ही एकच आहेत.

### ४ : लोहिया आणि दीनदयाळजी

डॉ. राम मनोहर लोहिया आणि दीनदयाळजी यांच्या विचारात पुष्कळसे सामीप्य आढळून येते हे खरे. डॉ. लोहियांनी समाजवादाचे जे चिंतन या देशाला दिले ते त्यांनी पाश्चात्य विचारसरणीचे बार-



नानाजी देशमुख

कार्डीने परिशीलन करून तयार केले असले तरीही त्यांचा मुख्य आधार भारत, भारतातील परिस्थिती, भारतातील समाज आणि 'त्यांच्या परंपरा हाच होता. म्हणूनच डॉ. लोहिया आणि इतर समाजवादी लोक यांच्या चिंतनात फार मौलिक स्वरूपाचा फरक आहे. दीनदयाळजींच्या चिंतनाचाही आधार भारतच आहे. दोघांच्याही संपूर्ण चिंतनाचा आधार भारत, भारताची प्रकृती, भारताची प्रतिभा आणि भारताची आवश्यकता हाच राहिल्याने डॉ. लोहिया आणि पं. दीनदयाळजी यांच्या विचारसरणीत साम्य होते आणि म्हणूनच हे दोन नेते परस्परांच्या जास्त जवळ येत गेले. दुसरा मुद्दा असा आहे की, डॉ. लोहियांनी चार खांबी राज्यपद्धतीचा पुरस्कार केला होता. ती चार खांबी कारभारपद्धत हे एक प्रकारे विकेंद्रीकरणाचेच नवे नामकरण होते. लोहियाप्रणीत चार खांबी कारभारप्रणालीत केंद्रातील सरकार, प्रांतातील सरकार, जिल्ह्यातील सरकार आणि स्थानिक स्वराज्य सरकारे हे चार कारभागाचे मुख्य आणि स्वतंत्र केंद्र घटक असावेत अशी कल्पना होती. दीनदयाळजींचा आग्रह होता की, केंद्र आणि प्रांतिक सरकारांना आपल्या घटनेत स्थान आहे तसेच स्थान जोपर्यंत आपल्या स्थानिक स्वायत्त संस्थांनाही मिळत नाही तोपर्यंत खरे विकेंद्रीकरण होणार नाही. आज आपल्या जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायती या स्वायत्त नाहीतच. त्या सर्व प्रांतिक सरकारांच्या मर्जीवर आणि कृपेवरच अवलंबून असतात. यामुळे विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाला स्थानच उरत नाही, म्हणून या स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्त संस्था या नात्याने आपल्या घटनेत स्थान दिले पाहिजे तरच विकेंद्रीकरण खऱ्या अर्थाने विकसित होईल असे दीनदयाळजी मानीत असत. म्हणून या दोन्ही दृष्टींनी पाहिले असता डॉ. लोहिया आणि पं. दीनदयाळजी यांनी प्रतिपादिलेल्या विकेंद्रीकरणाच्या सिद्धांतात मूलभूत असा काहीही फरक नव्हता. उलट विकेंद्रीकरणाची दीनदयाळजींची कल्पना जास्त विस्तृत होती, व्यापक होती; परंतु दोघांचेही मूळ एकच होते. परंपरेबाबतच्या दोघांच्या दृष्टिकोणातही फारसे अंतर नव्हते. डॉ. लोहियांच्या मूळ चिंतनाचे अधिष्ठान समाजवाद हे असल्यामुळे लोकांना ते अतिशय पुरोगामी विचारांचे वाटत. दीनदयाळजींच्या चिंतनाचे अधिष्ठान भारतीयता हे होते. म्हणून दीनदयाळजींचे चिंतन जास्त समन्वयात्मक आहे असे वाटत असे. असे अंतर या दोघांत दिसून येत होते; परंतु आपल्या परंपरेमध्ये आमच्या विकासाला बाधक ठरणाऱ्या ज्या काही गोष्टी शिरल्या आहेत त्या सर्व प्रयत्नपूर्वक काढून टाकल्या पाहिजेत, असे दोघांचेही स्पष्ट मत होते. आमच्या विकासाला पोषक असलेल्या गोष्टींचे जतन केले पाहिजे आणि ज्या काही पोषक परंतु नव्या गोष्टी असतील त्यांचा आपल्या परंपरेत अंतर्भावही केला पाहिजे असेही या दोघांना वाटत होते. अशा प्रकारे या दोन्ही नेत्यांच्या एकंदर विचारसरणीत कोणत्याही प्रकारचे फारसे अंतर नव्हते.

### ५ : राजकारणाचा पगडा

आमच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात जी एकप्रकारची विकृती निर्माण झाली आहे, तिच्यामुळेच आजच्या समाजव्यवस्थेत व्यक्तिजीवनावरही राजकारणाचा फार प्रभाव पडलेला दिसतो आहे. कम्युनिझम किंवा रशिया आणि चीन वगैरे देशांतील साम्यवादी जीवनपद्धतीचा सांसर्गिक परिणामही या प्रभावाला थोडा-फार कारणीभूत आहे. कारण तेथे व्यक्तिजीवनावर सरकारची जबरदस्त पकड आहे. तिसरे कारण, हा देश शेकडो वर्षे गुलाम राहिला हे आहे. गुलामगिरीच्या या काळात समाजजीवनात जे काही व्हायचे वा करायचे असेल ते सरकारच्या माध्यमानेच होणार अशी जनधारणा बनून गेली होती. परिणामी सर्व लोकांचा दृष्टिकोण शासनाभिमुख होऊन बसला. जीवनाच्या प्रत्येक गोष्टीसाठी सरकारवरच विसंबून रहायची प्रवृत्ती आमच्या समाजात निर्माण झाली याचे पर्यवसान राजकारण समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रात आपला प्रभाव पसरवून बसले असे दृश्य निर्माण होण्यात झाला. वास्तविक ही काही समाजजीवनातील निकोप अवस्था नाही. ही अवस्था नक्कीच बदलावी लागेल. कारण ही विकृती समाजात स्वावलंबनाची भावना निर्माण केल्याशिवाय बदलता येणार नाही. आज शिक्षित, अशिक्षित, अल्पशिक्षित प्रत्येक माणूस जो उठतो तो आपल्याला काही तरी नोकरी मिळावी याच खटपटीत असल्याचे दिसते. ही नोकरी सरकारी असो, खाजगी असो-पण नोकरी करूनच आपल्याला आपला विकास साधता येईल अशी धारणा समाजात पसरलेली दिसते. ही देखील निकोप धारणा नव्हे. उलट हा आमच्या शिक्षणाचा पराभवच आहे असे मी मानतो. वास्तविक सुशिक्षितांना आज जगात काय चालले आहे, निरनिराळ्या देशातील लोकांनी आपापल्या विकासाकरिता कोणकोणते मार्ग अवलंबिले आहेत, कोणत्या पद्धती स्वीकारल्या आहेत या सर्व प्रवाहांचा अभ्यास करणे जास्त सुकर असल्यामुळे ते असा अभ्यास करतील आणि निव्वळ नोकरी मिळविण्याच्या मागे धावत सुटणार नाहीत अशी निदान माझी तरी अपेक्षा होती. ही सुशिक्षित मंडळी नोकऱ्यांच्या मागे न लागता, या सर्व जागतिक प्रवाहांचा अभ्यास करून काही नवे उपक्रम सुरू करतील आणि असा अभ्यास करून शकणाऱ्या आपल्या अशिक्षित देशबांधवानाही त्यात रोजगार देतील अशी अपेक्षा होती. परंतु तसे झाले नाही. जो उठतो तो नोकरी मिळविण्याच्याच मागे धावती असे दृश्य निर्माण झाले. समाजजीवनावर राजकारणाचा प्रभाव फार वाढल्याचाच हा परिणाम आहे. व्यक्तिजीवनावरही राजकारणच कुरघोडी करीत असल्याचे दिसत आहे. जिल्हा परिषदेचे

अध्यक्षपद असो, नाही तर नगरपित्याचा सन्मान असो किंवा आणखीही एखादे क्षुल्लक अधिकारपद असो, ते एकदा मिळाले की कुणालाही सहसा सोडावेसे वाटत नाही. एकदा मिळालेली सत्ता सोडायला कुणीही सहसा तयार होत नाही, हे खरे आहे; परंतु याचे कारण सत्तापदांकडे पाठ फिरवूनही समाजकार्य करण्याचे आणि समाजाला काही देण्याचे संस्कार आपल्या समाजातून लोप पावले आहेत हे आहे. असे संस्कार जिथे असतील, ते संस्कार ज्यांनी ग्रहण केलेले असतील ती माणसे अगदी हसतहसत सत्तेकडे पाठ फिरवतील. अधिकारपदाचा मोह ठेवणार नाहीत; परंतु एकंदर समाज अशा संस्कारापासून वंचितच आहे. आणि ही एक सामाजिक विकृती आहे, ही विकृती दूर करण्याकरिता आम्हाला तीन प्रकारे प्रयत्न करावे लागतील. एक म्हणजे आमची शिक्षणव्यवस्था आमूलाग्र बदलावी लागेल. व्यक्ती-व्यक्तीला स्वालंबी बनवील आणि माझा विकास मी माझ्या स्वतःच्या बळावर करीन असा आत्मविश्वास त्याच्या ठायी निर्माण करील असे शिक्षण मिळण्याची व्यवस्था करावी लागेल. दुसरी गोष्ट अशी की, देशाचा विकास निव्वळ सरकारी प्रयत्नांनीच होईल असे न मानता बिनसरकारी संस्था आणि व्यक्तीही देशाचा विकास समर्थपणे करू शकतात अशी उदाहरणे आम्हाला समाजासमोर ठेवावी लागतील. तिसरा मार्ग सहकाराचा आहे. खरं पाहिलं तर आमच्या देशात उद्धाराचा उत्कृष्ट मार्ग असा जो सहकार आहे त्याची जितकी शास्त्रशुद्ध रीतीने उभारणी करण्यात यायला हवी होती, तितकी ती झालेली नाही. आज जे काही सहकारी आंदोलन अस्तित्वात असल्याचे दिसते, ते देखील सरकारी मदतीवरच अवलंबून आहे. हा दोष आहे. सहकारी चळवळही समाजाच्या पाठिंब्यानेच उभी राहायला हवी आहे. अशा समाजाधिष्ठित सहकारी चळवळीवर आम्हाला भर द्यावा लागेल. अशा प्रकारच्या त्रिविध मार्गांनी गेल्यानेच समाज आणि व्यक्तिजीवनावर आज राजकारणाचा जो पगडा बसलेला दिसतो तो आपल्याला दूर करता येईल. राजसत्तेचा हा प्रभाव समाजजीवनावरून कमी केला नाही तर वाचविता येणार नाही. सत्तेच्या प्रभावापासून मुक्ती, स्वतंत्र चिंतनाची प्रेरणा आणि स्वतंत्र प्रयत्नांची आराधना हेच लोकशाहीचे मर्म आहे.

### ६ : संपूर्ण क्रांती आणि एकात्म मानववाद

जयप्रकाशजींनी सांगितलेली संपूर्ण क्रांतीची सकल्पना आणि पं. दीनदयाळजी यांनी मांडलेली एकात्म मानववादाची संकल्पना या दोहोंमध्येही समाजाच्या विकासाची दिशा दाखविण्यात आली आहे हे मोठेच साधर्म्य आहे; परंतु एकात्म मानववाद ही शंभर टक्के भावात्मक संकल्पना आहे; ते एक जीवनतत्त्व आहे. संपूर्ण क्रांती मात्र भावात्मक संकल्पना नसून समाजपरिवर्तनाचा तो एक प्रयत्न आहे. क्रांतीचा अर्थच आहे ते बदलून टाका, असा आहे. एकात्म मानववादाचा अर्थ, आहे त्या दिशेने विकास करा. म्हणजेच या दोन्हीची समाजाला गरज आहे. क्रांतीचीही गरज आहे आणि विकासाची दिशा दाखविणाऱ्या तत्त्वज्ञानाची देखील गरज आहे. हे तत्त्वज्ञान एकात्म मानववादातून मिळते आहे. संपूर्ण क्रांतीमुळे आज समाजजीवनात आलेल्या अनेक कुप्रथांचे निर्मूलन करता येणार आहे. या सर्व कुप्रथा मोडून काढून एक भावात्मक तत्त्वज्ञानाने झपाटलेला समाज निर्माण करावा लागणार आहे. संपूर्ण क्रांतीमध्ये या दोन्ही गोष्टीचा समावेश होतो. याला प्रसंगी काही लोक नकारात्मकही म्हणू शकतील. कारण काही गोष्टीचा त्याग करायचा, काहींचा विध्वंस करायचा, काहींचे परिवर्तन करायचे हे सर्व क्रांतीच्या संकल्पनेत मोडते; परंतु तरीही संपूर्ण क्रांतीची नितांत आवश्यकता आहे. कारण समाजजीवनात भयानक भ्रष्टाचार माजलेला आहे. सर्वव्यापी भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. चिंतनात प्रामाणिकपणा राहिलेला नाही. जीवनाच्या अंगोपागात ढोंग पसरलेले आहे. या सर्व गोष्टी बदलायच्या म्हणजे क्रांती करणे आवश्यकच आहे. हीच जयप्रकाशजींच्या संपूर्ण क्रांतीची सकल्पना आहे. ती साकार करण्यासाठी जयप्रकाशजींनी पावलेही उचलली. त्या कामात आम्हीही त्यांना साथ दिलेली आहे. कारण एकभावात्मक लक्ष्य गाठण्यासाठीची ती वाटचाल आहे. संपूर्ण क्रांती आणि एकात्म मानववाद या दोन्ही सकल्पनात हेच साम्य आणि हेच अंतर आहे. पक्षरहित लोकशाहीची जयप्रकाशप्रणीत संकल्पना आणि एकात्म मानववादानुसार निर्मिलेला समाज यात वास्तविक पाहता कोणताही खास फरक नाही. एकात्म मानववादात पक्षरहित किंवा पक्षसहित व्यवस्थेमध्ये फारसा भेदभाव केलेला नाही. एकपक्षीय, द्विपक्षीय किंवा अनेक पक्षीय या सर्व राज्यव्यवस्था आहेत. ते काही समाजाचे अंतिम लक्ष्य असू शकत नाहीत. एकात्म मानववाद समाजासमोर लक्ष्य मांडतो. ते साध्य करण्यासाठी एक-दोन किंवा अनेक पक्षीय व्यवस्था उपयोगी असल्या तर त्यांचा उपयोग करण्यास एकात्म मानववादात कोणताही प्रत्यवाय नाही. म्हणून पक्षरहित अथवा पक्षसहित व्यवस्थेचा संबंध एकात्म मानववादाशी जोडण्याचे काहीही कारण नाही.

### ७ : दिशाबोध आणि कार्यक्रम

असा प्रश्न उपस्थित होईल की जयप्रकाशजींच्या संपूर्ण क्रांतीच्या संकल्पनेतील मानव आणि दीनदयाळजींच्या एकरूप मानववादाच्या संकल्पनेतील मानव ... समाजपरिवर्तनासाठी त्यांच्यापैकी कोण सर्वाधिक उपयुक्त आहे? परंतु हा प्रश्न तसा सुसंगत नाही. क्रांती करून एकात्म मानव समाज स्थापन करता येईल की एकात्म मानव समाजाच्या संकल्पनेने क्रांती करता येईल असा प्रश्नही काहीसा संभ्रम निर्माण करणारा ठरेल. कारण एकात्म मानववाद हे दिशा दाखवणारे तत्त्वज्ञान आहे आणि संपूर्ण क्रांती ही त्या दिशेने वाटचाल करण्याची एक प्रकारची शिदोरी आहे, साधन आहे. म्हणून या दोहोंत कोणताही विरोधाभास असण्याचे कारण नाही. एक दिशादर्शी आहे. दुसरा कार्यक्रम आहे. तेव्हा त्यातील सरस कोणता आणि निरस कोणता, किंवा अधिक वा कमी उपयुक्त कोणता असा प्रश्नच गैरलागू आहे. कारण दिशाबोध आणि कार्यक्रम या दोहोंनाही हातात हात घालून चालावे लागणार आहे.

### ८ : जातीप्रथा आणि राजकीय पक्ष

समाजसंघटन दोघानाही अभिप्रेत होते, परंतु त्यांच्या कल्पनेत साम्य अथवा भेद शोधण्या ने शोधण्याचा प्रश्नच येत नाही. आपल्या समाजात अनेक कुप्रथा आहेत. त्याबाबत \आमचा जयप्रकाशजींशी किंवा डॉ. लोहियांशी किंवा त्या विचारसरणीशी कधीही कोणताच

मतभेद नव्हता. उदाहरणार्थ जातीप्रथेचाच प्रश्न घ्या. निव्वळ जातीप्रथा नष्ट करा, जातीप्रथा नष्ट करा असे म्हटल्याने जातीप्रथा कधीही नष्ट होत नाहीत. त्या नष्ट केल्या पाहिजेत असे सांगण्याचे प्रयत्न कित्येक वर्षांपासून चालू आहेत आणि दिसते मात्र असे की जातपात जास्तच मजबूत होत आहे. वास्तविक जातीप्रथा अस्तित्वात का आहे, ते आधी शोधले पाहिजे. मी जेव्हा या विषयाचे अध्ययन करतो किंवा दीनदयाळजींच्या सहवासात राहिल्याने या बाबतीत आमचे जे काही चिंतन झालेले आहे, त्यावरून असे म्हणता येईल की 'जातीव्यवस्था आमच्याकडे व्यवसायावरून आली. कोणतीही जात घ्या, तिचे काही ना काही ठरवून दिलेले कार्य आहे, व्यवसाय आहे. व्यवसायावर जातीव्यवस्था आली. तिला दुसरा कोणताही आधार नव्हता. हे व्यवसाय, ही कार्ये वा कर्मे समाजाच्या धारणेसाठी, अस्तित्वासाठी आणि विकासासाठी अत्यावश्यक होती. हे सर्व व्यवसाय जीवनातील व्यवसाय आहेत. प्रत्येक जातीशी ते निगडीत आहेत. म्हणजे त्या काळात समाजाची गरज म्हणून ही जातीव्यवस्था आली. या जातीव्यवस्थेचा संबंध कुठल्याही धर्माशी, उपासनापद्धतीशी नाही, तो केवळ व्यावसायिकच आहे. त्यावेळची सामाजिक परिस्थितीच अशी होती की मुला-मुलींचे विवाह त्याच जातीत होत होते. याचेही कारण असे की, व्यवसायानुरूप जातीव्यवस्था असल्यामुळे त्या त्या जातीला त्या त्या व्यवसायाचे प्रशिक्षण घराघरातून मिळत असे. साहजिकच तो व्यवसाय कसा चालवावा याचे शिक्षण असलेली व्यक्तीच आपल्याला जोडीदार म्हणून मिळावी असा प्रयत्न होत असे. कारण त्या वेळची शिक्षणपद्धती तशी होती. आता काळ बदलला. शिक्षणव्यवस्था बदलली गरजा बदलल्या. हे असे होतेच. काळाबरोबर या व्यवस्था बदलतात, बदलायला हव्याही असतात. आज स्थिती अशी आहे की, एका माणसाला चार मुले असली तर ती सर्व त्यांचा बाप जो व्यवसाय करीत आहे त्याच व्यवसायाचे शिक्षण घेत नाहीत. तेव्हा ही पद्धत बदलली. दुसरीकडे पुरातन काळापासून ठरवून दिलेल्या जाती आणि त्याचे योजून दिलेले व्यवसाय याच्यातही आता फारकत झाली आहे. एका जातीतील मुलगा आता त्या जातीच्या पारंपारिक व्यवसायात रहात नाही. म्हणून आता या बदलत्या परिस्थितीनुसार भारतात आपल्याला नवी समाजव्यवस्था करावी लागणार आहे. आता विभिन्न व्यवसायात असणाऱ्या लोकांच्या त्या त्या व्यवसायाच्या गरजेनुसार स्वतंत्र संघटना उभ्या राहत आहेत., मर्चन्टस् असोशिएशन, कपडा समित्या, वकील संघ, विद्यार्थीसंस्था, मजूर युनियन्स अशा नाना संस्था उभ्या राहिल्या आहेत. त्या व्यवस्थेनुसार या नव्या संघटनाही एक प्रकारे नव्या जातीच आहेत. वास्तविक या नव्या जाती सुसंघटित करण्याचा प्रयत्न करायला हवा आहे. तसा प्रयत्न झाला, तर जातीचे अस्तित्व आपोआपच समाप्त होऊन जाणार आहे. शिवाय आता त्या पुरातन काळापासून चालत आलेल्या जातीचा जीवनात कोणताही उपयोग राहिलेला नाही. परंपरेखातर निव्वळ लग्नकार्यापुरत्याच जाती आता राहिल्या आहेत. त्यातही आता आन्तरजातीय विवाहांमुळे थोडे परिवर्तन होऊ लागले आहेच. वास्तविक जातीप्रथा पुन्हा बळावली व डोकेदुखीस कारणीभूत झाली याचे मुख्य कारण हे आहे की, स्वराज्यप्राप्तीनंतर आमच्या राजकीय पक्षांनी आपले सिद्धांत, आपली धोरणे आणि आपले कार्यक्रम यांची रचना कधी लोकशिक्षणाचा हेतू पुढे ठेवून केलीच नाही. नेहमी निवडणुकीचाच विचार केला आणि निवडणूक जिंकण्यासाठी याच प्रथेचा उपयोग केला. खरे पाहिले तर, या निवडणुकांनीच जातीप्रथेला खत-पाणी घातले आहे. नाही तर या जाती आपोआपच समाप्त झाल्या असत्या आणि त्याच्या जागी नवी व्यवस्था येऊ शकली असती. आजदेखील जातीवादाचे भयानक रूप राजकीय पक्षांमुळेच जास्त भीषण बनत चालले आहे. या जाती कालप्रवाहात आपोआपच नष्ट होणार आहेत, त्याचे भूत उभे करायचे आणि मग त्याविरुद्ध लढण्याची भाषा बोलायची हा प्रकार राजकीय पक्षांनी थांबवला पाहिजे आणि नवी व्यवस्था आणण्याकरता आपले संघटन केले पाहिजे. संपूर्ण क्रांतीसाठी संघटन करायचे म्हणजे नेमके काय करायचे याची कल्पना जयप्रकाशजींनी अद्याप स्पष्ट केलेली नाही. दीनदयाळजींची कल्पना मात्र सुस्पष्ट आहे. □


## – नवीन दाखल झालेली काही पुस्तके –

| | | |
|---|---|---|
| (१) | द जजमेन्ट – कुलदीप नायर, अनुवाद – माधव मोर्डेकर | रु. २०/– |
| (२) | बुमरँग – ( भाग १ ला व २ रा )– ( कादंबरी ) – बाबा कदम | रु. ३६/– |
| (३) | कसरत – ( कादंबरी ) – योगिनी जोगळेकर | रु. १६/– |
| (४) | द्विदल – ( कादंबरी ) – योगिनी जोगळेकर | रु. १८/– |
| (५) | भरतीची लाट – ( कादंबरी ) – सौ. शकुंतला गोगटे | रु. १५ |

—ENGLISH—

| | | |
|---|---|---|
| (1) | India : A Wounded Civilization – ( Read about the authors' love-hate relationship towards India ) – V. S. Naipaul | |
| (2) | Secrets ( Bestseller-Novel of a rapist ) – Burt Hirshfeld | Rs. 18·90 |
| (3) | The Management of Management – ( Cartoons for Executives ) – R. K. Laxman | Rs. 6/– |
| (4) | The Stationary Ark – ( Author recounts his experience in his own zoo ) – Gerald Durrell | Rs 34/– |
| (5) | Super Minds – ( Supernature / Paranormal ) – John Taylor | Rs. 19/– |

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

आमच्या दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून इतर लायब्ऱ्यांइतक्या वर्गणीत उत्तमोत्तम पुस्तके वाचावयास मिळतात व वर्गणीतील वाढीपासून मुक्तता होते.

# प्रेरणा दीनदयाळांची कार्य माने-मकबूलांचे

अनिल काळे

'या बायांची संघटना बाधावी यासाठी मी पहिला कॉंग्रेस पक्षाकडे गेलो. त्यानी माझी हशी उडविली. शे. का. प. कडे गेलो. त्यानीही माझी हशी उडविली. कम्युनिस्टांकडे, एस्. एस्. पी. कडे गेलो. त्यांनीही माझी हशी उडविली...' मकबूलभाई मला कोल्हापूर-मधील वेश्यासंघटनेची हकीगत सांगत होते. जनता पक्षाचे कोल्हापूरमधील एक कार्यकर्ते श्री. गोपाळराव माने आणि श्री. मकबूल हुसेन यांनी एकत्र येऊन ही संघटना स्थापन केली आहे. श्री. मकबूलभाई पुढे म्हणाले, 'जनसंघ हा मुसलमानविरोधी पक्ष आहे अशी समजूत असल्याने जनसंघाकडे मी गेलो नाही; परंतु एका दोस्ताने सांगितले 'या कामात कोल्हापुरात तुला एकच माणूस मदत करील; पण तो जनसघाचा आहे!' या दोस्ताने माझी श्री. गोपाळराव माने यांच्याशी गाठ घालून दिली. त्यांनी मात्र या कामात पुढाकार घेतला व आम्ही ही संघटना स्थापन केली. ५ फेब्रुवारी १९७४ या दिवशी काही मागण्यासाठी वेश्यांचा कलेक्टर कचेरीवर एक मोर्चा नेण्यात आला. हीच या संघटनेच्या कामाची सुरुवात!'

'माणूस' साप्ताहिकासाठी देवदासी संघटनेची माहिती मिळविण्यासाठी मी कोल्हापूरमध्ये प्रथम श्री. गोपाळराव माने याची भेट घेतली. श्री. माने सध्या कोल्हापूर जिल्हा जनता पक्षाचे चिटणीस आहेत. हमाल मजदूर सहकारी संस्थेचेही ते प्रथम-पासून काम करतात. या संस्थेच्या कचेरीतच आमची बैठक जमली.

गोपाळरावांनी मी जिला 'देवदासी संघटना' असेच-कटाक्षाने सबोधित होतो त्या वेश्यासंघटनेची माहिती अगदी मोकळे-पणाने मला दिली. वेश्या ही नेहमीच समाजातील अनैतिकतेची खूण मानली गेली असल्याने वेश्यांची सघटना ही कल्पनाच मुळी धाडसी वाटते; परंतु वेश्यांची गाऱ्हाणी शासनापुढे आणि समाजापुढेही मांडण्यासाठी ही एक आवश्यक गोष्ट होती; परन्तु जनसघाने या कामात कसे काय लक्ष घातले? या माझ्या प्रश्नाचे उत्तर देताना गोपाळराव माने म्हणाले, 'कोल्हापूरमध्ये जनसंघाने झोपडपट्टयात जे काम केले आहे त्या कामातूनच या संघटनेच्या स्थापनेत आम्हाला पुढाकार घ्यावा लागला.'

१९५१ मध्ये कोल्हापुरात कोटितीर्थाजवळ सुमारे दीडशे झोपडयाची एक झोपडपट्टी होती. त्या वर्षी सिटी सर्व्हेचे काम सुरू झाले आणि या झोपडया म्हणजे सरकारी जागेवरील अतिक्रमण असल्याचे ठरवून त्या पाडण्याचे ठरविण्यात आले. तेव्हा पर्यायी जागा दिल्याशिवाय या झोपडया पाडू नयेत अशी मागणी जनसंघाने केली व अर्ज, विनंत्या, मोर्चे या मार्गांनी तिचा पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश येऊन सहा महिन्यासाठी झोपडया पाडण्याचे तहकूब करण्यात आले. पुढे १९५६ पर्यंत दर सहा महिन्यांनी याच पद्धतीने झोपडया पाडण्याचे स्थगित होत गेले.

### दीनदयाळजींची प्रेरणा

१९५६ मध्ये कल्याणला जनसंघाचे अधिवेशन भरले होते. गोपाळराव म्हणाले, या वेळी झोपडपट्टीवाला म्हणून अन्य कार्यकर्ते माझी थट्टा उडवीत होते; परंतु स्व. दीनदयाळजीच्या हे जेव्हा लक्षात आले तेव्हा ते रागावले. त्यानी माझ्या कामाची चौकशी केली व कौतुक केले. जनसघ झोपडपट्टयामध्ये पोचला पाहिजे असे त्यानी कार्यकर्त्यांना बजाविले. झोपडपट्टीवासियांनी सरकारी जागेवर 'अतिक्रमण' केले ही कल्पनाच त्यांना चुकीचो वाटली. त्याचे पुनर्वसन करण्याची व्यवस्था केल्याशिवाय झोपडया पाडण्याची सरकारची कृती केव्हाही समर्थनीय ठरू शकणार नाही असे मत त्यानी व्यक्त केले व या प्रश्नावर झोपडवासियांची परिषद कोल्हापूरमध्ये घेण्याची सूचना केली. पुढे जनसघाने अशी परिषद प्रथम मुबईत घेतली आणि १९६८ साली कोल्हापूरमध्ये झोपडपट्टी परिषद घेण्यात आली. त्या वेळी कोल्हापुरात झोपडपट्टयाची बरीच वाढ झाली होती. या परिषदेला स्त्रिया बहुसंख्येने उपस्थित होत्या. त्यात काही वेश्याही होत्या. परिषदेत इतरांबरोबर त्यांनी आपल्याही अडचणी मांडण्याचा प्रयत्न केला; पण त्या वेळी त्यांच्याकडे कुणी फारसे लक्ष दिले नाही.

१९७१ मध्ये दुसरी झोपडपट्टी परिषद कोल्हापूरला झाली. खासदार सुदरसिंग भडारी त्या वेळी उपस्थित होते. त्यांनी या स्त्रियांची बैठक घेऊन त्यांच्या प्रश्नांची माहिती घेण्यास कार्यकर्त्यांना सांगितले. पुढे या प्रयत्नांना गती मिळाली ती या वेश्यांवर आलेल्या एका आपत्तीमुळेच ९ डिसेंबर १९७३ रोजी सीमाप्रश्नावरून कोल्हापूर-मध्ये जाळपोळ झाली. वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया बहुसंख्येने कानडी मुलुखातून आलेल्या असल्याने त्याची व्यवसायाची ठिकाणे पूर्णपणे लुटण्यात आली. धंद्याच्या दृष्टीने वेश्या या जागा सजवीत असतात: त्याची थोडी फार किंमती वस्त्रे, दागिने याच ठिकाणी ठेवलेले असतात ही मालमत्ता लुटण्यात आली. एवढेच नव्हे तर या स्त्रियांना उघडे करून मारपीट करण्यात आली. या प्रकाराची दहशत घेऊन ३।४ दिवस या स्त्रियानी लपून छपूनच काढले. दरम्यान त्यांची राहण्याची ठिकाणे

असलेल्या झोपड्याही लुटण्यात किंवा पेट-विण्यात आल्या अशा प्रकारे पूर्णपणे निरा-श्रित झालेल्या या स्त्रियांपैकी काही स्त्रिया श्री. गोपाळराव माने यांच्याकडे मदतीच्या अपेक्षेने आल्या.

दोन-तीन दिवस गोपाळराव परगावी गेले असल्याने त्यांची भेट होऊ शकली नाही. गोपाळराव मला म्हणाले, ' २५–३० वेश्या रोज आपल्या घरासमोर येऊन बसत आहेत हे गावाहून आल्यावर मला जेव्हा समजले तेव्हा मी खरोखरच घाबरून गेलो व नंतरही मागच्या दाराने बाहेर पडून या स्त्रियांची भेट घेण्याचे टाळू लागलो. शेवटी माझ्या आईने मला खडसावून सांगितले, ' तू संघाचा स्वयंसेवक आहेस. तू भितोस कशासाठी ? त्यांना भेटून त्यांचे म्हणणे तू ऐकून घे–' तेव्हा मी त्या स्त्रियांना भेटून त्यांचे गाऱ्हाणे ऐकले. मी त्याना म्हणालो, ' तुम्ही यासाठी काँग्रेस किंवा अन्य कुणाकडे जा. कारण आम्ही तुम्हाला मदत केल्यास आम्हाला मारहाण होण्याची शक्यता आहे.' तेव्हा त्यांच्यापैकीच मोहनाबाई नावाची एक स्त्री म्हणाली, ' आम्ही तुमच्याकडे आलो; कारण आया-बहिणीप्रमाणे समजून तुम्ही आम्हाला मदत कराल. इतरांकडे गेल्यास ते आज मदत करतील; पण नंतर त्याची वाटेल त्या मार्गाने आमच्याकडून वसुलीही करून घेतील. तेव्हा मात्र माझा इलाज झाला व त्यांच्या प्रश्नात लक्ष घालण्याचे मी मान्य केले.

## अभूतपूर्व मोर्चा

याच वेळी मकबूल हुसेन हा मुस्लिम तरुणही याच संदर्भात माझ्याकडे आला. तेव्हा वेश्यांची संघटना करून त्यांचा एक मोर्चा कलेक्टरकचेरीवर न्यावा व लुटल्या, जाळल्या गेलेल्या मालमत्तेची नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी करावी असे ठरले. मकबूलने सेक्रेटरी म्हणून काम करावे असेही ठरले. त्यानेच या विखुरलेल्या, परा-गंदा झालेल्या स्त्रियांची एकजूट करून खरी संघटना बांधली व त्यानंतर ५ फेब्रु. ७४ ला अभूतपूर्व असा, शहरातील ८०० पैकी सुमारे साडेचारशे वेश्यांचा मूकमोर्चा कलेक्टर कचेरीवर नेण्यात आला. त्या वेळी तात्पुरती मदत म्हणून प्रत्येकी पन्नास रुपये व रेशन-कार्डे वेश्यांना देण्यात आली. नुकसानभरपाई देण्याचे फक्त आश्वासन तेवढे मिळाले.'

श्री. मकबूलभाईंना मी विचारले, " या वेश्यांसाठी काही तरी करावे असे तुम्हाला कशामुळे वाटले ?'. ते म्हणाले, ' मी ज्या भागात राहतो त्याच भागात यांचा व्यवसाय चालतो. त्यामुळे लहानपणापासून मी या स्त्रियांचे आयुष्य पाहिले आहे. ९ डिसेंबरच्या जाळपोळीत यांनी हौसेने जन्मभरात गोळा केलेली सर्व मालमत्ता बेचिराख झाली. त्याना माणुसकी सोडून मारहाण करण्यात आली. यांच्यापैकीच एका म्हाताऱ्या बाईला गुंडांनी उचलून आगीत फेकण्याचा प्रयत्न केला. तिच्या गुडघ्याच्या वाट्या निकामी झालेल्या असल्यामुळे ती पायाने अधू झाली होती. त्यामुळे ती गुंडाच्या हाती सापडली. त्यातून ती कशीबशी वाचली. ज्या बाईने मला लहानपणी मायेने वागविले तिची अशी दुर्दशा झाली. मला हे सर्व अतिशय लागले. त्या वेळी मी १९–२० बायकांना माझ्या घरी लपविले. २–३ दिवस त्यांना पिठलं-भाकरी देऊन काढले व नंतर वर्गणी गोळा करून एकेकीला त्यांच्या गावी पाठविले. या वेळी मी दिवसभर वेड्यासारखा सायकलवर हिंडून काम करीत होतो. या धावपळीत माझी एस्. टी.मधील ड्रायव्हरची नोकरीही गेली. पूर्वीच्या संपाच्या वेळी कामावर गेल्याचा राग धरून युनियनच्या लोकांनी माझा रजेचा अर्ज दडपून ठेवला.'

एवढे होऊनही मकबूलभाईंनी जिद्दीने वेश्यांची संघटना बांधण्याचे काम चालू ठेवले आहे. किती तरी वेश्या म्हातारपणी अंथरुणावर कुजून मेल्याचे त्यांनी पाहिले आहे. अनेकदा त्यांना माती देण्याचेही काम मकबूलभाईंनी केले आहे. या वेश्यांची म्हातारपणी अशी दुर्दशा होऊ नये म्हणून त्यांना व्यवसाय चालू असताना सक्तीने बचत करायला लावावी असे मकबूलभाईंना वाटते. बँकेच्या माणसाने रोज येऊन रुपया-आठ आणे एवढीही बचत गोळा करावी. यासाठी सध्या ते एक-दोन बँकांकडे प्रयत्न करीत आहेत. गुंड व दलाल त्याचप्रमाणे पोलीसही या वेश्यांना मारहाण करून व धमक्या देऊन पैसे उकळतात. त्यापासूनही त्यांना सरंक्षण मिळावे असे मकबूलभाईंना वाटते. त्यांच्या बोलण्यातून अशा अनेक अडचणी त्यानी मांडल्या. त्या पुढे आल्या आहेतच.

## सामाजिक पाहणी

फेब्रुवारीमधील मोर्चानंतर नोव्हें. ७४ मध्ये श्री. उत्तमराव पाटील यांच्या सूचने-वरून जनसंघ कार्यकर्त्यांनी वेश्यांची सार्व-जनिक पाहणी केली. त्यातून खूपच माहिती बाहेर आली. या धंद्यात बायका येतात कशा ? या प्रश्नाचा शोध घेताना असे लक्षात आले की, देवाला वाहिल्याने, आई-बापांनी विक्री केल्याने, नवऱ्याने किंवा भावाने पैशासाठी धंद्याला लावल्याने, एका-पेक्षा अधिक पुरुषाच्या सहवासाची गरज भासल्याने, चैनीसाठी भरपूर पैसा मिळतो या आकर्षणाने किंवा केवळ पोट जाळण्या-साठी अशा अनेक कारणांनी स्त्रिया या व्यवसायात येतात. त्याचबरोबर या स्त्रियांच्या मुलीही पुन्हा याच व्यवसायात येण्याचे प्रमाणही मोठे आहे

महाराष्ट्रात यल्लामादेवीची ' सौदत्ती डोंगर, सौंदरगा आणि आळते ही तीन ठिकाणे आहेत. या ठिकाणी १३-१४ वर्षांच्या मुलींना देवीच्या सेवेसाठी वाहण्यात येते. म्हणजे पहिल्यांदा तेथील गुरवाला या मुली अर्पण केल्या जातात. त्यानंतर लगेच मुंबईच्या दलालांना त्यांची विक्री करण्यात येते. ही विक्री बहुधा प्रत्यक्ष आई-बाप आणि काही वेळा त्यांनाही फसविणारे गुंड यांच्याकडून होते. मुलीच्या रंगरूपाप्रमाणे ५००० रुपयां-पर्यंत पैसे मिळविले जातात. ही माणसाला विकण्याची गुलामगिरीची भयानक पद्धत दुष्ट धार्मिक रूढीच्या पांघरुणाखाली आजही चालू आहे. महार व मातंग समाजात ही पद्धत अधिक आहे. दारिद्र्य हे या प्रश्नाच्या मुळाशी असले तरीही वाटेल त्या उपायांनी शक्य तितक्या लवकर ही अघोरी पद्धत बंद झाली पाहिजे !

या देवदासी किंवा जोगतिणी खंडोबाच्या देवस्थानाच्या ठिकाणीही वाहिल्या जातात. जेजुरी, पाली ( जि. सातारा ) व मगसुळी ही खंडोबाची तीन ठिकाणे आहेत. अशा एकूण ६ गावांत महाराष्ट्रात राजरोस ही विक्री चालते. काही वेळा पुरुषही देवाला वाहिले जातात ! १४/१५ वर्षांच्या मुलास देवास वाहिले जाते व त्याच्या विशिष्ट नसा तोडून त्याला नपुसक बनविले जाते. त्यानंतर हे पुरुष जोगत्ये बनून देवाची त्याचप्रमाणे विकृत पुरुषांची सेवा बजावितात.

विजापूर भागातील जातकर या मुस्लिम जमातीत प्रत्येक घरातील पहिली मुलगी अशा पद्धतीने सोडली व विकली जाते. त्याचप्रमाणे एखादी स्त्री नवऱ्याच्या जाचाला कंटाळली व तिला सोडपत्र हवे असले तर नवऱ्याला दोन-अडीच हजार रुपयापर्यंत खंडणी देऊन हे सोडपत्र मिळवावे लागते व हे खंडणीचे पैसे उभे करण्यासाठी त्या स्त्रीला शरीरविक्रयाशिवाय अन्य पर्याय क्वचितच सापडतो. त्यामुळेही काही स्त्रिया या व्यवसायात येतात.

या १४/१५ वर्षांच्या मुलीची विक्री मुंबईतील कुंटणखान्यात केली जाते. तिथे दोन/चार वर्षे धंदा केल्यानतर मुबईच्या बाजारात त्यांचा भाव उतरल्याने कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, पुणे अशा शहरातून त्यांची पुन्हा विक्री केली जाते. या ठिकाणी साधारणतः ३०/३५ वर्षे वयापर्यंत त्या व्यवसाय करतात. त्यानतर या स्त्रिया स्वतः 'मालकीण' बनतात. म्हणजे जवळ साठलेल्या भांडवलातून किंवा अन्य मार्गांनी ३/४ मुली खरेदी करून व्यवसाय करतात. या मुलींना किंवा बायांना गिऱ्हाईक 'मालकिणी'कडूनच मिळते व पैसेही त्यांच्या हिश्श्याप्रमाणे, म्हणजेच जगण्यापुरते मालकिणीकडूनच मिळतात.

या मालकिणीचेही मालक असतात. म्हणजे काही दलाल किंवा गुड दादा या बायकांना संरक्षण देण्याची हमी घेतात. काही वेळा लग्नही लावतात. एकेका मालकाच्या अशा ३०/४० बायकाही असू शकतात. या मालकाला मालकिणीकडून रोज ५ ते १० रुपये मिळनात. त्याशिवाय गरजेप्रमाणे मारहाण करूनही पैसे लुबाडले जातातच. मालकिणीने जमा केलेली ठेव या मालकाकडे ठेवलेली असते. ती बाई मेल्यानंतर ही ठेव मालकालाच मिळते.

गिऱ्हाईक, मालक यांच्याशिवाय आणखी एक नाते काही वेळा या वेश्यांनी जोडलेले असते. संसार करण्याच्या, मुलेबाळे असण्याच्या सुप्त इच्छेमधून या वेश्या एखादा प्रियकर शोधतात. या प्रियकराकडूनच आपल्याला मूल होईल अशी काळजीही या स्त्रिया घेतात. खानदानी किंवा पांढरपेशा घरातील तरुण बहुधा प्रियकर म्हणून शोधले जातात; परंतु या धंद्यातून बाहेर पडून संसार थाटणे फार क्वचितच या स्त्रियांना शक्य होते. एरवी या प्रियकराच्या आयुष्याचे मातेरे होण्यापलीकडे दुसरे काही फारसे साधत नाही. यामध्ये पुण्या-मुंबईतले तरुण अधिक संख्येने आढळून येतात.

चांगल्या घरातील मुली या धंद्यात ओढण्याचेही एक तंत्र बसविण्यात आले आहे. श्रीमंत तरुण गिऱ्हाइके एखादी चांगली मुलगी त्यांच्या पाहण्यात आल्यास ती आणून देण्यासाठी एखाद्या मालकिणीला पैसे देतात. वेश्यांपैकीच एखादी तरुण मुलगी या सावजाच्या मागावर पाठविली जाते. ही वेश्या या ना त्या प्रकारे त्या मुलीशी मैत्री करून, त्यासाठी हवा तितका खर्च करून, तिचा विश्वास संपादन करून गिऱ्हाइकाच्या हाती तिला अलगद आणून देते. एकदा या सापळ्यात फसल्यानंतर या मुलीला बाहेर पडता येत नाही व वेश्यांमध्ये आणखी भर पडते.

## पशुतुल्य जीवन

अशा प्रकारे वेश्या या बहुशः जबरदस्तीने, अज्ञानाने या धंद्यात ओढल्या जातात. पुढे जन्मभर दलाल, कोठीवाली, मालक, पोलिस, धंद्याच्या जागेचा मालक यांच्याकडून त्यांचे शोषण केले जाते. कापडापासून पानपट्टीपर्यंत सर्व प्रकारच्या दुकानात या वेश्यांची खाती असतात. हे दुकानदारही प्रत्येक वस्तूचा दुप्पट दर लावून या शोषणात सहभागी असतात. वयाच्या ३५।४० वर्षापर्यंत ती सतत कुणाची ना कुणाची ताबेदार राहिल्याने त्यांना दिवसाचे १२।१४ तासही धंदा करावा लागतो. यामुळे व दारूच्या व्यसनामुळे, रोजच्या मारहाणीमुळे या वेश्या व्याधिग्रस्त बनतात. चाळिशीनंतर फार तर दहा वर्षे ती मुली ठेवून पैसे मिळवू शकते. त्यानंतर या मुलींपैकीच कोणी तरी किंवा मालक त्यांना हाकलून लावतो व शेवटी भीक मागून रोगग्रस्त अवस्थेत या स्त्रियाना रस्त्यावर मरण येते.

अशा या व्यवसायात आज अनेक स्त्रिया पशुतुल्य जीवन जगत आहेत. अनेक सामाजिक प्रश्न या व्यवसायाशी निगडित आहेत. त्याहीपेक्षा माणुसकीला मान खाली घालायला लावणारे असे जीवन या स्त्रियांना जगावे लागते आहे. हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न गोपाळराव माने, मकबुल हुसेन यांच्यासारख्या कार्यकर्त्यांना भेडसावतो आहे. यातून काही मार्ग काढण्यासाठी 'देवदासी महिला समाज' या संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. या वेश्यांची सभा घेऊन तीमध्ये सर्वानुमते श्रीमती महबूब्बी दस्तगीर डागे ऊर्फ राधाबाई यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

साठीच्या पुढे वय असलेल्या या बाईंनी धंद्यासाठी चार मुली आपल्याकडे ठेवल्या आहेत. त्यांच्या मते, हा व्यवसाय समाजाला आवश्यकच आहे. तो बंद झाला तर सर्वसामान्य स्त्रीला रस्त्यावरून फिरणे अशक्य होईल. त्यांच्या मते चटक लागल्याने नवऱ्याला सोडून खुपीने या धंद्यात आलेल्या स्त्रियाही बऱ्याच आहेत व अशा स्त्रिया या धंद्यात कायम येत राहणार. आपल्या मुलाबाळांनी या धंद्यात न येता शिकून-सवरून नोकरी करावी असे बऱ्याच जणींना वाटते; पण भोवतालच्या वातावरणामुळे मुलेही बहुधा वाईट मार्गालाच लागतात. त्यातूनही काही स्त्रियांनी आपल्या मुलांना पदवीपर्यंत शिक्षण देऊन नोकरीला लावले आहे व त्यांचे संसार थाटून दिले आहेत. स्वतः डागेबाईंनी आपल्या बहिणीच्या मुलाला शिकवून नोकरीला लावले आहे. खानदानी घरातल्या अनेक मुली व बायका गुपचूप धंदा करतात. अशा 'पिरवेट' धंदा करणाऱ्या स्त्रियांवर डागेबाईंचा रोष आहे.

श्री. गोपाळराव माने 'देवदासी महिला समाज सघटनेच्या कार्याविषयी बोलताना म्हणाले, 'हा व्यवसाय समाजात असावा की असू नये हा वादग्रस्त मुद्दा आहे. आम्ही त्या वादात न शिरता काम करायचे ठरविले आहे.'

सध्या संघटनेने या स्त्रियाच्या मुलामुलींची लग्ने लावून देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. गेल्या दोन-अडीच वर्षांत अशी ४३ लग्ने करून देण्यात आली आहेत. अगदी कमीत कमी खर्च केला तरी दोन-अडीचशे रुपये एका लग्नाला खर्च येतो. हे पैसे कुठून उभे करायचे हा प्रश्नच असतो. मालक किंवा दलाल गुंडाचा या लग्नांना विरोध असल्याने मालकिणीला मुलांच्या लग्नासाठी ते पैसे देत नाहीत. परंतु कशीतरी जमवाजमव करून ही लग्ने पार पाडली जातात.

### उपाययोजना

१८ मे १९७५ ला अशी पहिली चार लग्नें लावण्यात आली. या पहिल्या लग्नांचा खर्च बाळू जोगत्याने केला. त्याची सविस्तर हकिगत गोपाळरावांनी सांगितली. या लग्नासाठी पैसे कुणाकडे, कसे मागायचे असा प्रश्न उभा राहिला असताना मकबूलभाईंनी एक उपाय शोधून काढला. या जोगत्यांच्या दर शुक्रवारी अंगात येते. त्यावेळी अनेक प्रतिष्ठित मंडळीसुद्धा या जोगत्यांकडे अडचणीवर उपाय विचारण्यासाठी येतात. एका शुक्रवारी गोपाळराव माने स्वत: मकबूलभाईंच्या म्हणण्यानुसार बाळू जोगत्याकडे गेले. अंगात आलेल्या बाळू जोगत्याने सांगितले, 'भक्ता, तू समाजासाठी काम करतो आहेस. तुझी अडचण दूर होईल.' ही 'शिवकळा', म्हणजे अंगात येणे गेल्यानंतर बाळू जोगत्याने गोपाळरावांनाच विचारले 'आईने (म्हणजे अंगात आलेल्या देवीने) काय सांगितले ?' काम होणार असे सांगितल्यावर बाळू जोगत्याने काही वेळ विचार केला व आपण या लग्नांचा सर्व खर्च एका अटीवर करण्यास तयार असल्याचे सांगितले. ही लग्ने बाळू जोगत्याच्या दारात मांडव घालून व्हावीत एवढीच त्याची अट होती. बाळू जोगत्याने २–२॥ हजार रुपये खर्च करून ही लग्ने लावून दिली.

गोपाळराव म्हणाले 'यावेळी आम्ही जो मार्ग अनुसरला तो काही लोकांना पटणार नाही. परतु अंधश्रद्धेने नव्हे तर पूर्णपणे समजून उमजून हा मार्ग आम्ही अनुसरला. जबरदस्तीने हिजडा बनविले गेले, ही बाळू जोगत्याची कायमची व्यथा आहे. त्या व्यथेतूनच बाळू जोगत्याचा आमच्या कामाला पाठिंबा मिळाला. पण त्यासाठी त्याच्या तंत्राने जावे लागले.'

या लग्नाच्या उपक्रमाशिवाय अन्यही काही उपक्रम हाती घ्यायचे असल्याचे गोपाळरावांनी सांगितले. वेश्यांना लायसेन्स द्यावे. तसेच त्यांना सरकारने शहरात व्यवसायासाठी स्वतंत्र जागा द्यावी. त्यामुळे पोलिसाकडून व गुंडाकडून होणारी छळवणूक थांबविता येईल. त्याचप्रमाणे जागा–मालकांकडून जो त्रास होतो तोही थांबेल. एका ठिकाणी वस्ती असल्याने त्यांना संरक्षण देणेही सरकारला शक्य होईल. लायसेन्स देऊन वैद्यकीय तपासणीची सोयही सरकारने करावी. त्यामुळे गुप्त रोग्यांना काही प्रमाणात आळा बसेल. एक प्रकारे समाजाची सेवा करणाऱ्या या स्त्रियांच्या जीवनाला सुरक्षितता लाभावी व त्यांचे उतारवयातील जीवन चांगले जावे यासाठीही शासनाने काही योजना आखावी.वेश्यांच्या अशा अनेक मागण्या संघटनेच्या वतीने शासनापुढे मांडण्यात येणार आहेत.

देवदासी–पद्धत बद व्हावी यासाठी अशा देवस्थानांच्या ठिकाणी एक वर्ष पत्रके वाटण्यात आली. आळत्याला एका ठिकाणी विक्रीचा व्यवहार थांबविण्याच्या प्रयत्नात माने व मकबूलभाईंना मारहाण करण्यात आली.

ही वाईट रूढी बद होण्यासाठी संघटना अनेक मार्गांनी प्रयत्न करणार आहे. देवदासी होऊन या धंद्यात आलेल्या वेश्याचा या मोहिमेला पूर्ण पाठिंबा आहे. या धार्मिक रूढीपायी आपल्याला हे जीवन भोगावे लागत असल्याची चीड त्यांच्या मनात आहे. ही चीड धर्माला आणि यल्लाम्मादेवीला त्यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या शिव्या-शापांतून काही वेळा व्यक्त होते; परंतु पत्रके वाटून तसेच खेडोपाडी, घरोघरी जाऊन या रूढीविरोधी प्रचार करण्यासाठी जो खर्च येणार आहे, त्याची काहीच सोय संघटनेकडे नाही. आता लोकांकडूनच हा निधी जमवावा असे ठरले आहे.

आजवर या कामात अनेक संघ-स्वयंसेवकांनी, एवढेच नव्हे तर त्यांच्या माता-भगिनींनीही आपल्याला सर्व सहकार्य दिले असल्याचे श्री. गोपाळराव माने यानी मला आवर्जून सांगितले. यापुढे अधिकाधिक लोकांचे या कामात सहकार्य मिळावे आणि या संघटनेचे कार्य वेगाने व्हावे अशी आपली इच्छाही त्यांनी व श्री. मकबूलभाईंनी बोलून दाखविली.

यातून महाराष्ट्रभर 'दलित स्त्री दास्य-मुक्ती चळवळ' उभी राहावी असे या कार्यकर्त्यांना वाटते. □

# गांधीवादी समाजवाद

नारायण वैद्य

लोकशाहीप्रधान रचना, कार्यपद्धती, व्यवहार, कायद्याचे अनुशासन आणि व्यक्तीचे स्वातंत्र्य याचे अवमूलन न करता जनतेच्या मूलभूत गरजा कशा पूर्ण करावयाच्या, मोठ्या प्रमाणावर पसरलेली असमानता कशी नष्ट करावयाची आणि कमीत कमी काळामध्ये अधिकाधिक रोजगार कसा उपलब्ध करून द्यावयाचा हे देशापुढील आजचे खरे आव्हान आहे,' असे आजच्या आर्थिक परिस्थितीचे वर्णन करताना गृहमंत्री श्री. चरणसिंग म्हणतात. त्यांच्या मते आजपर्यंतच्या कॉंग्रेसप्रणीत सरकारची आर्थिक धोरणेच या 'आर्थिक अराजकाला' जबाबदार आहेत. त्यावर टीका करताना गृहमंत्री म्हणतात; '१९५१ मध्ये पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेला एकामागून एक अशा अनेक संकटांना तोंड देण्याची वेळ आली आहे. १९५५-५६ मध्ये जे आर्थिक धोरण आखण्यात आले त्यामुळे संकटाची तीव्रता वाढतच गेली. आतापर्यंतच्या इतक्या पंचवार्षिक योजनांची फलश्रुती काय ? तर दारिद्र्यात वाढच झाली आहे. आजही ३५ कोटी जनतेला पोटभर अन्न मिळत नाही.' श्री. चरणसिंगांच्या मते आज देश आर्थिक अराजकाच्या उंबरठ्यावर उभा आहे आणि याला आजपर्यंतच्या सरकारचे चुकीचे विकास-धोरण कारणीभूत आहे. १९३७ पासून पंडित जवाहरलाल नेहरूंचा भारतीय नियोजनाशी संबंध आला तो १९६४ पर्यंत. पं. जवाहरलाल नेहरूंच्या चुकीच्या आर्थिक रचनेवर टीका करताना श्री. चरणसिंगानी म्हटले आहे, 'पं. नेहरूंच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाखाली दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत अवजड उद्योगांना बेहिशेबी प्राधान्य देण्यात आले. निर्यातीद्वारा राष्ट्रीय संपत्ती वाढविण्याचा चुकीचा समज त्यानी करून घेतला होता. त्यामुळे शेती-उद्योगाकडे दुर्लक्ष झाले

परिणामी अमेरिकेबरोवर पी. एल्. ४८० खाली दीर्घ मुदतीचा अन्न–धान्य आयात करण्याचा करार करणे भाग पडले. आतापर्यंत ६ हजार कोटीचे धान्य आयात करून सुद्धा निम्मी जनता भुकेली राहिली ही पं. जवाहरलाल नेहरूंच्या नियोजनाची शोकांतिका आहे.'

बेकारी निर्मूलन आणि दारिद्र्य दूर करणे याबाबत पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी जे विचार व्यक्त केले ते श्री. चरणसिंगांच्या विचारांशी बरेचसे मिळते–जुळते आहेत. थोडा फरक असेल तर मतभेदाचा नसून पं. दीनदयाळजींनी भावी काळातही अशा चुका होऊ नयेत म्हणून काही मूलभूत सिद्धान्त माडला त्याचा आहे, पं. दीनदयाळजीच्या म्हणण्यानुसार वयात आलेल्या प्रत्येक निरोगी माणसाला 'लाभप्रद' काम देणे हे औद्योगिक नीतीचे 'ध्येय' असले पाहिजे. लोकसंख्या, त्यात बेकारीचे प्रमाण, त्यांची उत्पादनक्षमता, देशात उपलब्ध कामाचे स्वरूप याच्यासह बेकारीची स्थिती व व्याप्ती याचा विचार व्हावयास पाहिजे. काम करण्याचा हक्क घटनेत नमूद करावयास हवा म्हणजे कोणाचेही सरकार आले तरी प्रत्येकाला काम देण्याचे बंधन त्या सरकारवर राहील. (याबाबत पतप्रधान मोरारजीभाईंनी मात्र या हक्काचा घटनेत समावेश सध्या करण्याचे नाकारले आहे. सर्वांना काम दिल्यानंतरच हा हक्क घटनेत समाविष्ट केला जाईल असे त्यांनी सांगितले. खर म्हणजे सर्वांना काम देण्याचे कायदेशीर बंधन सरकारवर असावे म्हणून तर कामाचा हक्क घटनेत हवा.)

आजच्या आर्थिक अराजकापासून भारताला वाचविण्यासाठी म. गांधीप्रणीत समाजवादाचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे असे श्री. चरणसिंगांनी सागितले आहे. बेकारी निर्मूलनाच्या कार्यात स्वातंत्र्यप्राप्तीनतरचे देशाचे नेतृत्व पूर्णपणे अयशस्वी झाले आहे असा स्पष्ट आरोप त्यांनी केला आहे. याचे स्पष्टीकरण करताना 'त्या' नेतृत्वाने चुकीचे आर्थिक आदर्श डोळ्यासमोर ठेवले असा श्री. चरणसिंगांचा दावा आहे. 'अवजड उद्योगाची वाढ करून विकास साधणारी पाश्चात्य आर्थिक रचना किंवा ठोकळेबाजपद्धतीने सर्व आर्थिक विकास पद्धतीवर शासकीय नियंत्रण ठेवणारी रशियन पद्धतीची रचना यापैकी आपल्याला कोणतीच उपयोगी पडणारी नाही. भांडवलाचा भरमसाठ संचय करणारी आणि लक्षावधी भारतीय बेकारांना वेगाने काम पुरवू न शकणारी म्हणून पहिली अर्थव्यवस्था उपयोगाची नाही आणि रशियन पद्धत ही देशाच्या लोकशाही परंपरेशी आणि स्वभावधर्माशी पूर्णपणे विसंगत आहे म्हणून तीही आपल्याला नको. या दोन्ही पद्धतीपासून भिन्न अशी सोइस्कर अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा मार्ग म. गांधीप्रणीत समाजवादी अर्थव्यवस्थेत सापडेल' असे श्री. चरणसिंगाना खात्रीपूर्वक वाटते. त्याच्या मते औद्योगीकरणाला महात्माजीचा कधीही विरोध नव्हता. औद्योगीकरण पूर्णपणे बाजूस न सारता त्याचा उपयोग स्थळ-काळपरत्वे मर्यादित असावा असे गांधीजी म्हणत. आपल्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत अवजड किंवा मोठे उद्योग हे आर्थिक रचनेचे (economic structure) शिखर बनावेत व शेती, हस्तव्यवसाय, ग्रामोद्योग व कुटीरोद्योग हा पाया बनावा असे गांधीजी म्हणत असत. म. गांधीप्रणीत समाजवादी (अर्थ) रचनेचा 'श्रमप्रधानयुक्त साधे तंत्र आणि विकेंद्रित लघुउद्योगातून उत्पादन' हा गाभा आहे. या रचनेत राष्ट्रीय उत्पन्नाचा प्रत्यक्ष लाभ कामगाराला मिळतो. त्यामुळे मक्तेदारी पद्धतीची वाढ होण्याची शक्यता उरत नाही. परिणामी (गरिबी दूर करण्यासाठी) संपत्तीच्या पुनर्वाटणीचे कार्य हाती घेण्याचे प्रयोजन गांधीप्रणीत समाजवादी अर्थरचनेत सरकारकडे येत नाही.

भारताच्या प्रचलित विशेष परिस्थितीत गृहमंत्र्यांनी गांधीप्रणीत समाजवादाचे (Gandhian Socialism) जे विश्लेषण केले ते मार्गदर्शक असेच आहे. मार्च ७७ मध्ये काँग्रेसचा दारुण पराभव व जनतापक्षाचा दैदिप्यमान विजय हे केवळ राजकीय स्थित्यतर नव्हे तर राजकीय विचारांतील परिवर्तन आहे व हे परिवर्तन म्हणजे राजकीय मतप्रणालीच्या ध्रुवीकरणाचा परिपाक आहे. मार्च ७७ मध्ये भारतीय जनतेने हुकूमशाही विरुद्ध व लोकशाहीच्या बाजूने कौल दिला ही घटना साधी वा किरकोळ वा अकस्मात घडलेली (accidental) नाही. कारण याच घटनेची पुनरावृत्ती त्यानंतर झालेल्या अनेक प्रांतातील विधानसभाच्या निवडणुकांत प्रत्ययास आली.

तसेच ज्याप्रमाण एका बाजूला राजकीय मताचे ध्रुवीकरण सुरू झाले त्याचप्रमाणे दुसऱ्या बाजूला भारतीय अर्थनीतीच्या सिद्धान्ताचेही ध्रुवीकरण सुरू झाले आहे. महात्मा गांधीनी देशातल्या कोट्यवधी जनतेचे दारिद्र्य दूर व्हावे आणि जीवनाच्या मूलभूत गरजा त्याना प्राप्त व्हाव्यात म्हणून आर्थिक अडचणीवर काही उपाय सुचविले, काही सैद्धान्तिक कल्पना मांडल्या. प. जवाहरलाल नेहरू स्वत:ला गांधीजीचे वारसदार समजत असत; परंतु राजकारणापुरतेच ते मर्यादित ठरले. पहिल्या पंचवार्षिक योजनेची आखणी करताना गांधीप्रणीत समाजवादाचे काही त्रोटक सिद्धान्त त्यात सामावून घेण्याचा नेहरूनी प्रयत्न केला; परंतु दुसरी पंचवार्षिक योजना आखताना आणि त्यानंतर १९६४ पर्यंत पंडितजीनी आर्थिक धोरणातच बदल केला. समाजवादाकडे झुकणारी अर्थव्यवस्था असे म्हणत म्हणत एकीकडे त्यानी कृषिसपत्तीकडे दुर्लक्ष केले व दुसरीकडे (भांडवलशाही पद्धतीने) अवजड उद्योगांना अर्थव्यवस्थेत प्राधान्य दिले आणि अशा प्रकारे गांधीजीच्या या मानसपुत्राने गांधीप्रणीत समाजवादी सिद्धान्ताचा पराभव केला. काँग्रेस पक्षातील लहान–मोठे कार्यकर्ते आणि ह्या पक्षाचे अखिल भारतीय नेतृत्वही महात्मा गांधीचे आर्थिक सिद्धान्त प्रत्यक्षात आणण्यास असमर्थ ठरले व ज्या काँग्रेसला गतिमान आणि ध्येयसिद्ध करण्यात महात्म्याने आपले आयुष्य वेचले त्याच्या सिद्धान्ताचा पराभव याच काँग्रेसने केला.

गेल्या तीस वर्षांत काँग्रेसपक्षीय सरकारने जी काही आर्थिक धोरणे ठरविली व ती राबविण्यासाठी ज्या काही पंचवार्षिक योजना कार्यान्वित केल्या त्यामुळे देशापुढील आर्थिक समस्यांची तीव्रता कमी तर झालीच नाही, उलट वाढली. तीस वर्षांपूर्वीची आर्थिक समस्यांची आव्हाने आजही अधिक तीव्र स्वरूपात उभी ठाकलेली पाहून काँग्रेसची आर्थिक धोरणे साफ फसली असे अनुमान गृहमंत्री चरणसिंग– ज्यांनी गांधीप्रणीत समाजवादी आर्थिक सिद्धान्ताचा सखोल अभ्यास केला आहे– यांच्यासह अनेक अर्थतज्ज्ञानी काढली आहेत व ही आर्थिक संकटे नाहीशी व्हावीत यासाठी वैचारिक मंथन सुरू झाले आहे. ही आर्थिक विचारांच्या ध्रुवीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्याची नांदी आहे. □

# भारतीयत्वाचा वेध घेणारा सत्यशोधक

विदुर



भारताच्या गेल्या ३० वर्षांच्या स्वातंत्र्योत्तर कालखंडात राष्ट्रीय पुनर्रचनेची स्पष्ट रूपरेखा मांडणाऱ्या विचारवंतांत पं. दीनदयाळ उपाध्याय यांची गणना प्रामुख्याने केली जात नाही. एक तर त्यांचे विचार लोकांसमोर येत होते त्याच वेळी त्यांचा अचानक अंत झाला. दुसरे असे की, दीनदयाळजी स्वतः प्रसिद्धिपर नव्हते. किंबहुना ते प्रसिद्धी टाळत असत. आणखी एक कारण असे की, गेल्या तीस वर्षांत ज्यांनी भारताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक पुनर्रचनेसंबंधी आपले विचार मांडले ते सर्व नेते स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी होते. त्यामुळे त्यांच्यावर प्रकाशझोत आपोआप पडत असे. दीनदयाळजी रा. स्व. संघासारख्या राजकारणापासून अलिप्त असणाऱ्या व दूरगामी राष्ट्रकारण करणाऱ्या संघटनेच्या पठडीत वाढलेले होते. त्यामुळे त्यांना राजकीय पार्श्वभूमी नव्हती. किंबहुना संघाने केलेल्या संस्कारांतून त्यांचे व्यक्तित्व जन्मले होते आणि अनिच्छेनेच ते राजकारणात आले. जनसंघाची संघटनात्मक बैठक बसविण्यात, ती दृढ करण्यात दीनदयाळजींचा मोठा वाटा होता. म्हणूनच डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींनी 'मला दोन दीनदयाळ द्या—म्हणजे माझा पक्ष उभा राहील!' असे उद्‌गार त्यांच्याविषयी काढले होते. डॉ. मुखर्जींचेही पुढे निधन् झाले. डॉ. रघुवीरही गेले. त्यामुळे दीनदयाळजींवर जनसंघाला वैचारिक बैठक देण्याचीही जबाबदारी पडली. तेथूनच त्यांच्या विचारप्रवर्तनाला सुरुवात झाली. राष्ट्रचिंतन हा दीनदयाळजींचा नित्याचाच विषय होता; पण आता हे चिंतन राष्ट्राच्या विविध समस्यांविषयी करावयाचे होते.

### राजनैतिक भाष्यकार

भारतीय जनसंघाचे विचारवंत म्हणून दीनदयाळजींनी जे कार्य केले ते भारताच्या राजकीय इतिहासात महत्त्वाचे आहे. किंबहुना त्यांनी जी दिशा दाखविली ती आजही अत्यंत महत्त्वाची व उपयुक्त आहे. कारण आजही देश काँग्रेसच्या शासनातून मुक्त झाल्यानंतर नवे वळण घेत आहे. गेल्या ५० वर्षांत भारतात जे विचारमंथन झाले त्यात गांधीवाद, मार्क्सवाद, हिंदुत्ववाद व नेहरूंची विचारधारा या महत्त्वाच्या विचारधारा होत्या. नेहरू व त्यांची कन्या यांचे राज्य ३० वर्षे या देशावर असल्यामुळे भारताच्या आर्थिक–राजकीय जीवनाला त्यांनी स्वतःच्या कल्पनेप्रमाणे वळण लावण्याचा प्रयत्न केला. नेहरूंनी गांधीवादाला रजाच दिली. फक्त राजकारणात विनोबांचा चाणाक्षपणे उपयोग करून सर्वोदयी क्रांती निष्प्रभ केली. रशियाच्या नियोजनाचे अनुकरण आणि भांडवलदारांचा अनुनय असे चमत्कारिक मिश्रण या देशात तयार झाले. हिंदुत्ववादी विचारवंतांनी हिंदु–मुस्लिम प्रश्न, पाकिस्तानचे संकट यांचाच प्रामुख्याने विचार केला आणि तसे राजकारण चालविले. त्यांनी सामाजिक–आर्थिक पुनर्रचनेचा विचारच मांडला नाही असे म्हटले तर चुकणार नाही. त्यामुळे प्रत्याघाती हिंदुत्व–आक्रमक हिंदुत्व हेच प्रबळ ठरले. या एकांगीपणामुळे समाजाची सहानुभूती मिळाली नाही; पण जनसंघाच्या स्थापनेनंतर समाजाची सेवा करणारे राजकारण–अर्थकारण करणे आवश्यक होते. कम्युनिस्ट, समाजवादी व नेहरूवादी यांच्याशी सामना करावयाचा होता. त्यामुळे जनसंघाला सर्वांगीण स्वरूप देणे आवश्यक होते. सामाजिक–आर्थिक पुनर्रचनेचा विचार मांडण्याची

गरज होती. अशा वेळी दीनदयाळजींनी आपले विचार मांडण्यास सुरुवात केली. त्यांचा वैचारिक पिंड संघाने पोसला होता. त्याना जीवनदृष्टी संघाने दिली होती. त्यांची जीवनमूल्ये ही भारतीय जीवनमूल्ये होती. आदर्श पूर्णपणे भारतीय होते; पण त्याची प्रवृत्ती दुराग्रही व पूर्वग्रहदूषित नव्हती. पूर्वग्रह न ठेवता ते नव्या विचार-सरणीकडे पाहत. तिचे मूल्यमापन करीत. राजकारणात आल्यावर जगातील सर्व विचारप्रणालीचे त्यानी सूक्ष्म अध्ययन केले.

## तात्त्विक समस्या

१९५० नंतर ज्या राष्ट्रीय समस्या उभ्या होत्या, जे पुनर्रचनेचे प्रश्न उभे होते त्यांच्या मुळाशी जाण्याची गरज होती. घोषणा, पोथीनिष्ठ विचार, व्यक्तिनिष्ठ विचार यामुळे सत्यशोधकात व्यत्यय येतो. दीनदयाळजींची वृत्ती राजकीय सत्यशोधकाची होती. राज-कारणात राहून ते प्रसिद्धी व सत्ता यापासून अलिप्त राहून सत्य-शोधक म्हणून वावरत होते. वृत्ती दार्शनिकाची होती. त्याना असे दिसले की, भारत लोकशाही भांडवलदारांच्या मिठीत सापडण्याचा धोका आहे. अंध राष्ट्रवाद जागतिक शांतता धोक्यात आणतो. समाजवाद भांडवलशाहीचे उच्चाटन करतो; पण व्यक्तिस्वातंत्र्या-वर आधारलेली लोकशाहीही धोक्यात येते, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तत्त्वत्रयी एकत्र कशी नांदेल, समाजाची रचना त्या दृष्टीने कशी करता येईल, याचा विचार युरोपमध्ये झाला नाही. प्रत्येक समस्येचा कप्पेबंद विचार झाला. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा पुर-स्कार करणाऱ्या तत्त्वज्ञानात अनिर्बंध आर्थिक स्वातंत्र्याची संकल्पना आली. भांडवलशाही व औद्योगिक क्रांती झाली; पण त्यातून नवा शोषकवर्ग युरोपमध्ये निर्माण झाला. मार्क्सने त्याच्या पार्श्वभूमीवर आपले तत्त्वज्ञान मांडले. त्यातून रशियन राज्यक्रांती झाली. तेथे आर्थिक समता आली; पण व्यक्तिस्वातंत्र्य नाहीसे झाले. बंदिस्त समाज व एककेंद्री सत्तावाद आला. पुन्हा हे दुष्ट चक्र चालू राहिले. त्याखेरीज भांडवलशाही व कम्युनिझम या दोहोंमुळे वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक तणाव, नागरी समस्या निर्माण झाल्या. भारतात याचे अनुकरण होता कामा नये ही दीनदयाळजींची धारणा होती. म्हणून त्यांनी अनेक विचारवंताशी, पुढाऱ्यांशी चर्चा केल्या. या अभ्यासातून-चिंतनातून त्यांनी काही निष्कर्ष काढले. त्यातील मुख्य सूत्र या सर्व समस्यांचा विचार एकत्रित केला पाहिजे आणि तो विचार करताना प्राचीन भारतीय विचारांची बैठक सोडता कामा नये. व्यक्ती व समाज, स्वदेश व जग, समाजातील विविध आर्थिक व सामाजिक हितसंबंधी गट या सर्वांचा विचार तात्कालिक समस्यां-चीच केवळ सोडवणूक करण्याच्या हेतूने न करता चिरस्थायी सोडवणूक करण्यासाठी झाला पाहिजे.

## एकात्मतेचा विचार

हिंदुविचारामध्ये एकात्मता आहे. त्यात मानव हा सृष्टीचा एक अंश आहे. मनुष्यप्राणी हेच केंद्र समजून पाश्चात्य विचारवंतांनी आपली सारी तत्त्वज्ञाने उभी केली; पण साऱ्या विश्वाला व्यापून राहिलेल्या आत्म्याचा विचार केला नाही. उलट आपली उपनिषदे 'आत्मा वाऽरे द्रष्टव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्य:' असे सांगत होती. या आत्म्याची अनुभूती हाच माणसा-माणसांतील दुवा आहे. हे आत्म्याचे बंधन शब्दातीत आहे. ही आत्म्याची एकता जगात आव-श्यक आहे. त्या एकात्मतेच्या भावनेवरच मानवाच्या समस्यांचा विचार झाला पाहिजे. त्या एकात्मतेचा अनुभव-साक्षात्कार-जाणीव मानवाला झाली तर त्याच्या सर्व समस्या सोडविण्याची निश्चित दिशा ठरविता येईल. त्यात अंतर्द्वंद्वे निर्माण होणार नाहीत. मग 'हे विश्वचि माझे घर' ही भावना त्यातून सहज शक्य होईल. कप्पेबंद विचारामुळे, स्वत:च्या अस्तित्वाचाच अतिरेकी विचार झाल्यामुळे साम्प्रदायिकता, आक्रमकता, स्पर्धा ह्या विकृती जगात निर्माण झाल्या व त्यातून युद्धे झाली. एका राष्ट्राची जीवनपद्धती दुसऱ्यावर लादण्याचे, दुसऱ्या राष्ट्राना गुलाम करण्याचे प्रयत्न झाले.

## राष्ट्रजीवनाचा मूलमंत्र

राष्ट्रीयत्वाची भारतीय संकल्पना युरोपमधील राष्ट्रवादापेक्षा भिन्न आहे. राष्ट्रीयत्व ही उत्क्रांत होणारी विकसनशील कल्पना आहे; पण एखादा समाज आपण एक आहोत, वेगळे आहोत, आपले शत्रु-मित्र एक आहेत, आपले हितसंबंध समान आहेत, आपली जीवन-पद्धती वैशिष्ट्यपूर्ण आहे असे जेव्हा मानू लागतो, ही समानबंधाची भावना जेव्हा दृढ होत जाते तेव्हा राष्ट्रीयत्वाचा जन्म होतो. ती राष्ट्रीय अस्मिता सुप्त असते, अदृश्य असते. तिचे दृश्यमान स्वरूप त्या राष्ट्रात व्यक्त होते त्याला संस्कृती म्हणता येईल. राष्ट्रीय अस्मिता हा राष्ट्राचा आत्मा असतो. ते एक शाश्वत सत्य असते. ही राष्ट्रीयतेची समाजात असलेली 'एक-लोक' ही सामूहिक भावना हा राष्ट्रीयत्वाचा मूलाधार असतो. यालाच दीनदयाळजींनी 'चिती' असे म्हटले आहे. ही राष्ट्रीय भावना कायम राहिली तर कितीही गंभीर संकट आले तरी ते राष्ट्र उभे राहते. व्यक्तीच्या जीवनात बालपण-म्हातारपण, दारिद्र्य-श्रीमंती, उन्नती-अवनती अशा अवस्था असतात तशाच त्या राष्ट्रजीवनात असतात; परंतु कोणतीही अवस्था असली तरी ही राष्ट्रीयतेची 'एक-लोक' ही भावना कायम राहते. तीच राष्ट्राची नवोन्मेषकर्ती शक्ती असते. ही शक्ती हा राष्ट्राचा आत्मा मानला तर त्याला सक्रिय करणारे प्राणतत्त्वही असतेच. मानवी शरीराच्या हालचाली प्राणामुळे शक्य होतात तसेच राष्ट्राचे जीवन प्राणतत्त्वामुळे शक्य होत असते. यालाच दीन-दयाळजींनी 'विराट' अशी संज्ञा दिली आहे. या आत्म्याच्या प्रकाशात पुढे जाणारी संघटित जनशक्ती हे या विराटाचे दीन-दयाळजींना अभिप्रेत असलेले स्वरूप आहे. ही समाजाची प्राणशक्ती असेल तर ती ऐहिक व पारमार्थिक ऐश्वर्य मिळवू शकते. हाच भारतीय राष्ट्रवादाचा मूलमंत्र आहे. तो प्रादेशिक राष्ट्रवादापेक्षा, राष्ट्र-राज्याच्या संकल्पनेपेक्षा वेगळा आहे. हा सिद्धांत दीन-दयाळजींच्या राजकीय विचारप्रणालीचा गाभा आहे.

## राष्ट्राचे सांस्कृतिक व्यक्तित्व

भारताच्या सामाजिक-आर्थिक पुनर्रचनेच्या प्रयत्नातही आपल्या संस्कृतीचा विचार झाला पाहिजे, आपल्या जीवनमूल्यांचे भान असले पाहिजे, हा सांस्कृतिक राष्ट्रवादाचा मुख्य आग्रह आहे. टिळक, अरविंद, विवेकानंद यांच्या काळात भारत हे एक राष्ट्र आहे की

नाही याबद्दल ब्रिटिश लोक शंका घेत. त्याला उत्तर म्हणून भारतीय राष्ट्रवाद ५००० वर्षांइतका जुना आहे, त्याला विशिष्ट संस्कृती आहे, जीवनाचे तत्त्वज्ञान आहे व ते आम्ही जगाला देऊ इच्छितो ही सांस्कृतिक अस्मिता त्यांनी जागृत केली व त्यातून आपली राष्ट्रवादाची कल्पना मांडली. गांधीजींनी भारतीय राजकारणांचे उद्दिष्ट नुसते स्वातंत्र्य मिळविणे हे नाही तर सामाजिक–आर्थिक पुनर्रचना करून अंत्योदय करणे हेही आहे ही कल्पना मांडली. स्वदेशी, रामराज्य, ग्रामस्वराज्य यासारख्या अस्सल भारतीय संकल्पना आपल्या काळात रूढ केल्या. तेव्हा भारताचे सांस्कृतिक व्यक्तित्व या संकल्पनांतून प्रकट झाले. याच काळात १९४० नंतर रा. स्व. संघाचे नेतृत्व श्री. गोळवलकरगुरुजींकडे आले. त्यांची वैयक्तिक बैठक रामकृष्ण–विवेकानंदांची होती. त्यामुळे संघाची विचारसरणी मांडताना त्याच परिभाषेचा त्यांनी वापर केला. गांधीजी गेल्यावर कम्युनिझम व पश्चिमेचे अंधानुकरण यांना गुरुजींनी सतत विरोध केला तो याच सांस्कृतिक भूमिकेतून होता. दीनदयाळजींनी राजकारणांत हा विचारप्रवाह आणला आणि त्या दृष्टीने सर्व मांडणी केली. सारांश, जे कार्य गांधीजींनी सुरू केले होते त्याचा विचार भारतीय संस्कृतीच्या दृष्टिकोणातून करून श्री. गुरुजी व दीनदयाळजी यांनी गांधी-विचारातला ग्राह्यांश प्रकटपणे स्वीकारला. श्री. गुरुजींचे गांधीजींविषयीचे भाषण प्रसिद्ध आहे. त्यात गुरुजी म्हणाले होते, ‘ गांधीजींच्या जीवनापासून सत्याचा आग्रह शिकला पाहिजे. खोटया मार्गाने धन प्राप्त करून घेण्याचे सोडले पाहिजे. खोटया मार्गाने धन मिळविताना आपण आपल्याच समाजातल्या लोकांना पिळून काढतो, त्याची दिक्कतही आपणाला वाटत नाही. देशात असंख्य लोक उपाशी राहत आहेत. त्यांच्यासाठी स्वतःचा विचार कमी करून समाजाच्या भावनांशी सर्वतोपरी एकरूप होऊन आपण पुढे यायला नको का ? ही भावना आपल्यात नसेल तर आपण म. गांधींना आदर्श मानतो असे कसे म्हणावयाचे ?’ दीनदयाळजींनीही समाजासाठी त्याग करण्याची आपली परंपरा पुढे चालविली पाहिजे असे आग्रहाने सांगितले होते. ते म्हणत की, ‘वृक्षावर आलेली फळे वृक्ष खात नाही, तसेच आपले सत्कर्म समाजाला अर्पण केले पाहिजे राष्ट्राची घडण करण्यासाठी कुठलीही पद्धती स्वीकारली–समाजवाद जरी स्वीकारला तरी व्यक्ती व समाज परस्परपूरक, साहाय्यक व अभिन्न असले पाहिजेत, ही गरज कायम राहते, ही भारतीय विचारसरणी आहे. येथे समाजाच्या शासनाचा कंत्राटदारी विचार नाही. परस्पर समजुतीचा विचार प्रबळ आहे. पश्चिमेत दोन द्वंद्वाच्या विचारसरणी प्रबळ झाल्या. एकीत व्यक्तिप्रधानता व समाजाला गौणत्व मिळाले. दुसरीत समाज सर्वशक्तिमान समजून व्यक्तीची सर्जनशीलता, तिचे स्वातंत्र्य याचे अपहरण झाले. या दोन एकांगी विचारांना बाजूला सारून भारताने आपली रचना केली पाहिजे. समाजरचना करताना त्याचे आंतरिक एकत्व कायम ठेवून बाहेरच्या जीवनाची रचना केली पाहिजे.’ यंत्रयुगाने निर्माण झालेल्या समस्या यंत्रांचा आत्यंतिक उपयोग झाल्यामुळे उद्भवल्या. गांधीजीप्रमाणे दीनदयाळजींच्या विचारात या तंत्रविज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा अंतर्भाव केलेला आहे. सामाजिक समस्यांचा विचार करताना धर्मविचार बाजूला ठेवता कामा नये. दुसऱ्याला त्रास देणे हा अधर्म आहे आणि आनंद देणे हा धर्म आहे. यासारख्या आचारसंहितेमुळे समाजाची धारणा होते. समाजात परस्पर सहानुभूती, प्रेम, समजूत टिकून राहते. असे धर्माचरण हाच सामाजिक व्यवहाराचा आधार असला पाहिजे. या धर्माचरणाचे महत्त्व दीनदयाळजींनी प्रतिपादिले होते.

### नवे समाजदर्शन

दीनदयाळजींनी भारताच्या सांस्कृतिक परंपरेला अनुरूप अशी अर्थरचना हवी असे सांगितले. याचे मुख्य कारण मनुष्य हा केवळ अर्थार्जन करणारा प्राणी नाही. त्याच्या आध्यात्मिक गरजाही अर्थाइतक्याच महत्त्वाच्या आहेत. समाजाचे माणुसकीला पारखे झालेले स्वरूप बदलून त्यात माणुसकीची स्थापना करणे अत्यंत आवश्यक आहे. भांडवलशाही व कम्युनिझम या दोन्हीमध्ये याचा विचार होत नाही. भोगलालसा, त्यातून महत्त्वाकांक्षा स्पर्धा व त्यामुळे नैतिक अधःपतन हे आजच्या समाजाचे स्वरूप आहे. कम्युनिस्ट राजवटीत माणसाचे स्वतंत्र अस्तित्व लोप पावते म्हणून तो टाळला पाहिजे म्हणून उत्पादन व उपभोग याचे संतुलन करून मानवी जीवन सार्थ करणे हे आपल्या समाजरचनेचे उद्दिष्ट आहे. म्हणून दीनदयालजींनी असे स्पष्टपणे म्हटले आहे की, ‘ जगाच्या समस्यांचे उत्तर नवे जीवनदर्शन निर्माण केले तर मिळेल. ते जीवनदर्शन उभे करताना हिंदु विचाराचा समग्र व एकात्म दृष्टिकोण ध्यानात ठेवला पाहिजे. ’ हिंदु विचार हा विज्ञानविरोधी नाही हेही दीनदयाळजींनी सांगितले होते; पण पाश्चात्य विज्ञानाचे अंधानुकरण होता कामा नये. भारतीय समाजरचनेची मूलतत्त्वे सांगताना दीनदयाळजींनी धर्मराज्य, लोकशाही, सामाजिक समता व आर्थिक विकेंद्रीकरण अशी चतुःसूत्री सांगितली आहे भारताच्या नव्या जीवनदर्शनाची ही मूलतत्त्वे असतील मग त्याला नाव कोणतेही देता येईल. असा समाज भारताच्या परंपरेशी अनुरूप होऊ शकेल. त्यामुळेच समाजात चैतन्य निर्माण होईल, कर्तृत्व फुलेल, उभारी येईल असे दीनदयाळजींचे म्हणणे असे. इतकेच नव्हे तर ही अर्थरचना विश्वाला मार्गदर्शक ठरेल असा त्यांचा विश्वास होता.

### अर्थरचनेचे स्वरूप

भारताच्या नव्या अर्थरचनेची चर्चा करताना दीनदयाळजींनी ‘स्वदेशी व विकेंद्रीकरण ’ या दोन शब्दांत तिचे वर्णन केले आहे. आज स्वदेशीची कल्पनाही आपणाला हास्यास्पद वाटू लागलेली आहे. परदेशी वस्तूंची आवड वाढलेली आहे. आपण विचारात, नियोजनात, व्यवस्थापनात, भांडवलात, उत्पादनतंत्रात, तंत्रविज्ञानात किंबहुना उपभोग्य वस्तूचे प्रमाण ठरविण्यालाही परकीय आदर्श ठेवतो. स्वदेशीचा आपणाला विसर पडत चालला आहे याची दीनदयाळजींना खंत वाटत होती. म्हणून स्वदेशीची विधायक बाजू आपण उपेक्षिली आहे असे ते म्हणत. ही स्वदेशीकरणाची चळवळ पुन्हा सुरू झाली पाहिजे. तसेच विकेंद्रीकरणावर त्यांचा भर असे. आपल्या अर्थरचनेची दिशा दाखविताना त्यांनी पुढील गोष्टींचा उल्लेख केला आहे. १. राहणीचा किमान दर्जा सर्वांना मिळाला पाहिजे. २. देशाच्या अर्थव्यवस्थेने आपली संरक्षणक्षमता वाढविली पाहिजे. ३. नैसर्गिक संपत्तीची उधळपट्टी थांबविली पाहिजे. ४. भारतीय तंत्रविज्ञानाचा

विकास झाला पाहिजे. ५. व्यक्तीचा विकास, तिची प्रतिष्ठा राहिली पाहिजे. अर्थव्यवस्थेत आपल्या सांस्कृतिक मूल्याचे रक्षण केले पाहिजे. ६. उत्पादनसाधनाची मालकी, खाजगी किंवा राष्ट्राची हे ठरविताना व्यवहारी भूमिका घेतली पाहिजे.

भारतीय अर्थव्यवस्थेचे दीनदयाळजीना अभिप्रेत असलेले स्वरूप असे होते. राष्ट्रवाद, लोकशाही, समाजवाद व विश्वशांती यांचा भारतीय जीवनमूल्यांशी मेळ घातला पाहिजे व त्यांचा विचार एकात्मरीतीने केला पाहिजे. भारत हें पुरातन वस्तुसंग्रहालय न होता, पुरातन संस्कृतीचे रक्षण करणारे राष्ट्र न होता, ते जिवंत शक्तिशील राष्ट्र झाले पाहिजे हें दीनदयाळजीचे स्वप्न होते.

### समन्वयाची भूमिका

दीनदयालजीची राजकीय भूमिका पक्षीय होती तरी सत्य-शोधकाची, समन्वयाची, राष्ट्रीय पुनर्रचनेसाठी सहकार्याची क्षेत्रे शोधण्याची त्यांची तयारी होती. त्यांच्याच कारकीर्दीत डॉ. लोहियांशी त्यांचा संबंध आला. त्यातून परस्परांचे सहकार्य वाढत गेले. भारत–पाकिस्तान प्रश्नावर त्यानी समान भूमिका घेतलेल्या. निवडणुकीतही मर्यादित सहकार्य केले. लोहियाची कॉंग्रेस विरोधकांना एकत्रित आणण्याची भूमिका होती. तेही केवळ पक्षीय दृष्टीने पहात नव्हते. वैचारिक दृष्टया समजून घेण्याची व समजावून देण्याची दीनदयाळजीची भूमिका होती. किंबहुना भारताचे राजकीय तत्त्वज्ञान अशाच समन्वयातून होऊ शकेल हे आता सर्वमान्य झाले आहे; पण ७।८ वर्षांपूर्वी हा विचार लोहिया व दीनदयाळजी यांच्या परस्पर संबंधातून पुढे आला. कारण लोहियांना पुढचे राजकीय भविष्य दिसत होते, तर दीनदयाळजीना अशी समन्वयाची भूमिका घेतल्याविना राष्ट्रीय पुनर्रचनेचा सर्वांगीण प्रयत्न करता येणार नाही असे वाटत होते.

सैद्धांतिकदृष्टया समन्वयाचा काळ आता आला आहे. अशा वेळी गांधीजी, डॉ. लोहिया, दीनदयाळजी यांच्या विचारांतील साम्यस्थळे त्यांच्या अनुयायांनी शोधली तर भारताला आवश्यक असलेले नवे समाजदर्शन निर्माण करता येईल. सर्वोदय, संघ व समाजवादी हे तीन ध्येयवादी विचार जनता पक्षात सामील झाले आहेत. तेव्हा हे विचारमथन होणे आवश्यक आहे. इतिहासातील वैर आणि पूर्वग्रह याना प्राधान्य न देता प्राप्त परिस्थितीचा वस्तुनिष्ठ विचार करून हे मथन झाले पाहिजे. केवळ हे तीनच विचारवत नव्हेत तर रॉय, डॉ. आबेडकर, वीर सावरकर याच्यासारख्या विचारवंताच्या प्रणालीचा वस्तुनिष्ठ अभ्यास आता झाला पाहिजे. त्यासाठी केवळ उदार बुद्धी नव्हे तर उदार मनस्कतेची गरज आहे. कोणाही एका विचारवताला ' प्रॉफेट ' मानणे हे पक्षीयदृष्टया योग्य असले तरी सामूहिक विचार-मंथनाच्या दृष्टीने बाधक आहे. देशात ३० वर्षे स्वातंत्र्य नांदूनही अजून ६० टक्के लोक दारिद्र्यात का आहेत, समाजसुधारणेचे इतके प्रयत्न होऊनही जातिवाद, रूढी, धर्मवेड याचे प्राबल्य भारतीय समाजजीवनात का आहे याचा खोलवर विचार व्हावयास हवा आहे. जसे विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी कॉंग्रेसचे उच्चाटन केले तसा तथ्यांश असलेल्या विविध विचारधारांचा संगम होणे ही आजची गरज आहे. मुक्त व पूर्वग्रहरहित विचार सुरू झाला तरच ही देवाण–घेवाण होईल. विचारमथनाची व सामूहिक पुरुषार्थाची अपूर्व संधी या देशाला आता मिळाली आहे. तिचा योग्य उपयोग सर्वांनीच करून घेतला पाहिजे.

जयप्रकाशानी सत्ता ग्रहण करताना जनता पक्षाला अत्यंत उचित इशारा दिला होता. तो हा की, तुम्ही अयशस्वी झालात तर हिंसात्मक क्रांतीखेरीज दुसरा पर्याय आता उरणार नाही. म्हणून आता या जाणिवेने व देशातील परिस्थितीचा सर्वांगीण विचार करून बुद्धिमंतांनी, राजकीय व सामाजिक नेत्यानी राजकीय व सामाजिक विचारांतील सहमतांची क्षेत्रे शोधून दीनदयाळजीनी सागितल्याप्रमाणे राष्ट्रीय चैतन्य जागृत केले पाहिजे. दीनदयालजीचा विचार हा मर्यादित न राहाता राष्ट्रीय विचारमंथनात त्याला स्थान मिळाले पाहिजे. त्यांनी निःसंदिग्ध शब्दात सागितले होते, की अनेक जुन्या सस्था जाऊन त्यांची जागा नव्या संस्था घेतील. जुन्या संस्थात ज्याचे हितसंबंध गुतलेले आहेत त्यांच्यावर या घटनेचा प्रतिकूल परिणाम होईल. जे बदल करण्याच्याच विरुद्ध असतात असे लोक राष्ट्रीय पुनर्रचनेच्या या प्रयत्नांमुळे दुखावले जातील; पण रोग नाहीसा करण्यासाठी औषध हे दिलेच पाहिजे. आपणास ' जैसे थे ' प्रवृत्तीचा त्याग करावा लागेल. व नव्या युगाची नांदी करावीच लागेल. पूर्वग्रह किंवा भूतकाळातील सर्व गोष्टींबद्दल अनादराची भावना यांची बाधा पुनर्रचनेच्या आपल्या पुरुषार्थास होता कामा नये. ज्या जुन्या संस्था नि परपरा कालबाह्य ठरल्या आहेत त्याना आपण चिकटून बसण्याची मुळीच गरज नाही. समग्र क्रांतीचे स्वप्न पाहणाऱ्या या पिढीस यापेक्षा आणखी गतिमानतेचा संदेश कोणता असू शकेल ? म्हणून दीनदयाळजीचे तत्त्वज्ञान पुराणमतवादाचे समर्थक तत्त्वज्ञान नाही. ते सनातन मूल्याचा आधुनिकेतेशी, राष्ट्रीयतेचा मानव्याशी, विज्ञानाचा अध्यात्माशी समन्वय घालणारे, दुवा जोडणारे जीवनदर्शन आहे. ☐


## वर्गणीदारांस सूचना

१ : अंक न मिळाल्याची तक्रार अंक प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवस वाट पाहून करावी. अंक शिल्लक असल्यास दुसरा दिला किंवा पाठवला जातो.

२ : वर्गणी पाठविताना किंवा पत्रव्यवहार करताना नेहमी वर्गणीदार क्रमांकाचा उल्लेख करावा. अन्यथा पत्रोत्तरास विलंब अपरिहार्य आहे.

३ : तीन वर्षांची वर्गणी १००।– रुपये आहे.

४ : रु. ३००।– ठेव ठेवल्यास व्याजाचे मोबदल्यात अंक विनामूल्य पाठविला जातो.

प्रत्येकाशी ते [सारख्याच आपलेपणाने बोलायचे. हे सर्व त्यांच्या अंतरगात अखंडपणे चालू असलेल्या चिंतनाचा-मथनाचाच भाग आहे हे जाणल्याबरोबर संपर्कात येणारा प्रत्येक इसम त्या चिंतनाच्या उदात्तपणामुळे नतमस्तक व्हायचा. सघटनमंत्री असल्यापासून अध्यक्ष झाल्यापर्यंतच्या पधरा-सोळा वर्षांत या मथनातून उसळून बाहेर पडणारे नवनीत-कण वेचून हजारो लोक धन्य झाले असतील. अजातशत्रू आणि कमालीच्या चिकाटीचा लोकसग्राहक बाणा लाभलेल्या दीनदयाळजींनी ओंजळी भरभरून हे चिंतन-नवनीत साऱ्या देशाला वाटलेले आहे.

सरंजामशाही किंवा राजसस्था याबाबत ते नेहमी म्हणायचे, 'इंग्लंड किंवा युरोपातील राजकारणीचे अनुकरण आम्ही कशासाठी करायचे? आमच्याकडे राजाला विष्णूचा अवतार मानला आहे. विष्णु अखिल विश्वाचे पालन करणारा देव आहे. तो आपल्या प्रजेचे पारिपत्य करीत नाही, संवर्धनच करीत असतो. राजधर्माची याहून चागली मूलतत्त्वे कोणत्या पाश्चात्य राजसस्थेत आहेत? आणि हजारो वर्षांतून क्वचित कुणी राजा आपले हे कर्तव्य विसरला तर 'किंग कॅन डू नो रॉंग' असे पाश्चात्यांसारखे मानून आपल्या प्रजेने राजाचे अत्याचार कुठे सहन केले आहेत? अशा उर्मट राजसत्तेला शापभ्रष्ट करण्याचे काम आमच्या सर्वसगपरित्याग केलेल्या ऋषि-मुनींनी आणि सामान्य प्रजाजनानीच केले नाही काय? या उलट पाश्चात्य देशांत राजसस्था वाईट वागताच ती नष्ट करून टाकणारी हिंसक क्राती झाली आणि त्यातून राजतत्र किंवा राजेशाहीच नष्ट करून त्या जागी प्रजातंत्र किंवा लोकशाही अस्तित्वात आणण्यात आली.'

'परंतु या प्रजातंत्राचा कारभार तरी निकोप राहिला का? प्रौढ मताधिकार आणि निवडणुकांतून लोकप्रतिनिधी-संस्था स्थापन करणे याचेच नाव प्रजातंत्र. या दोन्ही गोष्टी कम्युनिस्ट रशियात अस्तित्वात आहेत; परतु तेथे लोकशाही आहे का? कारण लोकशाही-व्यवस्थेत निवडणुका झाल्या तरी काही लोक बहुमतात आणि काही अल्पमतात येणारच. बहुमताचे शासन हेच लोकशाहीचे सोपे नाव; परतु बहुमताचे शासन हे फार फार तर बहुतत्र होऊ शकते. त्याला यथार्थाने प्रजातत्र कसे म्हणायचे? या प्रजातत्रात अल्पमताचा आवाज कितीही खरा आणि बरोबर असला तरी नेहमी दडपला आणि दाबलाच जाणार. या पाश्चात्य प्रजातत्राचे तत्त्व 'बहुजन हिताय' एवढेच होते. सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय हा भारतीय संस्कृतीचा सदेश या पाश्चात्य प्रजातत्रव्यवस्थेत लोप पावलेला असतो. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय', हे घटकाभर मान्य केले, तरीही १०० तील ४९ लोक दुःखी-कष्टी असले तरी त्यांच्या दुःख आणि हाल-अपेष्टांचे ते अल्पमतात आहेत एवढ्याचखातर जर निवारण होणार नसेल, बहुजन हितायच्या नावाखाली हे अल्पजन उपेक्षितच राहणार असतील तर हे प्रजातत्र भारतीय समाजाला केव्हाही आदर्श वाटणार नाही. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामया.' ही आमची शिकवण आहे.' मग या शिकवणीला साजेल अशी लोकशाही आणायची की पाश्चात्यानी अमुक एका पद्धतीची लोकशाही राबवली म्हणून आम्हीही तिचेच अनुकरण करायचे असा प्रश्न दीनदयाळजी उपस्थित करीत असत. यालाच ते प्रजातंत्राचे भारतीयकरण म्हणायचे आणि नेमक्या याच सदर्भात तो समन्वयवाद मांडायचे. म्हणायचे- 'हे असे बहुमत, अल्पमत करण्यापेक्षा सर्व मतांचा समन्वय साधील अशी व्यवस्था आपल्याला जास्त पोषक ठरेल.'

एकदा दीनदयाळजी म्हणाले होते, 'अहो, नुसते प्रजातत्राचे पाश्चात्य कलेवर घेऊन काय करणार? त्याच प्रजातंत्रप्रणालीचा सर्रास वापर करूनच विसाव्या शतकातील हुकुमशहा निर्माण झाले नाहीत काय? अशा प्रकारे प्रजातत्रावर अनन्य निष्ठा असल्याचे सागत आलेली मडळीच प्रजातंत्राच्या नरडीला नख लावायला कारणीभूत झाली. हिटलर, मुसोलिनी, स्टॅलिन यांच्यासारख्या हुकुमशहांनीही प्रजातंत्राचा बाह्य डोलारा कायम राखला होताच.' आज दीनदयाळजी नाहीत; परंतु प्रजातंत्रनिष्ठेचे प्रदर्शन करीत करीतच आणि त्या प्रजातत्राचे रक्षण करण्यासाठीच इंदिरा गांधींनी देशात चक्क हुकूमशाहीच कशी आणली तो ताजा इतिहास डोळ्यांसमोर आला म्हणजे दीनदयाळजींच्या चिंतनातील मौलिकता लक्षात येते. ते फ्रान्सचे उदाहरणही देत असत. म्हणायचे-'फ्रान्समध्ये युरोपातील सर्वांत मोठी राज्यक्राती झाली. राजसत्ता जाऊन तेथे प्रजासत्ता आली; पण प्रजातत्र व्यवस्थेतील याच त्रुटींमुळे पाच दशकांच्या आत प्रजातत्रामुळेच राजतत्रव्यवस्था पार मोडकळीस आल्याची झळ युरोपात फ्रान्सलाच सर्वांत जास्त बसली. यातूनच खरी सत्ता लोकप्रतिनिधींच्या हाती आणि नामधारी सत्ता राजा-राणीच्या हाती असा एक नवा प्रकार रूढ झाला.

यांतून राष्ट्रवादाचा जन्म झाला; परंतु तोही युरोपात फार प्रभावी झाला नाही. अतिराष्ट्रवादातून हुकुमशाही आणि साम्राज्यवाद निर्माण झाले. तात्पर्य, राष्ट्रवादही फारसा ताणता आला नाही. राष्ट्रवाद आणि प्रजातत्र यांचा मेळ घालून पाहताना राष्ट्रवादी समाजवादाचा जन्म झाला. यातूनच मग अक्षरशः छप्पन्न प्रकारचे समाजवाद निर्माण झाले. शास्त्रीय समाजवाद, जनतंत्रीय समाजवाद, क्रांतिकारी समाजवाद, दलितांची हुकूमशाही आणणारा समाज-वाद, समतावादी समाजवाद, मार्क्सचा समाजवाद, लेनिनचा समाजवाद, माओचा समाजवाद...किती मोजावेत? असे समाजवादाच्या नाना छटा सागणारे समाजवादी तत्त्वज्ञान प्रसगोपात पुढे येत गेले; पण जो तो बुद्धीच सागतो या न्यायाने मांडण्यात आलेल्या या समाजवादी मतामतांच्या या गलबल्यात भारतीय समाजजीवनाला पोषक आणि आवश्यक असा दिशाबोध झाला नाही. यातील एकही समाजवाद जसाच्या तसा आपल्या समाजाला लागू पडायचा नाही हे दीनदयाळजींनी ओळखले होते. ते म्हणायचे, 'भारतीय समाजवाद हा शब्दही बरोबर नाही. आमच्याकडे रुजला तो समाजवाद नव्हता,-समष्टिवाद होता-

## समाजवाद नव्हे समष्टिवाद

समाजवाद या शब्दात सर्व काही राज्यशासनाधीन, ही जी मूलभूत भावना आहे ती समष्टीच्या सर्वांगीण विकासाला मारक आहे. कारण त्यात समाजाचे जे काही भलेबुरे व्हायचे असेल ते समाजाचे सरकारात प्रतिनिधित्व करणाऱ्यानी करायचे आहे, हीच कल्पना आहे. अमुक व्यवसाय ठीक चालत नाही कारण काय तर तो खाजगी भांडवलदाराच्या हाती आहे, ही या समाजवादाची उपप्रमेयासारखी तर्कप्रणाली. म्हणून त्या व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करणे हा त्यावरील या समाजवादाचा तोडगा. यात त्या व्यवसायातील लोकांचा पुढाकार

घेऊन उद्यमीपणा दाखविण्याचा बाणा समाप्त होतो आणि भारतीय समाजव्यवस्थेत उत्पादनाचे सर्वांत महत्त्वाचे केंद्र मानला गेलेला माणूस हा यंत्राचा वा यंत्रणेचा केवळ दास होऊन बसतो. माणसाला माणूस मानून त्याला समष्टीच्या विकासाशी एकरूप करण्याची ताकद जगातील कोणत्याही छापाच्या वा छटेच्या समाजवादात नाही आणि समाजवादाची तीच ती तत्त्वे काहीशी भेसळ व सरमिसळ करून भारतीय या नावापुढे मांडल्याने भारतीय समाजवाद होत नाही, असे दीनदयाळजी सोदाहरण सांगत सांगत आपल्या एकात्म मानववादाचा सिद्धांत मांडीत असत.

भारतीय राजकारणातील एका चुकीकडे दीनदयाळजी नेहमी लक्ष वेधीत असत. आमचे राजकारणच मुळात, निरनिराळे वर्ग आहेत आणि त्या त्या वर्गाचे स्वतंत्र अस्तित्व आहे, असे मानूनच चालू आहे. ही आमची फार मोठी चूक आहे. आम्ही वेगवेगळ्या वर्गांचे अस्तित्व स्वीकार करतो आणि मग ती स्वतंत्र अस्तित्वे न दुखावता त्यांचा राष्ट्रहिताच्या कामासाठी उपयोग करून घेण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी त्या वेगवेगळ्या स्वतंत्र घटकात एकता आणि समन्वय साधण्याच्या प्रयत्नातच आमचे राजकारण खर्ची पडते असे हे वेगवेगळे स्वतंत्र अपूर्णांकासारखे घटक मांडून त्यांचा महत्तम साधारण विभाजक शोधण्यासारखाच हा प्रयत्न आहे; परंतु अशा प्रकारे राजकारणात आम्ही या विभिन्न वर्गांचे इतके अपूर्णांक मांडून ठेवतो की, त्याचा 'म. सा. वि.' काढणे दुरापास्त होऊन बसते आणि राजकारणातील समस्या सोडविण्यात त्यामुळे अखेरीस अपयशच पदरी पडते.

उदाहरण म्हणून ते सांगत असत की, 'ब्रिटिश अमलाच्या काळात या देशात मुसलमान, ख्रिश्चन वगैरे अनेक वर्ग आहेत हे आम्ही मान्य केले. मग त्यांचे स्वतंत्र अस्तित्व जोपासण्याचा प्रयत्न केला आणि त्यांचे असे स्वतंत्र अस्तित्व मान्य करूनच आपण त्यांच्या ठायी राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करू शकू असे आम्ही मानले. ही आमची सर्वांत मोठी चूक होती. कारण धर्माच्या आधारे आम्ही त्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करणे वेगळे आणि राष्ट्रकार्यातही त्या धार्मिक आधाराने स्वतंत्र अस्तित्वास मान्यता देणे वेगळे. राष्ट्रीयत्व हीच मुळात एक अत्यंत प्रबळ प्रेरणाशक्ती असायला हवी होती. राष्ट्रीयत्वाच्या या प्रबळ प्रेरणेच्या परिघात धर्माला स्थान देण्यात आम्ही चूक केली. एकाच धर्माचे लोक अनेक राष्ट्रात असू शकतात आणि एकाच राष्ट्रात अनेक धर्मांचे लोक नांदू शकतात. या वर्गांचे धार्मिक स्वतंत्र अस्तित्व मानायचे आणि मग त्यातले काहीही सोडावे लागणार नाही याच भावनेने त्यांचे राष्ट्रकार्यासाठी एकीकरण करायचे असाच प्रबल अगदी नेहरू-काळापासून चालू आहे. आपणा सर्वांना एक करणारी शक्ती कोणती आहे याची सुस्पष्ट कल्पना न रेखाटताच हा प्रयत्न चालू राहिला म्हणूनच तो यशस्वी झाला नाही.'

याच प्रकारे धार्मिक आधारावरोबरच भाषिक आणि आर्थिक आधारानेही आम्ही काही वर्ग आहेत हे आम्ही मान्य केले. अनेक भाषाभाषी लोकांचे स्वतंत्र अस्तित्व आहे आणि अशा स्वतंत्र अस्तित्वाचा मिळून भारत एक देश आहे ही भावना रुजवण्याचा प्रयत्न होत राहिला आहे. भारतीय संघराज्य हा शब्द त्यातूनच आला. यातूनच प्रांतिक अभिनिवेशाची कल्पना मूळ धरून बसली. धार्मिक अभिनिवेशाचा परिणाम पाकिस्ताननिर्मितीत झाला. प्रांतिक अभिनिवेशाचे परिणामही दिसू लागले आहेतच. आर्थिक दृष्टिकोणातूनही एक जमीनदार, दुसरा जहागीरदार, मालगुजार, शेतकरी, कामकरी, कष्टकरी, भांडवलदार, पीडक, पीडित, शोषक, शोषित असे अनेक वर्ग आम्ही आधी मान्य केले आणि मग एकावर दुसऱ्याची कुरघोडी समाप्त करण्यातच आमचे राजकारण गुरफटून गेले. वर्गअस्तित्वास मान्यता दिल्याने वर्गविग्रहास खतपाणीच मिळते आणि समन्वयाची भावना दुरावते.'

वर्षानुवर्षे अशा प्रकारच्या वर्गभेदाना खतपाणी घालीत गेल्यामुळे हे वर्ग म्हणजे एक सत्य आहे असे राजकारणात मानले जाऊ लागले. वास्तविक हे सर्व मिथ्या आहे. या सर्व कल्पित वर्गांचे अस्तित्व मान्य करून त्याना संतुष्ट राखण्यासाठी त्यांच्या मनधरणीचे धोरण आखून त्यांचा अहंकार आणि स्वार्थ वाढवण्याचा प्रयत्न राजकारण करीत राहील तोपर्यंत त्यांची वाटचाल नेमकी विपरीतच होणार, असे दीनदयाळजी विवेचन करीत असत. त्यांचे म्हणणे असे—संपूर्ण भारत एक आहे आणि या भारताचे सर्व पुत्र एकच आहेत आणि आपण सर्व तसे एक आहोत याचाच अनुभव त्यांना सतत येत राहील अशाच प्रकारे संपूर्ण राजकीय दर्शन असायला हवे. अनेक अवयव एकाला एक जोडल्याने शरीर होत नाही; पण शरीराला अनेक अवयव असतात आणि म्हणूनच प्रत्येक अवयवाने आपल्या स्वतंत्र अस्तित्वासाठी नव्हे, तर शरीराच्या अस्तित्वासाठी झटायचे असते. त्याचप्रमाणे राष्ट्राच्या सर्व घटकांनीही आपला आकार-प्रकार राष्ट्रहिताला अनुरूप असाच राखला पाहिजे. त्याऐवजी या घटकांच्या गरजानुरूप राष्ट्रहिताची काटछाट करणे हास्यास्पद ठरेल. धर्म, संप्रदाय, प्रांत, भाषा आणि वर्ग यांना ते राष्ट्रहिताला पोषक आहेत तोवरच काही किंमत आहे. नाही तर राष्ट्राच्या ऐक्यासाठी याचा बळी देऊनही पुढे जावे लागेल.

दीनदयाळजीच्या दृष्टिकोणात हा मार्मिक फरक होता. इतर लोक अनेकत्वालाच सत्य मानून त्यातून एकत्व शोधण्याचा प्रयत्न करीत होते. दीनदयाळजी एकत्व हेच सत्य मानून अनेकत्वांना तदनुरूप बनविण्याचा ध्यास घेऊन कार्य करीत होते. नदीच्या पात्रात अनेक आवर्त असतात, विवर्त असतात, भोवरे असतात, लाटा असतात; पण त्याच्यापैकी कोणालाही स्वतंत्र अस्तित्व नसते. राजकारणातील हीच मोठी चूक आहे की, आधी अनेकत्व मान्य करून त्यातून एकत्व शोधण्याचा प्रयत्न होतो आहे आणि जोपर्यंत ही चूक सुधारण्यात येत नाही तोपर्यंत भारताचे खरेखुरे राजकीय मानचित्र उभे राहणार नाही, असे ते ठामपणे सांगत असत.

## सैद्धान्तिक संघर्ष

अशा प्रकारे पाश्चात्य विचारसरणीचे अंधानुकरण करण्यामुळे जो मतामतांचा गलबला भारतात निर्माण झाला, त्यातूनच अनेक कारखे सैद्धांतिक सवर्जही उभे राहिले; परंतु राष्ट्रवाद, स्वातंत्र्य आणि समाजवाद या तीन प्रमुख चाकोऱ्यांतून वाटचाल करीत आलेले पाश्चात्य राजकारण अजूनही आपले ध्येय गाठू शकलेले नाही. हे सर्व सिद्धान्त अपूर्ण आहेत. एक राष्ट्रवाद दुसऱ्या राष्ट्रवादाशी टक्कर होताच झुंजायला उभा राहतो आहे. एकमेकाना घातक ठरतो आहे. परिणामी विश्वशांती धोक्यात आणतो आहे. बरे, काय वाटेल ते झाले तरी विश्वशांती ढळू द्यायचीच नाही असे म्हटले तर मग जगातील अजूनही गुलामगिरीतच राहिलेली राष्ट्रे कधी स्वतंत्र व्हायचीच नाहीत. दोन राष्ट्रातील संघर्ष हा जागतिक एकतेलाही मारकच ठरतो. जगाच्या ऐक्यासाठी राष्ट्रवाद नष्ट झाला पाहिजे असाही सिद्धान्त काहीजण मांडतात, तर काही लोक विश्वऐक्य भकस आहे असे मानून आपापल्या राष्ट्रीय स्वार्थासच महत्त्व देतात. या दोन संघर्षात नेमकी कोणती भूमिका घ्यावी असा प्रश्न प्रजातंत्र आणि समाजवाद यानाही पडतो.

'त्याच प्रकारे प्रजातंत्रप्रणालीत व्यक्तीला मताधिकार मिळतो, स्वातंत्र्यही मिळते; पण तरीही भांडवलशाहीकडून होणारे शोषण आणि केंद्रीकरण या माध्यमातूनच व्यक्तीचा विकास होत असतो. हे शोषण थांबविण्यासाठी समाजवादाचा जन्म झाला; परंतु त्या समाजवादाने व्यक्तीची स्वतंत्रता आणि प्रतिष्ठाच समाप्त करून

टाकली. अशा परिस्थितीत या सैद्धांतिक संघर्षात नेमके काय करावे ते न कळल्याने जागतिक विविध तत्त्वज्ञाने किंकर्तव्यमूढ झाल्यासारखी थबकली आहेत. राजेशाही, लोकशाही वा दलितांची हुकूमशाही अथवा अर्थकारणाची सरकारशाही यावर निर्णायक तोड सांगण्यास असमर्थ आहेत. पाश्चात्य चिंतनधारा दिङ्मूढ झाल्या आहेत. 'अंधेनैव नीयमानाः यथान्धाः' या न्यायाने त्याचे अनुकरण करण्यात काय अर्थ आहे ? असा प्रश्न उपस्थित करून दीनदयाळजी म्हणायचे की, 'या परिस्थितीवर भारतीय संस्कृतीच तोडगा काढू शकते. आमच्या स्वराज्याचे अधिष्ठानच आमची संस्कृती आहे ते अधिष्ठान सोडले तर स्वार्थी आणि पदलोलुप लोकांनी, चालविलेला संघर्ष यापलीकडे स्वराज्याच्या लढाईला काही अर्थच राहणार नाही.'

म्हणून दीनदयाळजींनी आपल्या भारतीय परंपरा आणि प्रकृती यांना साजेसे असे नवे चिंतन मांडले. ते या मंथनातून साकार झालेले होते. त्यालाच एकात्म मानववाद असे त्यांनी म्हटले, परंतु ते नेहमी सांगत असत की, हे तत्त्वज्ञान मी काही नव्याने सांगतो आहे असे नाही हे सनातन आहे. महात्मा गांधींनी आपल्या सर्व कार्यक्रमाचे हेच अधिष्ठान ठेवले होते. धर्म, अर्थ काम, मोक्ष अशा चतुर्विध-पुरुषार्थांची कल्पना मांडणाऱ्या आपल्या शास्त्र-पुराणात हेच सांगितले आहे नुसत्या धर्माचरणाने निर्वाह होत नाही नुसत्या अर्थसाधनेने मुक्ति प्राप्त करून देणारा मोक्ष मिळत नाही. नुसत्या कामाच्या मागे लागल्याने माणसाचा 'ययाती' होऊन बसतो—पशूत आणि त्यात फरक राहात नाही. नुसत्या मोक्षाच्या मागे लागलेल्या माणसाला पलायनवादी म्हणतात. म्हणून या चारही पुरुषार्थांचा एकात्म समन्वय हीच आदर्श समाजघटकाची व्याख्या भारतीय संस्कृतीने केलेली आहे आणि ती पाश्चात्य तत्त्वप्रणालीतील इतर सर्व व्याख्यांपेक्षा जास्त परिपूर्ण, जास्त सर्वसमावेशक आणि जास्त व्यावहारिक आहे.'

अशा प्रकारे मानवमात्राच्या चारही पुरुषार्थांच्या क्षेत्रात विकास व्हावा यासाठी त्याला लागणाऱ्या सर्व सोयीसवलती विनासायास उपलब्ध करून देईल अशी समाजव्यवस्था एकात्म मानववादात अभिप्रेत आहे. व्यक्तिगत सुखोपभोगासाठी समष्टीच्या हितावर निखारे ठेवून होणारे धनोपार्जन यात वर्ज्य आहे. या चारही पुरुषार्थांचा समन्वय व्यक्तीव्यक्तीत साधावा आणि अशा व्यक्ती या नेहमी राष्ट्राभिमुखच राहाव्यात हे एकात्म मानववादाचे सारतत्त्व आहे. या चारही पुरुषार्थांच्या कल्पना त्यांनी आधुनिक संदर्भात स्पष्ट केल्या. धैर्य, क्षमा, अमर्याद वासनांचे दमन, चौर्यकर्म न करणे, शुद्धता, इंद्रियनिग्रह, विवेक, विद्या, सत्य आणि अक्रोध ही मनूने सांगितलेली दहा लक्षणेच त्यांनाही धर्मलक्षणे म्हणून अभिप्रेत होती. सुखसोयी देणाऱ्या वस्तू, अधिकार आणि मनमुराद देणाऱ्या धनसंपदादी वस्तू अर्थ म्हणून मानल्या जात स्वाभाविक इच्छा काम मानल्या आणि या संसाराच्या सर्व बंधनातून मुक्त असा शाश्वत परमानंद यास मोक्ष मानले. या चारही पुरुषार्थांसाठी झटण्यास दीनदयाळजींनी समन्वय मानले होते.

## अर्थाचा अभाव नको, प्रभावही नको

असा एकात्म मानववाद मांडताना त्यांनी तदनुरूप असे एक आर्थिक चिंतनही दिले. त्या आर्थिक चिंतनात त्यांनी व्यक्तीच्या, संस्थेच्या आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणावर भर दिला. आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण हे त्यांच्या सर्व सिद्धान्ताचा पाया आहे. अर्थाच्या अभावापासून आणि प्रभावापासून मुक्त अशा व्यक्तींचा एकात्म समाज हे त्यांच्या चिंतनाचे मुख्य सूत्र आहे पाश्चात्य विचारसरणीप्रमाणे त्यांनी मनुष्यास आर्थिक प्राणी मानण्यास नेहमीच विरोध केला. दैन्य आणि दारिद्र्य म्हणजेच अर्थाचा अभाव अमर्यादित अधिकार आणि धनाची उपासना म्हणजे अर्थाचा प्रभाव. मानवाच्या निकोप विकासाकरिता या दोन्ही गोष्टी त्याज्य आहेत.

साम्यवादी आणि भांडवलवादी या दोन्ही समाजव्यवस्था अर्थप्रधानच आहेत असे नव्हे तर अर्थप्रभावितही आहेत. धनसंपत्तीची बहुलता म्हणजेच अर्थाचा प्रभाव नव्हे. सत्ता किंवा मत्ता हे साधन न राहता साध्य बनते, आदर्शापेक्षाही जास्त महत्त्व त्यांना प्राप्त होते सत्ताधारी किंवा मत्ताधारीच समाजात पूजनीय बनून बसतात, तेव्हा ती समाजव्यवस्था अर्थाच्या प्रभावाखाली आली असे म्हणावे लागते. आपल्या संस्कृतीनुसार अर्थाचा असा प्रभाव किंवा त्याचा असा अभाव दोन्हीही धर्मक्षयाची लक्षणे मानली गेली आहेत. दीनदयाळजी म्हणत—'जीवनातल्या सर्व थोर विभूती जेव्हा विकाऊ बनतात, नाना पाप करून पैसा जोडण्याकडेच लोकांची प्रवृत्ती होते, धनिकांना धनाच्या सदुपयोगाचे ज्ञान व भान राहत नाही, चलन किंवा उत्पादनाची साधने यांच्यापुढे उपभोगाच्या वस्तूंचे उत्पादन गौण ठरते तेव्हा समाजव्यवस्था अर्थाच्या प्रभावाखाली आली असे समजावे. त्याचप्रमाणे राज्यशक्ती आणि तिचे अधिकार यांना मर्यादा राहात नाही किंवा शासनाधिकारी कर्तव्यपरायणता आणि धर्मदण्ड यांना भीक न घालता स्वैर मोकाट सुटतात आणि प्रजा अबोध आणि सरकारच्या तोंडाकडेच पहात बसणारी बनते तेव्हाही अर्थाचा प्रभाव माजतो आणि अनर्थास कारणीभूत होतो.'

यासाठी दीनदयाळजींनी विकेंद्रीकरणाचा मार्ग सुचविला. त्याकरिता शिक्षण, संस्कार आणि दैवी संपदा प्रवृत्तीचे लोक समाजात निर्माण करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. उपभोगाच्या वस्तूंचे भरपूर उत्पादन, न्यायोचित वितरण आणि सत्ता वा मत्ता यांच्यापेक्षा आदर्शानुसार आचरणाला समाजात मानमान्यता प्राप्त करणे ही त्रिसूत्री त्यासाठी सांगितली. त्याचप्रमाणे समाजाच्या गरजा भागविण्यासाठी उत्पादन करावे, उत्पादन खपविण्यासाठी गरजा वाढवू नयेत असेही त्यांनी सांगितले. भौतिकवादाच्या मागे लागल्यामुळे माणसाच्या श्रमापेक्षा यंत्राचे काम जास्त महत्त्व पावले आहे यंत्र हा माणसाचा मदतनीस न होता, त्याचा दावेदार आणि त्याच्या तोंडचा घास हिसकावून घेणारा प्रतिस्पर्धी बनला आहे. हा प्रकार जोपर्यंत माणूस हा यंत्रांचा स्वामी आहे तोपर्यंतच ठीक आहे. ज्या संस्कृतीत यंत्रेच माणसाचा स्वामी बनतात ती समाजव्यवस्था आत्मघातक ठरेल, असे ते म्हणत असत.

अर्थाच्या प्रभावापासून आणि अभावापासून मुक्त अशी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी त्यांनी 'प्रत्येक हाताला काम' हा मंत्र दिला त्याकरिता शेतीजन्य लघु आणि मध्यम उद्योगांचे जाळे गावोगावी पसरविण्याची योजना सुचविली. हाताबरोबर यंत्रानाही राबवून जास्तीत जास्त लोकांना पोटभर उपजीविका चालविता येईल अशा प्रकारे लघुउद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण करायला हवे, असे ते सांगत असत. प्रत्येक माणसाला त्याच्या उपजीविकेसाठी काम करण्याची संधी देणे हे सरकारचे कर्तव्य आहे असे सांगून त्यांनी एक फार महत्त्वाचा आर्थिक सिद्धान्त सौम्य समीकरणाच्या रूपाने मांडला ते समीकरण असे होते...

जनशक्ती × यंत्रशक्ती × कार्यशक्ती = क्रयशक्ती

जनशक्ती म्हणजे प्रत्यक्षात काम करू शकणाऱ्या लोकांची संख्या. अर्थातच समाजात जेवढी क्रयशक्ती निर्माण करायची असेल तेवढ्याच प्रमाणात या जनशक्तीला यंत्रशक्तीचा वापर करू दिला पाहिजे आणि त्या दृष्टीने प्रत्यक्षात किती रोजगार म्हणजेच कार्यशक्ती आपण निर्माण करू शकतो याचा हिशोब आधीच केला पाहिजे, असे या समीकरणाची फोड करताना ते सांगत असत. लहान लहान यंत्रांकरवी ग्रामीण भागात ज्या वस्तूंचे उत्पादन करणे अशक्य असेल तेवढ्याच वस्तूंचे उत्पादन मोठ्या उद्योगांना करू द्यावे असे त्यांचे मत होते.

## शेतकरी आणि कामकरी यांच्यात समन्वय

खेडोपाडी शेतीची कामे बारमाही चालत नसतात. काही महिने शेतकरी आणि भूमिहीन शेतमजूर बेकार बसून असतात; परंतु अशा काळात जर हा वर्ग पोटापाण्यासाठी आपल्या गावापासून खूप लांब शहरात निघून गेला तर पेरणी–कापणीच्या हंगामाच्या वेळी शेतावर काम करायला कामकऱ्यांची वाण निर्माण होते. अशा वेळी पुरेसे मजूर मिळत नाहीत म्हणून धान्योत्पादनावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते. यासाठी गावातच लहानलहान आकाराचे उद्योगधंदे सुरू करावेत म्हणजे शेतीची कामे नसलेल्या काळात मजूर त्यातच काम करून गावातच राहू शकेल, असे दीनदयाळजींचे म्हणणे होते. मजूर उपाशी राहणे आणि धडधाकट माणसाने मेहनत न करता आयते खाणे या दोन्ही गोष्टी अर्थव्यवस्थेतील विकृतीच मानल्या पाहिजेत, असे ते सांगत असत

आपली शेती स्वावलंबी व्हावी याकरिता त्यांनी दोन उपाय सुचविले होते– १. जास्तीत जास्त उत्पादन कसे घेता येईल याच दृष्टीने सर्व साधनांचा उपयोग करावा; परंतु याचा अर्थ शेतीचे फाजील यांत्रिकीकरण करावे असा नव्हे. शेतकीचे उद्योग आणि गोपालन याचा समन्वय साधावा. पाटबंधारे, उपयुक्त खतपाणी, उत्तम बी–बियाणे, शास्त्रीय शेती–पद्धतीचा वापर, सघन शेती आणि धान्याची सुरक्षित साठवण हे या व्यवस्थेत असावेत २. भू–धारणा आणि शेतमालाची खरेदी–विक्री यासाठी शेतकऱ्यांच्याच सहकारी समित्या काढाव्यात.

दीनदयाळजींचे म्हणणे होते की, देशात जमीन कमी आणि शेतकरी जास्त आहेत. त्यामुळे असलेल्या जमिनीतून जास्तीत जास्त उत्पादन काढण्याची प्रेरणा शेतकऱ्याला मिळाली पाहिजे. यासाठी सघन शेती करून जास्तीत जास्त उत्पादन काढण्यास प्रेरित करील एवढीच जमीन शेतकऱ्याजवळ असली पाहिजे. तसेच त्याच्याजवळ इतकी जास्त जमीनही नसावी की, काही भाग तसाच पडिक ठेवण्याची किंवा त्याकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ती शेतकऱ्यात निर्माण होईल. तसेच त्याच्याकडे इतकी कमीही जमीन नसावी की, तीतून जीवनावश्यक गरजाही भागणार नाहीत म्हणून अर्थोपार्जनाच्या इतर कामाला लागल्यामुळे, आहे त्या जमिनीत शेती करण्याबाबतही तो उदास व्हावा. म्हणून दीनदयाळजी म्हणत असत की, भूमिहीनांना नावापुरती जमीन देण्यापेक्षा ज्यांच्याजवळ पुरेशी जमीन नाही त्यांना निदान उपजीविकेसाठी लागेल तेवढी तरी जमीन द्यावी आणि शेतजमिनीवर माणसाची जी अनावश्यक गर्दी होत असते त्या गर्दीला ग्रामीण भागातच काही उद्योग सुरू करून त्यात काम द्यावे. धान्य पिकविणारा वेगळा आणि त्याचा व्यापार करणारा वेगळा ही जी स्थिती आहे ती समाप्त करण्यासाठी त्यांनी व्यापारी आणि उद्योगजकांनाही शेती व गोपालन करावयास प्रेरित करावे, असे म्हटले होते. उत्पादक आणि उपभोक्ता यांच्या दरम्यान मध्यस्थ आणि दलाल नसावेत, असेही ते म्हणत.

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या माणसाच्या पाच किमान गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाला प्राधान्य द्यावे आणि हे उत्पादन अगदी भरपूर व्हावे. तसेच संपूर्ण उद्योग–व्यवस्थेची रचनाच अशी असावी की देशाच्या संरक्षणाची सामग्री वेळ येताच तावडतोब त्यात सुरू करता यावी, असे दीनदयाळजींचे मत होते आर्थिकशक्ती आणि दंडशक्ती एकाच जागी केंद्रित झाल्यास दंडशक्तीचा गैरवापर करून आर्थिक मर्यादांचे अतिक्रमण होण्याचा धोका राहील म्हणून उद्योगक्षेत्राचे विश्वस्त या नात्याने खासगी उद्योगपतींनीच उद्योग चालवावेत असे म्हणताना दीनदयाळजी हेही स्पष्ट करीत असत की, कोणत्याही उद्योगधंद्याचा अंतिम हेतू समाजहित हाच असला पाहिजे, व्यक्तिगत स्वार्थ हा नव्हे. म्हणून सरकारने मोठमोठ्या उद्योगांची स्थापना स्वतः करावी; पण हे उद्योग असे असावेत की ज्यात भांडवल गुंतवायला उद्योजक तयार नसतील आणि राष्ट्रीय संरक्षण किंवा अन्य तत्सम कारणासाठी ते सरकारी क्षेत्रातच राखणे अत्यावश्यक असेल.

अत्याचारांना विरोध करणाऱ्या वर्गसंघर्षातून जन्माला आलेले प्रजातंत्र माणसाला अर्थपिपासू बनवून बसले आहे. शोषणाला विरोध करण्यातून निर्माण झालेल्या मार्क्सवादाने त्याला रक्तपिपासू केले आहे. हे मानवाच्या एकात्म विकासाचे लक्षण नाही. म्हणून भारतीय संस्कृतीच्या मूल तत्त्वानुसार अर्थपिपासू अथवा रक्तपिपासू बनण्याचे टाळून एकात्म मानववादी समाजव्यवस्था निर्माण करणे, हे दीनदयाळजींचे स्वप्न होते.

## समकालीन इतर चिंतने थिटी

या पार्श्वभूमीवर पं. दीनदयाळजींनी अत्यंत तर्कशुद्धपणे मांडलेला एकात्म मानववाद एक स्वयंपूर्ण चिंतन आहे. महात्मा गांधी, मानवेंद्र रॉय, डॉ. लोहिया या समकालीन तत्त्वचिंतकांनी मांडलेल्या सर्व चिंतनांशी नुसते नातेच सांगणारे नव्हे, तर त्या सर्व चिंतनांना स्वतःत सामावून घेऊन पलीकडे पाहणारे असे ते एक जीवनदर्शन आहे. त्यात गांधींचा अंत्योदय व ग्रामोद्धार आहे. मानवेंद्र रॉयचा उत्क्रांत लोकवाद आहे. डॉ. लोहियांचा भारतीय समाजवाद आहे आणि तरीही त्यात कोणत्याही पाश्चात्य चिंतनाशी बांधिलकी नाही. कुणाकडून कोठेही, काही उसने घेतलेले नाही. आपल्याजवळ काय नाही म्हणून आपण दुसऱ्याकडून उसनवारी करायची, असे ते नेहमी विचारीत असत. दीडशे वर्षांच्या गुलामीमुळे युरोपीय विचारसरणी आपल्यापेक्षा श्रेष्ठ असा जो न्यूनगंड आमच्या समकालीन तत्त्वचिंतनात पसरला होता, तो दीनदयाळजींनी 'एकात्म मानववादाच्या' आपल्या या सिद्धान्ताने पार काढून टाकला आहे.

आज जनता सरकारचे गृहमंत्री चौधरी चरणसिंह यांनी जो अर्थशास्त्रीय प्रबंध मांडला आहे तो गांधीवादी समाजरचनेचा एक आराखडा आहे; परंतु अखेरीस तोही एक समग्र चिंतन ठरत नाही. आज आपल्याकडे अनेक अर्थपंडित आहेत. ते अनेक सूचना करीत असतात; परंतु त्यांच्या आर्थिक–चिंतनावरही पाश्चात्य नीति–रीतीचा प्रभाव पडलेला दिसतोच. प्रजातंत्र आणि समाजवाद या दोन्हीही कल्पना आपल्याकडे युगानुयुगे मुरलेल्या, रुजलेल्या चिंतनापुढे थिट्या आहेत. प्रजातंत्र आणि समाजवाद या दोहोंच्या मिश्रणातून निर्माण झालेले तथाकथित जनवादी समाजवादी चिंतनही मुळातील दोन्ही चिंतनांपेक्षा उजवे असले तरी समाजपरिवर्तनासाठी थिटेच आहे. या दृष्टीने नवी समाजरचना नेहरूवादी असावी की गांधीवादी या वादात विशिष्ट अभिनिवेशाने बाजू घेऊन मांडण्यात आलेली प्रबंध–मालिका ही स्वतःच एक परिपूर्ण चिंतन ठरत नाही. मग ती कुणा अर्थशास्त्रज्ञाने मांडलेली असो, अथवा चौधरी चरणसिंह यांच्यासारख्या अत्यंत अनुभवी आणि ग्रामीण मातीतून वर आलेल्या नेत्याने मांडलेली असो.

दीनदयाळजी नेहमीच सांगत असत की, 'मी नवे असे काहीही सांगत नाही. जे आपले आहे, युगानुयुगे अनुभवातून साकारलेले आहे, पण आपल्याला ज्याचा विसर पडला होता, तेच मी फक्त नव्या शब्दात, नव्या रूपात मांडतो आहे, त्यांनी आपल्या या एकात्म मानववादाच्या निव्वळ आर्थिक चिंतनावर बारा अध्यायांचे एक दीडशे पानी पुस्तक लिहिले आहे. त्यातून त्यांनी भारतीय अर्थनीतीच्या विकासाची एक दिशा दाखविली आहे आणि तरीही त्यांनी सांगितले आहे की, अर्थ हा फक्त एकचतुर्थांश पुरुषार्थ आहे. एकात्म मानववादात चारही पुरुषार्थांचा साकल्याने विचार केलेला आहे म्हणूनच ते एक समग्र चिंतन आहे. व्यष्टीच्या मर्यादित परिघाची व्याप्ती वाढवीत वाढवीत समष्टीशी एकरूपता होते तेव्हा चिंतक हा आपल्यापुरता राहत नाही. तो संपूर्ण समाजाचा बनतो; परंतु तरीही तो एक चिंतकच असतो. त्याचे चिंतन प्रत्यक्षात उतरविण्यासाठी भौतिक यंत्रणा राबविण्याचे कार्य शासनाला किंवा समाजधुरीणांनाच करावे लागत असते. दीनदयाळजी म्हणूनच आधुनिक भारतीय महर्षी वाटतात. त्यांचे चिंतन नुसत्या जनता–सरकारलाच नव्हे तर यापुढे येणाऱ्या कोणत्याही सरकारला भारतीय संस्कृतीनुसार देशाचा विकास कसा करावा याचा दिशाबोध देणारे चिंतन आहे. त्याचे जतन कसे करावे ही जबाबदारी आपली आहे. ☐

MANOOS ( Marathi Weekly )   1·25 Paise   Regd. No. PNC-68

लंडनच्या गुपिल्स आर्ट गॅलरीमध्ये नोकरी करणारा व्हिन्सेंट व्हॉन गॉग. वास्तविक ही आर्ट गॅलरी त्याच्या काकाच्या मालकीची. तिच्या शाखा साऱ्या युरोपभर होत्या. काकांना मूलबाळ नव्हतं. त्यामुळे व्हिन्सेंट या सर्व संपत्तीचा-वैभवाचा वारस व्हायचा हे उघड होतं. पण त्याला दुसऱ्याच एका वेडाने झपाटले. या वेडाखातर त्याने नोकरीला रामराम ठोकला. लंडन सोडले. तो पोचला बेल्जममध्ये एका कोळसाखाणीत. जमिनीखालची हवा आग लागल्यासारखी तापलेली. अनेक गुहांमध्ये विषारी वायू भरलेला. काही गुहा कोसळायच्या बेतात माणसं अंधारात, घुसमटत, गुडघ्यावर रांगत तेरा तेरा तास काम करत होती. वाळका पाव, कडू चीज अन् कॉफीवर शरीर ढकलत होती. 'सेंट' होण्यासाठी तेथे गेलेला व्हिन्सेंट अवाक् झाला, उद्ध्वस्त झाला.
त्याने खिशात हात घालून पेन्सिलीचा तुकडा अन् घरून आलेलं एक पत्र काढलं. पत्राच्या पाठीवर भरकन् एक चित्र काढलं.
वेड वाढतच गेलं. झपाटणं कधी संपलंच नाही.

# काळे इजिप्त
# एक सेंट
# आणि व्हिन्सेंट

**माधुरी पुरंदरे**

# माणूस
# दिवाळी अंक

गेल्या दोन वर्षांत मराठी साहित्यिकांनी
दोन उड्या घेतल्या.
पहिली उडी अर्थातच लाइफ बोटमध्ये घेतलेली.
आणीबाणी लागू होताच घेतलेली--
भित्रेपणाची.
दुसरी उडी कोणती ?
निवडणुका जाहीर झाल्यानंतरची—
सगळे निर्बंध उठल्यानंतरची !
या दोन्ही उड्या खऱ्या-खोट्या
पडताळून पाहिल्या पाहिजेत.

**विचारस्वातंत्र्य**
**आविष्कारस्वातंत्र्य**
**यांच्या जहाजावर**
**आमचे लेखक**
**खरोखरच**
**चढले आहेत का ?**
**एक परखड मूल्यमापन,**
**आत्मशोधन.**

**विनय हर्डीकर**

# माणूस
# दिवाळी अंक

**प्रसिद्धी : ५ नोव्हेंबर**
**किंमत : सहा रुपये**